म. ग्र. सं. ठाणे
विषय भू प्रवास
सं. क्र. ६०३

# किल्ले

— गो. नी. दांडेकर.

REFBK-0022857

28 OCT 1987

REFBK-0022857

REFBK-0022857


६०३
२२५५७

# मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना .—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा फी भरावी लागेल.

17 FEB 1982
26 AUG 1984
23 DEC 1984

( क्रु मा. प. )
५००० - ४ - ८०



# किल्ले

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

गोपाल नीलकण्ठ दाण्डेकर

मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई ४०० ००४.

पहिली आवृत्ती
सप्टेंबर १९७९

© गो. नी. दाण्डेकर

प्रकाशक :
अशोक केशव कोठावळे,
मॅजेस्टिक प्रकाशन,
३१६ प्रसाद चेम्बर्स,
मुंबई ४.

मुद्रक :
अ. के. कोठावळे,
ॐ मुद्रणालय,
२९० अ, शनिवार पेठ,
पुणें ३०.

मुखपृष्ठ : जयंत ताडफळे

मूल्य · दहा रुपये

खंडबा उबरे
हनुवती फणसे
बबन दराडिगे
तुकाराम शेडगे
यांस

आप्पा

# प्रास्ताविक

" महाराष्ट्रातील किल्ले " हें पुस्तक दोन भागामध्यें कै. चिंतामण गंगाधर गोगटे यानीं लिहून किल्ले भटकायची हौस असलेल्या साहसी तरुणावर फार मोठे उपकार करून ठेवले. त्या काळीं असलेल्या खालसा प्रदेशातील किल्ल्यांचेंच वर्णन प्राय: त्यानीं केलें. त्यामुळें तेव्हाच्या भोर संस्थानात असलेले राजगड, प्रचंडगड इत्यादि चार सहा किल्ल्याचीं वर्णनें त्यांच्या पुस्तकामध्यें अन्तर्भूत झालीं नाहींत. पुस्तकांपैकीं पहिल्या भागाची द्वितीय आवृत्ति १९०५ सालीं निघाली. दुसऱ्या भागाची प्रथम आवृत्ति १९०७ सालीं छापली गेली. पुढें त्याच्या आणखी आवृत्त्या निघाल्या कीं नाहीं, हें कळायला कांहीं मार्ग उरला नाहीं, कारण हीं दोन्ही पुस्तकें सध्या अत्यंत दुर्मिळ झालीं आहेत.

अलिकडे तरुणामध्यें किल्ले पाहण्याची प्रवृत्ति वाढत आहे. सर्व किल्याचीं वर्णनें देणें जरी शक्य न झालें, तरी कांहीं प्रमुख किल्ल्याची माहिती साहसी तरुणास उपलब्ध करून द्यावी, हा हें पुस्तक लिहिण्यामागचा प्रमुख उद्देश आहे. यापैकीं बहुधा सर्वच किल्ले प्रस्तुत लेखकानें हिंडून पाहिले आहेत. कित्येक दुर्गांची तर त्यानें वारीच केली आहे.

हें पुस्तक लिहीत असता आपणास असलेली माहिती ताडून पाहाण्यासाठीं कै. गोगट्याचीं पुस्तकें, प. महादेवशास्त्री जोशी यांनीं लिहिलेले ' महाराष्ट्राचीं धारातीर्थे ', या बहुमोल पुस्तकाचे दोन भाग, लेखकाचे मामा कै. शा. वि. अवळसकर यांनीं अतिशय परिश्रमपूर्वक लिहिलेलें रायगडावरील पुस्तक, कै. कृष्णाजी वासुदेव पुरंदरे यांनीं लिहिलेलें ' किल्ले पुरंदर ', इत्यादि पुस्तकांचा बहुमोल उपयोग झाला आहे. त्या पूर्वसूरींचें ऋण मान्य करणें योग्य होईल.

अतिशय परिश्रमपूर्वक तयार केलेला महाराष्ट्रातील बहुतेक सर्वच किल्ल्याचा नकाशा शेवटीं जोडला आहे.

इतकी दक्षता घेऊनही कुठें कांहीं त्रुटि राहिली असण्याची शक्यता आहे. तीबद्दल क्षमाप्रार्थना करणें हें लेखकाचें अगत्यपूर्वक करणेंच कर्तव्य आहे.

गोपाल नीलकण्ठ दाण्डेकर

तळेगांव दाभाडे
जि. पुणे

पद्मावती माची ही राजगडाची प्रमुख वस्ती. स्वतः छत्रपतींच्या वाड्याचें आवार, पद्मावती देवीचे देऊळ, रामेश्वर, पद्मावती तलाव, दिवाणघर, घोड्याची पागा, अंबरखाना, सदर, ढालकाठीची जागा इत्यादि स्थळें याच माचीवर आहेत.

सदर मार्गे टाकून ढालकाठीच्या स्थानावरून बालेकिल्ल्याच्या पोटाखालून, कडा उजव्या हातास ठेवून अदमासें अर्धा मैल चालून गेलें, कीं बालेकिल्ल्याची उभी चढण लागते. कड्यात अदमासें पस्तीस चाळीस फूट खोबणी खोदल्या आहेत. त्याच्यात पावलें टेकीत वर चढावें लागतें. पुढील तीन चारशें फुटाचा चढाव चढून गेलें कीं बालेकिल्ल्याच्या नगारखान्याचें महाद्वार लागतें पुढें गेल्यावर जननीचें देऊळ त्याहीवर चढलें, कीं चंद्रतळें आणि ब्रह्मेश्वराचें मंदिर.

चंद्रतळ्याच्या डावीकडून जाणारी वाट थेट बालेकिल्ल्याच्या माथ्यावर नेऊन पोंचविते. वरती खाशाचे वाडे, अंबरखाना, बाजार पेठ, इत्यादि अदमासें ५० इमारतींचे अवशेष आहेत ब्रह्मेश्वराच्या मंदिराच्या पलिकडे बालेकिल्ल्याचा उत्तर बुरूज आहे. तिथून तोरणा, सिंहगड हे दोन्ही किल्ले आणि त्याचबरोबर डोंगरानी वेढलेला उत्तरेकडील प्रचंड प्रदेश दिसू शकतो. बालेकिल्ल्याच्या ऐन माथ्यावरून पद्मावती, संजीवनी, आणि सुवेळा माच्याचें विहंगम दृश्य दिसतें. पूर्वेकडे पुरंदर, उजव्या हातास विचित्रगड, गडाच्या ऐन पायथ्याशीं पसरलेलें भाटघरचें धरण, त्याच्या पलिकडे पूर्व पश्चिम पसरलेल रायरेश्वरचें प्रचंड पठार, कोळेश्वरचें पठार, पाचगणी, महाबळेश्वर, मकरंदगड, प्रतापगड, कावळ्या किल्ला, पश्चिमेकडील रायगड आणि लिंगाणा–असा जवळ जवळ ७० ते ८० मैलाचा प्रदेश न्याहाळताना दृष्टी चकित होऊन जाते. आकाश स्वच्छ असेल तर भाटघरच्या पलीकडले वीर धरणाचें पाणीही दिसतें. बालेकिल्ल्याला उत्तर, पश्चिम आणि पूर्व अशा तीन दिशाना तीन बळिवन्त बुरूज बांधले आहेत. खडकात खोदलेल्या खोबणींवरून इतक्या इमारतींचे सामान वर कसें चढविलें असेल असा विचार येऊन मन विस्मयानें दाटून येतें.

संजीवनी माचीकडे जायची वाट ढालकाठीच्या स्थानाजवळूनच उजव्या हातास फुटते. ती थेट बालेकिल्ल्याच्या कड्याखालून जाते. अदमासें ५०० ते ७०० फूट उंचीचा तो छातीवर येणारा कडा पाहून मनीं दचका भरतो. बालेकिल्ला संपला, कीं पश्चिमेकडलें डोंगरदाटलें कोंकण समोर उभें ठाकतें. संजीवनी

# पुणें जिल्हा :

## राजगड

पुण्याच्या दक्षिणेस पुणें–कोल्हापूर महामार्ग नसरापुरापाशीं सोडून सडकेचा फाटा वेल्ह्याकडे वळतो, तो मार्गासनी, विंझर, पाबें या गावावरून वेल्ह्यास पावता होतो. या तिन्ही गावाच्या डाव्या हातास अदमासें दोन तीन मैल अंतरावर आकाशांत मस्तक उभावलेला राजगड आहे. मार्गासनी ते साखरमार्गें वाजेघर असा पक्का रस्ता आहे. विंझरास उतरलें तर साखरजवळ कानदी नदी ओलांडावी लागते. साखर डाव्या हातास टाकून पुढें गुंजवणी नदी ओलांडीत आपण चिरमोडीच्या शिवारात शिरतों. हें खेडेंही डावीकडे सोडून चालत राहिलें कीं गुंजवणें येतें. उजव्या हाताचा मार्ग दरडिग्याच्या झापावरून, सोंड चढून चोरदिंडीपाशीं दावता होतो. गुंजवण्यात शिरलें तर उजवीकडे असलेल्या गुंजण दरवाजाची वाट लागते. मात्र ही वाट खूप चढाची आहे.

पाब्यास उतरलें, तर आपण कानदी ओलांडीत, खरीव गावातून, खरीव खिंड चढल्यावर वाजेघरांत पावते होतों. इथून उजवीकडील वाटेनें पाली दरवाजा लागतो, तर डाव्या हाताच्या वाटेनें चोरदिंडी. या दोन्ही वाटानीं चढून गेल्यावर आपण पद्मावती माचींत पोंचतों.

मध्यभागीं अद्वितीय, प्रचण्ड सुळक्यावर उभारलेला बालेकिल्ला आणि उत्तर-पश्चिम-पूर्व अश्या तिन्ही दिशांस अनुक्रमें पद्मावती–संजीवनी–सुवेळा तीन माच्या, असा राजगडाचा विस्तार आहे.

माचीचे तीन टप्पे आहेत. पैकीं पहिले दोन टप्पे उतरून गेल्यावर डाव्या हातास अळूदरवाजा नावाचा गडाचा तिसरा दरवाजा दिसतो. दरवाजा मागें टाकून तसेंच माचीच्या टोकाकडे जाऊं लागलें, कीं दोन बाजूंना दुहेरी बांधकाम असलेली तटबंदी दिसते. बाहेरच्या मुख्य तटाच्या आंत त्याशीं समांतर अशी दुसरी भिंत थेट टोकापर्यंत बांधीत गेलेली आहे. हीच कथा डावीकडील तटाची.

दोन्ही तटास मिळून अदमासें बारा बुरूज आहेत. प्रत्येक बुरुजाच्या बाहेर बुरुजाशीं समांतर अशी संरक्षक भिंत बांधली आहे. भिंत आणि बुरूज यामध्ये जें मोकळवन आहे त्यांत उतरण्यासाठीं तटाच्या अलिकडील भिंतीच्या आतील बाजूनें जिने ठेवले आहेत. तटाची भिंत आणि आतील भिंत, यामध्यें जें चिलखत रचलें आहे त्यामधून बालेकिल्ल्यापासून तों माचीच्या टोकापर्यंत चालत जाता येतें. कित्येक ठिकाणीं २० ते २५ फूट उंच असलेल्या या सर्पाकृती चिलखतांतून चालताना मनावर एक प्रकारचें दडपण येत असतें.

ढाल्काठीपासून डाव्या हाताच्या वाटेनें पूर्वेकडील सुवेळा माचीवर जाता येतें. बालेकिल्ला मागें टाकल्यावर झाडांनीं झाकलेला बुधला नावाचा एक उंचवटा लागतो. त्याच्या पलिकडे गडाचे हवालदार शिळीमकर, तानाजी मालुसरे इत्यादींचीं उध्वस्त घरटीं लागतात. पुढें काहीं अंतरावर मल्या रुंद पायऱ्यांचा अतिशय मजबूत असा झुंजार बुरूज आहे. बुरुजापासून खालीं उतरून माचीच्या टोकाकडे जाऊं लागलें, कीं डाव्या हातास नेढें हें नांव असलेलें खडकातलें एक आरपार छिद्र दृष्टीस पडतें. अदमासें २० फूट लांबी रुंदी असलेलें हें नेढें म्हणजे निसर्गाचा एक चमत्कार आहे. दो बाजूंचें दृश्य त्या नेढ्यातून दिसू शकतें. नेढें मागें टाकून माचीच्या टोकाकडे चालू लागलें, कीं संजीवनी–माचीप्रमाणेंच चिलखती तटबंदी दों बाजूस असलेली दिसते. अगदीं टोकावरील बुरुजावर उभें राहिलें, कीं पायथ्याशीं असलेलें भाटघरचें धरण आणि पूर्वेकडे आभाळांत उंच घुसलेला पुरंदर किल्ला दृष्टी वेधून घेतात

राजगडाचें पूर्वीचें नांव मुरुंबदेव. हा ब्रह्मदेवाचा अपभ्रंश. बालेकिल्ल्यावरील ब्रह्मेश्वराचें मंदिर ही या किल्ल्यांतली मूळ वास्तू. एके ठिकाणीं या डोंगराचा उल्लेख शहामृग पर्वत असाही आढळतो इ. स. १६४५ मध्ये शिवाजीराजांच्या ध्यानीं या डोंगराची अद्वितीय रचना आली. वर एखादी जुजबी चौकी असावी. ती पाडून टाकून राजानीं तिथें किल्ला बांधायला प्रारंभ केला. अत्यंत बळकट

असा हा किल्ला अदमासें २५ वर्षांपर्यंत म्हणजे राजधानीचें स्थळ रायगड निश्चित होईपर्यंत उमलत्या स्वराज्याची राजधानी म्हणून नादला. किंबहुना स्वराज्य आकारास येत असता जितकीं अद्भुतें आणि अकल्पितें स्वराज्यावर कोसळलीं तीं सगळीं राजगडानें आपल्या रुंद छातीवर झेललीं. राजारामाचा जन्म, सईबाईसाहेबांचा मृत्यु इत्यादि छत्रपतींच्या जीवनातल्या अनेक कौटुंबिक घटना राजगडावरच घडल्या. फत्याखानावरील स्वारी, अफझलखानाशीं गाठ, शाहिस्तेखानाशीं झुंज, जयसिंगाशीं तह, आग्र्याला प्रयाण, तिथून निसटून पुन्हा स्वराज्यात परत येणें इत्यादि घटनांचा साक्षी राजगडच आहे.

ढालकाठीखालील सदरेमधून छत्रपतींनीं कित्येक वर्षेंपर्यंत स्वराज्याचा कारभार पाहिला. सदरेसमोर असलेल्या ओट्यावर कित्येकदा छत्रपतींनीं आपल्या मित्रांशीं सलगी करीत नाना मोहिमांचे बेत रचले आहेत.

उत्तरकालीन राजधानी जरी रायगडच असली, तरी राजगडचें महत्त्व शिवकालामध्यें केवळ अद्वितीय होतें. राजगड हा केवळ राजाचा गड नव्हे तर गडांचाही राजा आहे. राजगडासारखा किल्ला दुसरा नाहीं.

●

## 2 पुरंदर

सह्याद्रीच्या दक्षिणोत्तर पसरलेल्या मूळ रांगेतून काहीं फाटे पूर्व दिशेकडे फुटले आहेत. यांपैकीं एका फाट्यावर सिंहगड आहे. तोच फाटा तसाच पूर्वेकडे अदमासें चोवीस किलोमीटर धावून भुलेश्वराजवळ लय पावतो. पुण्याहून दक्षिणेकडे जाणारा कात्रज घाट, बापदेव घाट, दिवे घाट, हे घाट हीच रांग ओलांडून पलिकडे जातात. या फाट्याचें अत्युच्च शिखर म्हणजे किल्ले पुरंदर. मल्हारगड, ढवळगड, भुलेश्वर इत्यादि किल्ले याच रांगेवर पुरंदर आणि सिंहगड यांच्या मध्यभागीं आहेत. पुरंदरच्या दक्षिणेकडून नीरा नदी वाहाते. तर उत्तरेकडून अदमासें अकरा किलोमीटर अंतरावर कऱ्हा नदी वाहाते. कऱ्हेच्या तीरावरच सासवड हें इतिहासप्रसिद्ध गाव आहे. पुण्याहून पुरंदरचा मार्ग दिवे घाट ओलांडीत सासवड गांव

पार करून जातो.

पुरंदर किल्ल्याच्या पायथ्याशीं उत्तरेस सध्या पूर नावाचें खेडें आहे. त्यांतील पूर्वविशेष आणि नारायणेश्वराचें मंदिर हीं राष्ट्रकूट-यादव काळातलीं. त्या काळीं हें नारायणपूर आणि त्याच्या रक्षणासाठीं त्याच्या पाठीमागें दुर्ग पुरंदर अशी मूळ रचना असावी. नारायणेश्वराचें हेमाडपती रचनेचें मंदिर भव्य आणि अतिशय सुबक बांधणीचे आहे. त्याच्या पश्चिमेस असलेल्या तळ्याचे अवशेष आणि त्यावरील बल्लाळाचें मंदिर हीं सुद्धा यादवकालीन आहेत.—

बहामनीकाळीं बेदरचे चंद्रसंपत देशपाण्डे यांनीं बहामनी शासनाच्या वतीनें पुरंदर ताब्यात घेतला. त्यांनीं पुरंदरच्या पुनर्निर्माणास प्रारंभ केला. त्याच घराण्यातला महादाजी निळकण्ठ या पुरुषानें अधिक कसोशीनें हें काम पुरें केलें. येथील शेंदऱ्या बुरूज पुरता बांधून होईना, वारंवार ढासळे, तेव्हां बहिरनाक सोननाक यानें आपला पुत्र नाथनाक आणि सून देवकाई अशीं दोन मुलें त्यात चिणण्यासाठीं दिलीं. त्यांचा बळी घेतल्यावर बुरूज उभा राहिला, ही जी कथा प्रसिद्ध आहे, ती महादजी निळकण्ठाच्या काळातीलच असावी. शके १५५० मध्यें निजामशाही बुडाली आणि किल्ला आदिलशाही अंमलाखालीं आला. महादजी नीळकण्ठ वारल्यानंतर त्याचे मुलगे हवालदारीसाठीं भांडू लागले. तेव्हा पुणें जहागीर सांभाळून असलेल्या जयेच्छू शिवराजांनीं हिकमतीनें किल्ला आपल्या ताब्यात घेतला. शके १५७१ मध्यें आदिलशाही सरदार फत्याखान पुरंदरवर चालून आला. तेव्हा शिवाजी राजे आणि त्यांचे रणमर्द मावळे यांनीं त्याचा सणसणीत पराभव केला. शके १५७७ मध्यें शिवाजी राजांनीं नेताजी पालकर यास गडाचा सरनौबत नेमलें. शके १५७९ मध्यें राजांचे ज्येष्ठ पुत्र संभाजी-राजे यांचा जन्म पुरंदरवर झाला शके १५८७ मध्यें मोगल सरदार जयसिंगानीं आणि दिलेरखान यांनीं पुरंदरास वेढा दिला. वैशाख शुद्ध एकादशीस पुरंदरचा उपदुर्ग वज्रगड पडला. किल्ल्याभोंवतीचा वेढा पक्का होत आला हें पाहून शेवटीं किल्लेदार मुरारबाजी देशपाण्डे केवळ ७०० मावळे घेऊन दिलेरखानाच्या फौजे-वर कोसळले. त्याचा तो अभूतपूर्व पराक्रम पाहून दिलेरखानानें दातातळीं अंगोळी घातली बोलला, अरे तू कौल घे, मोठा मर्दाना शिपाई ! तुज नावाजतों. यावर रक्ताचा घोट घेऊन मुरारबाजी उत्तरले, तुझा कौल म्हणजे काय ? मी शिवाजी राजाचाच शिपाई, तुझा कौल घेतो कीं काय ? खानानें तीर चालवून मुरार-

बाजींचा प्राण घेतला. शेवटीं तहांत शिवाजी राजाना किल्ला मोगलाना द्यावा लागला पुढें निळोपंत मुझुमदार यानीं मोगलापासून पुन्हा किल्ला स्वराज्यासाठीं जिंकून घेतला. तो शके १६११ पर्यंत मराठ्यांकडेच होता. संभाजी राजाच्या मृत्यूनतर तो मोगलांनीं पुन्हा जिंकून त्याचे नाव अजमगढ ठेवलें.

पुढें मराठ्यांच्या वतीनें शंकराजी नारायण सचिवानीं मोगलांशीं भांडून पुरदर घेतला. शके १६९५ मध्यें छत्रपती शाहू यानीं किल्ला पेशवे यास दिला. त्यानतर पुरदरास खूपच महत्व प्राप्त झालें. कित्येक दिवसपर्यंत पुरदर जणूं पेशव्याची राजधानीच होता. या काळांत अनेक महत्वाच्या घटना पुरदरवर घडून गेल्या. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे शके १६९७ च्या अधिक वैशाख शुद्ध ७ या तिथीस गंगाबाई पेशवे गडावर प्रसूत झाल्या आणि सवाई माधवराव पेशवे जन्मले. शेवटीं इ. स. १८१८ मध्यें इग्रजांनीं मराठी राज्य घेतल्यावर पुरदर त्याचे अधीन झाला. सध्यां गड लष्कराच्या ताब्यात असून गडावर एन्. सी.सी.चे सैनिक सैनिकी शिक्षण घेत असताल.

समुद्रसपाटीपासून अदमासें १४०० मीटर उच असलेल्या या किल्ल्याची इतर किल्ल्याप्रमाणें इंग्रजानीं इ. स. १८२० सालीं पार मोडतोड करून टाकली. तरी देखील खुणा पटाव्यात अशीं कांहीं ठिकाणें आजही जीव धरून उभीं आहेत. गडावर पोचायच्या पूर्वीच्या वाटा, दक्षिणेकडून आणि उत्तरेकडून अशा असत. पैकीं प्रशस्त वाटा उत्तरेकडील. या वाटांनीं वर चढले, कीं सरदरवाजातून माचींत प्रवेश होतो. माचींत राजाळें आणि पद्मावती हे दोन तलाव आहेत. पेशवे आदि अधिकाऱ्याचे वाडे, पुरंदरेश्वर, रामेश्वर इत्यादि देवळें अशा अवशेषांनीं माची भरलेली आहे. माचींतून तसेंच पूर्वेकडे गेलें, कीं ऐन किल्ल्याहून सुटा असलेला पण याच किल्ल्याचा उपविभाग रुद्रमाळ किंवा वज्रगड दिसतो. बाले-किल्ल्यात शिरण्यासाठीं माघारें वळून पश्चिम दिशेकडे जाणारी पायवाट चढत जावें लागतें. माथ्यावर पोचलें कीं एका भरभक्कम दरवाजातून आत प्रवेश होतो. आत तीन शिखरें आहेत. पूर्वेकडे खादकडा, मध्यभागीं राजगादी आणि पश्चिमे-कडे केदारेश्वर केदारेश्वरकडे जात असता दरवाजालगत पडक्या इमारतींत तेला-तुपाचे रांजण पुरलेले दिसतात.

केदारेश्वराच्या मदिरासमोर उभें राहिलें, कीं मोठा भव्य देखावा दृष्टीसमोर येतो. शेंदऱ्या बुरूज, हत्ती बुरूज, कोकण्या बुरूज वगैरे गडावरली स्थानें तर स्पष्ट

दिसतातच पण सिंहगड, राजगड, प्रचण्डगड, विचित्रगड इत्यादि बलदंड दुर्ग दिसून मन आल्हादानें भरून येतें.

पुण्याहून थेट पायथ्यापर्यंत परिवहन महामंडळाच्या गाड्या मिळूं शकतात. त्या पायथ्याशीं थांबतात. तिथून सड्या उतारूनीं पायवाटेनें चढावें. वरील सैनिकी यन्त्रणेशीं संपर्क साधून सडकेनेंही वरपर्यंत पोंचतां येतें. माचींत पोंचल्यावर इंग्रजानीं बांधलेल्या चर्चच्या जवळ मुरारबाजीचा भव्य पुतळा दिसतो. किल्ल्यावर सर्वत्र डांबरी रस्ते बांधले आहेत. एन् सी. सी. सैनिकांचीं वसतिगृहें, अधिकाऱ्याचीं स्थानें, ऑफिसें, कवायतीच्या जागा इत्यादि नव्या रचनेनें माची गच्च दाटली आहे. गड पाहायला एक दिवस पुरतो. लवकर गड चढूं लागावें आणि सायंकाळीं उतरावें.

राजगड बांधण्यापूर्वी कांहीं दिवस पुरंदर शिवछत्रपतींची राजधानी होती. पुढें पेशव्यांची राजधानी होण्याचाही मान या किल्ल्यास मिळाला. अशा या एके काळीं वैभव भोगलेल्या चतुःश्रृंग किल्ल्यावर उभें राहिलें कीं मन नाना विचारानीं दाटून येतें.

●

## ३ सिंहगड

सह्याद्रीची मुख्य रांग पुण्याच्या पश्चिमेकडे दक्षिणोत्तर पसरलेली आहे. पुण्याच्या किंचित् दक्षिण दिशेस त्या मुख्य रांगेचा एक फाटा तिच्यापासून फुटून पूर्वेकडे गेला आहे. त्या भुलेश्वर फाट्यावर महाराष्ट्रांतले दोन उत्तम दुर्ग वसले आहेत. सह्याद्रीच्या ऐन कुशींतला सिंहगड, आणि पूर्वेकडे पुरंदर. सिंहगड पुण्याच्या नैऋत्येस साडेबावीस किलोमीटरवर ( १४ मैल) आहे. पुण्याहून एस्. टी. बसेस सिंहगडला जातात. खडकवासल्यापासून आंत वळून डोणजापाशीं थांबतात. डोणजें सिंहगडाच्या पायथ्याशीं आहे.

समुद्रसपाटीपासून सिंहगडाची उंची १३१८ मीटर सुमारें (४३२२ फूट) आहे. डोणजापासून ७०७ मीटर (२३०० फूट) चढावें लागतें. गडाच्या दक्षि-

पेठ कल्याण आहे. तिथून गड ४०० मीटर आहे. ( १३०० फूट. ) उत्तरेकडील डोणजाच्या दिशेचा चढ उभा आहे, तर कल्याणकडील चढ अधिक सोपा आहे. अलिकडे पायथ्यापासून थेट वरपर्यंत सडक तयार झाली आहे. तिथें छोट्या मोटारगाड्या खांदकड्याच्या पठारापर्यंत जातात.

हिवाळा, मुख्यतः उन्हाळा हे ऋतू सिंहगडावर सुखद असतात.

या गडाच्या कुंधाना या नावाचा उल्लेख शाहनामा–इ–हिंद या फार्सी काव्यात ( सन १३५० ) आढळतो. कोंढाणा हें कौडिण्य ऋषींच्या नावावरून रूढ झालेलें नांव. गडावरील कौंडिण्येश्वराचें अतिप्राचीन देवालय, किल्ल्यावर असलेलीं शैल्कृत्यें, गुहा इत्यादि प्रमाणांवरून अनुमान करता येतें कीं या किल्ल्याची मूळ रचना साडेतीन–चार हजार वर्षांपूर्वी झाली असावी. शाहनामा–इ–हिंद या ग्रथातील उल्लेखाप्रमाणें, मुहम्मद तुघलकाने हा प्रचंड दुर्ग आठ महिने वेढा घातल्यावर नागनायक नामक कोळी किल्लेदारापासून जिंकून घेतला. नंतर सुमारे तीनशें वर्षांनीं शहाजीराजे भोसले यांस कोंढाण्यानजीकची जहागीर मिळाली. शहाजीराजे कधीं आदिलशाहीत असत, तर कधीं मुगलांची नोकरी करीत. या गडबडींत किल्ल्याचें स्वामित्व त्यांचेकडून आदिलशाहीकडे आणि पुन्हा त्यांचेकडे असें घडलें. शेवटीं त्यांनीं जिजाऊबाईसाहेब आणि पुत्र शिवाजीराजे यास आपल्या पुण्याभोंवतालच्या जहागिरीवर धाडले, तेव्हा त्यांचे कारभारी दादोजी कोंडदेव हे सुभेदार, नामजद किल्ले कोंढाणा होते. इ. स. १६४७ मध्यें दादोजींचें निधन झाल्यावर शिवाजीराजांनीं बापूजी मुद्गल देशपांडे नऱ्हेकर याच्या मदतीनें कोंढाण्यावर आपला कबजा केला. त्यानंतर शहाजीराजांच्या तुरुंगवासाच्या वेळीं त्याना कोंढाणा आदिलशाहीस परत करावा लागला खरा, पण त्यांनीं तो लवकरच जिंकला आणि त्याचें नाव सिंहगड ठेवलें. राजा जयसिंगाशीं झालेल्या तहाप्रमाणें राजाना सिंहगड मुसलाना द्यावा लागला. पण इ. स. १६७० मध्यें फेब्रुवारी ४, ( माघ वद्य ९ ) या दिवशीं नरवीर तानाजीनें ढाण्या वाघासारखी झुंज देऊन सिंहगड पुन्हा स्वराज्यांत आणला. पण या झुंजींत हा अमोल हिरा गमवावा लागला.

इ. स. १६८९ च्या मार्चमध्यें राजा संभाजीच्या वधानंतर मोगलानीं सिंहगड जिंकला. पण १ जुलै १६९३ ला नावजी बलकवडे या फाकड्या रणमर्दानें तो पुन्हा औरंगजेबाकडून हिसकावून घेतला. इ. स. १७०३ मध्यें मोगलानी तीन-

चार महिने वेढा घालून सिंहगड घेतला आणि औरंगजेबानें त्याचें नांव बक्षी-दा बक्ष-ठेवलें. इ. स. १७०५ मध्ये मराठ्यानीं हा किल्ला पुन्हा हस्तगत केला. तो सन १८१८ पर्यंत त्याच्याकडेच होता.

सिंहगडावर अनेक महत्त्वाच्या घटना घडल्या. राजारामाचें निधन येथें झालें. पेशवाईत नारायणराव पेशव्याचा विवाह येथेंच झाला. अनेकदा पुण्यावर आक्रमणाची छाया पडल्यावर पेशव्यांनीं आपली महत्त्वाची चीजवस्तू, पर्वतीच्या सुवर्णाच्या देवमूर्ति, इत्यादी साहित्य सिंहगडावर नेऊन ठेवलें. इ स. १८१८ च्या एप्रिलमध्यें इंग्रजानीं तोफांचा अतोनात भडिमार करून किल्ला घेतला, त्या वेळीं त्याना अपरपार लूट मिळाली.

सिंहगड पाहावयाचा झाल्यास एक दिवस पुरतो. उत्तरेकडल्या पुणें दरवाजानें आत शिरावें, तर डाव्या हातानें वळून खादकडयाकडे जाता येतें. खादकडा हा गडाचा पूर्वेकडील एक भाग आहे. सरळ पुढें चालावें, तर घोडपागा या नावें माहीत असलेली पाण्याची टाकी, गणेश टाकें, रत्नशाळेचा चौथरा, हनुमंत, हीं ठिकाणें डावीकडे दिसतात. उजवीकडे दारूखान्याची एकुटवाणी इमारत. तसेंच पुढें जावे तर उजवीकडे लोकमान्य टिळकाचा बंगला दिसतो. या बंगल्यात लोकमान्य अनेकदा येऊन राहात. बंगल्याच्या कोपऱ्यावर त्याचा पुतळा आहे

तसेंच पश्चिमेकडे असलेल्या बालेकिल्ल्यावर चढावें तर वरतीं कौंडिण्येश्वराचें मंदिर, डाव्या हातास अलिकडे नरवीर तानाजीची समाधी, पलिकडे अमरीबुवा–अमृतेश्वर, तसेंच पुढें थंडगार पाणी असलेलें देवटाकें. डावीकडे पुढें चालावें, तर आपण कल्याण दरवाजात उभे राहातों. तिथून तटातटानें मावळतीकडे चालू लागल्यावर डोणागिरीचा कडा, तानाजी वर चढला ती कड्याची बाजू दृष्टिपथांत येते. तटातटानें उत्तरेकडे पोहोंचल्यावर आपण राजारामाच्या समाधीपाशीं पोंहोंचतों. समाधीच्या चौथऱ्यासमोर शिवाजीराजाच्या पूजेंतील दोन शिवलिंगें आणि राजारामाच्या पादुका आहेत. राजारामाची समाधी वगळतां इतिहासकाळातील एकही इमारत गडावर उभी नाहीं. इंग्रजी तोफाच्या भडीमाराने सगळें धुळीस मिळालें आहे. उरलीं आहेत केवळ स्मरणें.

गडावर दहीं आणि ताक घेऊन कल्याणच्या गवळिणी बसलेल्या असतात. क्वचित दूधही मिळू शकतें. फार वर्षांपूर्वी खवाही मिळत असे. पण ती हवा आतां नाहींशी झाली आहे. संपूर्ण गडभर वनविभागानें पुष्पवाटिका आणि फुलझाडें

लावलीं आहेत. सिंहगड हें सध्या राष्ट्रीय उपवन झालें आहे. पूर्वेकडील टोकावर दूरचित्रवाणीचा मनोरा आहे.

पश्चिमेकडून वारा वाहात असतो. त्याशीं हितगुज करणें जमलें तर तो गडासाटीं धारातीर्थी पडलेल्या योद्धयाच्या अनेकानेक कथा सांगत असतो.

## 4- प्रचंडगड

पुण्याहून एस्. टी. नें वेल्ह्यास पोहोंचल्यावर वेल्ह्याच्या पाठीशीं उभा असलेला बलदंड प्रचंडगड दृष्टि वेधून घेतो. वेल्ह्यामधूनच गडावर पोहोंचण्याची वाट फुटते. वाट तशी अवघडच आहे. अगदीं कठिण जागीं आधारासाटीं बाजूस गज ठोकले आहेत. अदमासें ४॥ हजार फूट चढून गेल्यावर बिनीदरवाजा लागतो. आंत दुसरा कोठीदरवाजा आहे. तो ओलांडून पलिकडे डाव्या हातास अलिकडेच जीर्णोद्धार केलेलें तोरणजाईचें देऊळ लागतें तिथून तोरण्याचा बालेकिल्ला सुरू होतो. बालेकिल्ल्यामध्यें मेंगाई, दिवाणघर, सदर इत्यादि उध्वस्त अवशेष आहेत. तसेंच पूर्वेकडे चालत गेलें, कीं पायाशीं असलेली झुंजारमाची दिसते.

झुंजारमाचीचा विस्तार लहान असला तरी तीवर उतरणें मात्र कठिण आहे. या माचीस एका खालीं एक दोन टप्पे असून दोन्हींस चिलखती बांधणीचे बुरूज आहेत.

पश्चिमेकडे सुमारें मैल १॥ मैल अंतरावर एक बुधला दिसतो बुधल्याच्या तळात दक्षिणेकडे असलेला डोंगराचा फाटा थेट राजगडापर्यंत गेलेला आहे. बुधलामाचीवरून परत फिरताना उजव्या हातास बालेकिल्ल्याच्या अलिकडे कोकणदरवाजा नावाचा आणीक एक दरवाजा आहे. बुधलामाचीच्या टोकाशीं चित्तादरवाजा नामक तिसराही एक दरवाजा आहे. पण तो सध्या पडून गेला आहे.

प्रचंडगडावर मागें उल्लेख केलेल्या उध्वस्त मकानाखेरीज पाहण्याजोगें फारसें कांहीं राहिलें नसलें, तरी या गडाचा विस्तार आणि तिथून दिसणारा कोकणप्रदेश हीं याची लक्षणीय वैशिष्ट्यें आहेत.

वेल्ह्याहून वर येणाऱ्या वाटेवेगळ्या आणखी तीन दुष्कर वाटानीं तोरण्यावर चढता येतें. पैकीं एक राजगडापर्यंत धावलेल्या डोंगरसोंडेवरून बुधलामाचीमध्ये प्रविष्ट होते. दुसरी दक्षिणेकडील पिलवरे मेटावरून वर चढत कोकणदरवाजातून आत शिरते. दोन तीन ठिकाणीं ही वाट अतिशय अवघड आहे. तिसरी वाट वेल्ह्यापलिकडील कोदापूर आणि भट्टी या गावावरून चित्तादरवाजानें वर चढते.

शिवाजीराजांनीं स्वराज्यस्थापना करीत असता अगदीं प्रथम तोरणा हें मूळ नाव असलेला हा किल्ला हस्तगत केला. तटाचें काम सुरू असता एके ठिकाणीं मोहराचा हंडा सापडला अशी एक कथा सांगितली जाते. त्या हंड्यामधून पाच हजार मोहरा या किल्ल्याच्या दुरुस्तीसाठीं शिवाजीराजांनीं खर्च केल्या.

किल्ला पाहावयास येणाऱ्याची चढाईच्या बाबतींत परीक्षा घेणारा हा अतिशय बळकट किल्ला शिवाजीराजाच्या आवडत्या किल्ल्यापैकीं एक होता.

●

## राजमाची

हा किल्ला बोरघाटापासून ६ मैलावर सह्याद्रीच्या एका फाट्यावर बांधलेला आहे. हा बोरघाटाच्या उत्तरेला असून लोणावळ्यापासून पायवाटेनें १० मैल लांब आहे. ज्या फाट्यावर किल्ला बांधलेला आहे, तो नीट उभा असून त्याच्या पायथ्याशीं कोकणच्या बाजूस निबिड अरण्य आहे. ह्या बाजूस त्याची उंची २००० फुटाहून जास्त आहे. असजसें त्याच्या माथ्याकडे जावें, तसतशी झाडी नाहींशी होत जाते, आणि वरील सर्व प्रदेश खरखरीत भासूं लागतो. याच्या शृंगानाही तटबंदी केलेली आहे. त्यापैकीं आतल्या बाजूच्या शृंगावर जो किल्ला बांधलेला आहे, त्याला श्रीवर्धन असें म्हणतात, आणि बाहेरच्या बाजूच्या शृंगावर जो किल्ला बांधलेला आहे, त्याला मनरंजन म्हणतात

मुख्य किल्ल्यापासून सुमारें अर्ध्या मैलावर एक बळकट दगडी तट बांधलेला आहे. ह्या तटाची उंची १० फूट आणि रुंदी ८ फूट आहे. त्याला तोफा आणि बंदुका मारण्याकरितां मधून मधून द्वारें ठेविलेलीं आहेत. ह्या भिंतीच्या आत पुष्कळ शेतजमीन आहे. पूर्वी किल्ल्यातील शिबंदीस धान्य, सर्पण, गवत

वगैरेंचा पुरावा ह्या जमिनीपासून होत असे. श्रीवर्धन किल्ल्याची एक बाजू ३००–४०० फूट एकसारखी सरळ होत गेलेली आहे. हा कडा अति भयंकर असून तिकडून शत्रूचा कांहींच इलाज चालावयाचा नाहीं. पश्चिमेच्या बाजूस अशा प्रकारच्या रक्षणाचें स्वतःसिद्ध कांहींच साधन नसल्यामुळें तिकडून मात्र दुहेरी भक्कम तट घातलेला आहे. दोन शृंगाच्या मधें जी जमिनीची जरा सखल अशी पट्टी आहे, तीवर बहिरोबाचें देवालय आहे. ह्या देवालयापुढें तीन दगडी दीपमाळा आहेत. हे देवालय लहानच आहे, परंतु त्यात बहिरोबा आणि जोगेश्वरी यांच्या शिवाजी महाराज, शाहू महाराज, आणि पहिले बाजीरावसाहेब पेशवे यांनीं निरनिराळ्या वेळीं दिलेल्या निरनिराळ्या मूर्ती स्थापिलेल्या आहेत.

श्रीवर्धन पूर्वेकडे असून फार उंच आहे, आणि ह्याच्या उत्तरेकडील बाजूस अतिशय खोल तुटलेला कडा आहे. कांहीं कांहीं ठिकाणीं ह्या किल्ल्याच्या रक्षणार्थ दुहेरी तट बांधलेला आहे. पश्चिमेच्या बाजूस किल्ल्यात जाण्याचा दरवाजा होता. त्याची हल्ली पडापड झालेली आहे. ह्या दरवाजातून आंत शिरलें म्हणजे प्रथमतः एक खडकात खोदलेली खोली लागते. हीत पूर्वी धान्य ठेवीत असत. हिच्याच शेजारीं एक पाण्याचा मोठा हौद आहे. उत्तरेच्या बाजूस तुटलेल्या कड्याच्या बाजूत एक सुंदर टाकें आहे. ह्या टाक्याला जिवंत झरे असून त्याचें पाणी फारच उत्तम आहे. तेथें सूर्यकिरणांचा अजिबात प्रवेश होत नाही. याशिवाय आंत काहीं पडापड झालेल्या इमारती आणि एक गढी आहे. पश्चिमेकडील किल्ल्याला मनरंजन असें म्हणतात. ह्याच्या रक्षणाचीं साधनें स्वतःसिद्ध नसल्यामुळें त्याच्या सभोंवार मजबूत तट घातलेला आहे. बाहेरील भिंतीच्या आंत दारूखान्याची जागा, दोन टाक्यां, किल्ल्याच्या सुभेदाराच्या जमीनदोस्त झालेल्या वाड्याचा पाया वगैरे आहेत. किल्ल्याच्या पश्चिम बाजूचा देखावा फारच रमणीय दिसतो, आणि मुख्यतः ह्याच गोष्टीवरून ह्या किल्ल्याला मनरंजन हें नाव दिलें असावें. खालील माचीचा प्रदेश पाहिला तर उत्तरेकडच्या बाजूस एकसारखी फिरें झाडी असून मधून मधून लहान लहान नद्यानाले दृष्टीस पडतात पश्चिमेच्या बाजूचा प्रदेश मोकळा असून जिकडे तिकडे लागवडीच्या जमिनीशिवाय कांहींच दृष्टीस पडत नाहीं. दक्षिणेच्या बाजूस कोळी लोकांचीं झोंपडीं, एक मोठा तलाव, व भातशेतीचीं मोठमोठीं खाचरें दृष्टीस पडतात. खालच्या उंचवट्याच्या प्रदेशाच्या उत्तर आणि दक्षिण ह्या बाजूस सह्याद्रीची मुख्य ओळ एकसारखी धावत गेलेली आहे. ह्या ओळींत कोठें

सूर्यकिरणाचा प्रवेश होणें कठिण अशा प्रकारचें अरण्य, कोठें निर्वृक्ष रखरलीत अशीं सह्याद्रीचीं गगनचुंबित शिखरें, कोठें डोंगराच्या माचीवर ताली बांधून लागवडीस आणलेली शेतें, अशा जातीचा उत्तरेस हरिश्चंद्रगडापासून तों दक्षिणेस १८ मैलावर खंडाळ्यापर्यंतचा सुमारें ७० मैल लांबीच्या प्रदेशाचा देखावा फारच अप्रतिम दिसतो. उजव्या अंगास जरा लांब नजर फेकली म्हणजे माहुली, तुंगार व साष्टी परगण्यातील उंच उंच डोंगर दिसतात. पुढच्या अंगास माथेरान, प्रबळ, कर्नाळा, माणिकगड, वगैरे डोंगर ध्यानीं येतात. पलिकडे लांब नजर फेकली म्हणजे मुंबई शहर आणि अरबी समुद्र येथपर्यंतचा प्रदेश सपाट असल्यामुळें आणि मध्यतरीं भातखाचरें आणि ताडामाडाचीं इतर झाडें असल्यामुळें जणू काय हा एक चित्रविचित्र रंगाचा गालिचाच पसरला आहे असें वाटतें. डाव्या बाजस नागोठणें आणि सागरगड या परगण्यातील सखल डोंगर दिसतात.

हा किल्ला प्रथमतः इ. स. १६४८ सालीं शिवाजी महाराजानीं घेतला. पुढें इ. स. १७१३ त शाहूमहाराजानीं तो कान्होजी आंग्रे यास दिला, व त्याने इ. स. १७३० त तो पहिले बाजीराव पेशवे यास दिला.

इ. स. १७७६ त सदाशिवराव भाऊ तोतया ( हा सदोबा नावाचा एक कनोजा ब्राह्मण होता ) हा कोंकण प्रांत काबीज करीत करीत बोरघाटापर्यंत आला. त्या ठिकाणीं मराठ्यानीं त्याला अडथळा केला, परंतु त्याना न जुमानता त्यानें बोरघाट आपल्या ताब्यात घेतला, आणि राजमाची किल्ल्याच्या सुभेदारानें काहीं एक तक्रार न करता तो किल्ला त्याचे स्वाधीन केला. ह्या तोतयाचें प्रस्थ बरेंच माजल्यामुळें पेशव्याच्या दरबारीं मोठी गडबड होऊन गेली. नाना फडनविसाने त्याच्याशीं तहाचें बोलणें सुरू केलें. ह्या सर्व गोष्टींमुळें तो तोतया इतका फुगून गेला, कीं सर्वांत आपणच श्रेष्ठ व सर्व महाराष्ट्र देशाचे आपणच अधिपती असें त्याला वाटूं लागलें. पुढें तो बेसावधपणें वागू लागला, आणि त्याच्या सैन्याची पूर्वीची शिस्त मोडली. अशा रीतीनें घमेंडीत वर्तत असता पेशव्यांच्या दोन सरदारांनीं त्याच्यावर अकस्मात हल्ला करून त्याच्या सैन्याची दाणादाण करून दिली. सदोबा मुंबईस पळून गेला, आणि त्याला पुढें आंग्र्यानें पकडून पुण्यास पाठवून दिलें. तेथें त्याला हत्तीच्या पायीं देऊन ठार मारिलें. इ. स. १८१८ त कांहीं एक प्रयास न पडतां हा किल्ला इंग्लिशांचे हातीं आला.

●

## शिवनेरी

श्री राजा शिवछत्रपतींचा जन्म, पुणें जिल्ह्यामध्ये त्याच्या उत्तरेस पसरलेल्या सह्याद्रीच्या रांगेतील ज्या दुर्गम किल्ल्यावर झाला, त्याचें नाव शिवनेरी, शिवनेरी दुर्गांनीं वेढलेला आहे. पूर्वेस नारायणगड, उत्तरेस हरिश्चंद्रगड, पश्चिमेस चावड, हडसर, जीवधन, आणि दक्षिणेस राजमाची–ढाक येणेप्रमाणें चहूं दिशानीं पठावर सोंगट्या मांडाव्यात तसे दुर्ग आहेत. ऐन शिवनेरीचा डोंगर, त्याच्या दक्षिणेकडील लेण्याद्री रांग या सर्व डोंगरामध्यें सुमारें दीडशें लेणीं आहेत. या लेण्यातील ब्राम्ही लिपींतील शिलालेखांमध्यें कल्याण भडोच इत्यादि सुविख्यात बंदरातील व्यापाऱ्यांचे उल्लेख आहेत. शिवनेरीच्या पायथ्याचें जुन्नर म्हणजे जुन्निनगर–जुनें नगर किंवा यज्ञनगर. हें नगरही अति प्राचीन आहे. हा सर्व प्रदेश सातवाहन या महाराष्ट्रांतील सुविख्यात राजकुलाच्या राजवटींत खूपच भरभराटींत होता. जुन्नरच्या पश्चिमेस अदमासें २५ कि. मी. असलेल्या नाणेघाटाच्या माथ्यावरील गुहेमध्यें सातवाहन कुळानें केलेल्या प्रचंड यज्ञांचा उल्लेख असलेला शिलालेख कोरला आहे. अशा परिसरातील शिवनेरी किल्ला, शिवछत्रपतींचा जन्म त्यावर झाल्यामुळे महाराष्ट्राचें पुण्यतीर्थ झाला आहे.

नाणेघाट, जीवधन, चावड, हडसर आदि शैलकृत्यें जशी सातवाहन कुलाची निर्मिति, तसाच शिवनेरी किल्लाही सातवाहनानींच निर्माण केला.

सातवाहनानंतर महाराष्ट्र राज्यामध्यें चालुक्य, राष्ट्रकूट इत्यादि राजवटी नांदल्या. त्याच्या ताब्यांत शिवनेरी आणि त्या भोंवतालचा प्रदेश होता इ. स. ११७० ते १३१८ पर्यंत शिवनेरीवर यादव घराण्याची सत्ता होती. त्यानंतर महाराष्ट्रावर यावनी शासन सुरू झालें. इ. स. १४४३ मध्यें शिवनेरी मलिक उत्तुजार नामक बहमनी सरदाराच्या स्वाधीन झाला. मग पुढें कधीं तो निजामशाहींत होता, तर कधीं आदिलशाहींत.

इ. स. १६३० सालीं आदिलशाही शासनामध्यें विजयराव सिधोजी विश्वासराव हा शिवनेरीचा किल्लेदार होता. शहाजीराजे भोसले यावर अरिष्टाच्या राशी कोसळत होत्या, म्हणून त्यांनीं आपली गर्भवती पत्नी जिजाऊबाईसाहेब यांस, किल्लेदार विश्वासराव याच्या आश्रयास आणून ठेवलें. गडावर शिवाई देवीचें

ठाणें. जणू तिच्याच कृपेमुळें दि. १९ फेब्रुवारी, १६३० या दिवशीं, फाल्गुन वद्य तृतीया या तिथीस, सूर्यास्तानंतर जिजाऊबाईसाहेबांच्या उदरीं शिवछत्रपती जन्मले !

मात्र पुढे शिवछत्रपतींनीं अनेकदा प्रयत्न करूनही शिवनेरी स्वराज्यांत दाखल व्हायला इसवी सनाचा १७१६ उजाडावा लागला.

शिवनेरीची निर्मिति सातवाहनांनीं केली. किल्ला चढत ज्या खडकांतल्या पायऱ्या कोरल्या आहेत, त्या बहुत प्राचीन. गडाचे एकूण सात दरवाजे. ते निरनिराळ्या काळीं बांधले, उभारले गेले आहेत.

पाच दरवाजे चढून गेलें, कीं उजव्या हाताला कड्यात कोरलेल्या श्री-शिवाईच्या देवळासमोर आपण उभे राहतो. शिवाई हें दैवत या परिसरांत सुप्रसिद्ध आहे. तिच्याच कृपेनें शिवप्रभूंचा जन्म झाला, या धारणेमुळें भारतीयां-साठीं तें एक अति पवित्र स्थान झालें आहें. आणखी दोन दरवाजे ओलांडून गेलें, कीं मग किल्ल्यात प्रवेश होतो. डाव्या हातास एक प्रचंड पडकी इमारत लागते. तिचें नांव अंबरखाना म्हणजे धान्याचें कोठार. तसेंच उत्तरेकडे जाऊं लागलें, कीं अति उत्तम पाणी असलेलीं गंगाजमना नामक जोडटाकीं लागतात. याखेरीज किल्ल्यावर पुष्कळ टाकी आहेत.

तसेंच पुढें जावें, तर उजव्या हातास निमकग्याची मोठी कमान आणि दोन मनोरे आढळतात, आणि समोरच श्री शिवरायांचें जन्मस्थान असलेली दगडी इमारत आहे. पूर्वी ही इमारत पार ढासळली होती. करवीरकर छत्रपतींच्या प्रेरणेमुळे ती पुन्हा उभी राहिली. तिच्या अलिकडे महाराष्ट्रशासनानें उभारलेली शिवकुंज नामक इमारत आणि तींत जिजाऊबाईसाहेब आणि बालक शिवप्रभू याचे पंचरसी धातूचे पुतळे आहेत. या इमारतीच्या दक्षिणेस उत्तवट्यावर कोळी चौथरा नामक ठिकाण आहे. याच चौथऱ्यावर इ. स. १६५० मध्यें मुगलांनीं या प्रदे-शातील हजारो कोळी सैनिकांचा डाका उडावला.

शिवनेरी किल्ल्याचा आटोप तसा लहान आहे. सगळा किल्ला पाहायला एक दुपार पुरते. सकाळीं पुण्याहून एस. टी. नें निघालें असता सायंकाळच्या गाडीनें परततां येतें.

●

## हडसर

शिवनेरीच्या पश्चिमेस, जुन्नरपासून पांचसहा मैलावर, जुन्नर घाटघर सडकेच्या उजव्या हातास हडसर किल्ला उभा आहे. त्याच्या जवळ हडसर हें लहानसें गाव, त्यातूनच वर चढायची वाट फुटते.

हडसर किल्ल्याच्या पश्चिमेस त्याच उंचीची दुसरी टेकडी आहे; ती आणि किल्ला, यांच्यामुळें निर्माण झालेल्या घळींतून मार्ग वर चढतो. मार्गावर तीनशें बांधीव पायऱ्या आहेत. त्या चढून गेल्यावर काहीं खडकांत कोरलेल्या पायऱ्या लागतात, आणि त्यांच्या पुढें तसाच खडकांतून कातून काढलेला दरवाजा

आत गेलें कीं पुनः तशाच खडकातल्या पायऱ्या आणि त्याच जातीचें द्वार. पुढें लागतो किल्ल्याचा माथा.

माथ्यावर एक महादेवाचें देऊळ आणि त्याच्या शेजारीं पाण्याचें तळें. तिथून पश्चिमेकडे खडकाच्या पोटात कोरून काढलेल्या तीन मोठमोठ्या कोठ्या आणि त्यांच्या पुढें भव्य पटांगण– तेंही कोरलेलें. या कोठ्यांपैकीं उजवीडावीकडील दोन कोठ्या मधल्या कोठीशीं नव्वद अंशाचा कोन साधून खणल्या आहेत. प्रत्येक कोठीच्या मार्यपट्टीवर गणेशप्रतिमा आहे.

सरळ पूर्वेकडे एक देवीचें देऊळ आणि त्यापुढें एकुलता बलदंड बुरूज आहे.

या किल्ल्याची रचना, खडकातील कोरकाम इत्यादींवरुन किल्ल्याचें बांधकाम सातवाहन कालात झालें असल्याचें ध्यानीं येतें.

●

## चावंड

जुन्नर–घाटघर मार्गापासून डाव्या हातास, हडसरपासून सुमारें पाचसहा मैलांवर चावंडचा किल्ला. तळात चावंड याच नांवाचें लहानसें गांव. त्यामधूनच गडावर जायची वाट फुटते.

चावंड किल्ल्याच्या चहूं अंगानीं तुटलेला उभा कडा आहे. पश्चिमेकडील कड्यांत पूर्वी वेलीच्या साहाय्यानें चढावें लागे.

अलिकडे तिथें पाऊल ठेवण्याजोग्या खोबणी कोरून आधारासाठीं गज लावले आहेत. या खोबणी संपल्या, कीं पुढें खडकात कोरलेल्या पायऱ्या. पायऱ्यांच्या माथ्यावर ऐन खडकांत कोरलेला हडसरसारखाच दरवाजा

माथ्यावर चावंडाबाईचें देऊळ आहे. देखणी मूर्ति.

या किल्ल्यावरही हडसरप्रमाणेंच खडकांत कोरलेल्या कोठ्या आहेत. वाटेंत एका उध्वस्त देवळाचे अवशेष आहेत. या तिन्ही कोठ्या मात्र एका रेषेंत कोरल्या आहेत.

जवळच पाण्याचीं सात टाकीं आहेत एकात एक गुतलेलीं पैकीं पहिल्या तळ्याच्या ऐलीकडे सुरेख द्वार आहे.

सन १४८७ मध्यें निजामशहा मलिक अहमद यानें हा किल्ला जिंकला. दुसरा बुरहान निजामशहा, याचा अज्ञान पुत्र बहादूरशाह हा इ. स. १५९४ मध्यें वर्षभर या किल्ल्यावर कैदेंत होता. सन १६३७ मध्यें शहाजीराजानीं हा किल्ला मोगलास दिला. १८१८ मध्यें इंग्रजानीं हा किल्ला मराठ्यापासून घेतला, तेव्हा एका बाजूस असलेली थोडकी तटबंदी त्यांनीं तोफांच्या भडिमारानें पाडून टाकली.

•

## जीवधन

सातवाहन राजकुळानें कोरलेला सुविख्यात नाणेघाट ज्याच्या कुशीत आहे, असा हा ऐन घाटमाथ्यावरचा जीवधन किल्ला जुन्नरच्या पश्चिमेस सुमारें सोळा मैलावर उभा आहे.

ऐन तळात घाटघर गाव. त्याच्या पश्चिमेस जीवधन. अदमासें हजार फूट वाट अगदीं गच्च रानांतून पुढें एक चिंचोळी घळ आहे. तींत सुमारें पांचशें फुटी चढावर उंच उंच पायऱ्या कोरल्या आहेत. अदमासे तीनशें पायऱ्या चढून गेलें, कीं मग राजगडाच्या बालेकिल्ल्यासारखा पन्नास फुटी उभा कडा. त्यात कोरलेल्या खोबणी. त्यात बोटें टेकवीत, कड्याशीं छाती घाशीत वर चढावें लागतें.

माथ्यावर पोंचलें कीं एक अमृतमधुर पाण्याचें टाकें लागतें. ऐन उभारावर देवीचें देऊळ, आणि त्याच्याजवळ खडकाच्या पोटात कोरलेली प्रचण्ड कोठी. हुडसर चावंडसारखीच. तसेंच तें कोरीव प्रवेशद्वार.

पश्चिमेकडून किल्ल्यावर चढायचा सुबक मार्ग खडकात कोरला होता. १८२० सालीं इंग्रजांनीं केलेल्या तोफांच्या भडिमारामुळें सध्या तो अगदीं उध्वस्त झाला आहे.

इ. स. १६३३–३४ मध्यें या अतिदुर्गम किल्ल्यावर मूर्तजा निजामशहा नामक कुणी निजामशाही वंशज कैदेंत होता. शहाजीराजे भोसले एखाद्या वादळाप्रमाणें या किल्ल्यावर पोंचले, आणि त्या लहानग्यास कैदेंतून सोडवून ते संगमनेराजवळील पेमगिरीकडे निघाले. तिथें त्याला मांडीवर बसवून त्यांनीं तख्तनशीन केलें.

ऐन घाटमाथ्यावर असल्यामुळें पश्चिमेकडील कोंकण आणि पूर्वेकडील घाट-प्रदेश– हे दोन्ही डोंगरांनीं दाटलेले भाग या किल्ल्याच्या माथ्यावरून सहज दृष्टि-पथात येऊं शकतात.

## लोहगड

पुण्यसरिता इंद्रायणीच्या खोऱ्यात खंडाळ्याहून खोपोलीस उतरणाऱ्या पारंपरिक मार्गावर जणू पाहाराच करण्यासाठीं मळवलीजवळ किल्ल्याची एक जोडगोळी उभी आहे. पूर्वेकडील विसापूर आणि मावळतीकडील लोहगड या दोन्ही किल्ल्यांच्या उत्तरे-कडून इंद्रायणी वाहते, तर दक्षिणेकडून पवना. इंदर मावळ आणि पवन मावळ हीं दोन्ही मावळें या किल्ल्यामुळें नटावलीं आहेत. पवनमावळात तुंगी आणि तिकोना असे आणखी दोन किल्ले छात्या उभावून ठाकले आहेत पण या चारही किल्ल्यात बळकटी, रचना, उपयोग या सर्वच दृष्टींनीं लोहगड अजोड आहे.

लोहगडची रचना होऊन फार वर्षें झालीं. तो बहुधा सातवाहनकालीन म्हणजे दोन हजार वर्षांपूर्वीचा असावा. कदाचित् तो त्याहूनही प्राचीन असेल. शेजारीं

असलेलीं लेणीं हें गडाच्या प्राचीनपणाचे प्रबल प्रमाण आहे. तें काहीं का असेना, सातवाहन, चालुक्य, राष्ट्रकूट, यादव इत्यादि सर्वच राजवटी लोहगडानें पाहिल्या आहेत. इ. स. १४८९ मध्यें मलिक अहमदच्या निजामशाहीच्या स्थापनेनंतर लोहगडावर यावनी शासन सुरू झालें. इ. स. १५६४ मध्ये अहमदनगरचा दुसरा बुऱ्हाणशहा काहीं दिवस लोहगडवर कैदेंत होता. इ स. १६४८ मध्यें शिवाजी महाराजानीं लोहगड घेतला. राजा जयसिंगाशीं झालेल्या तहाप्रमाणें त्याना तो मुगलास द्यावा लागला. पण १६७० मध्यें महाराजाच्या निधड्या छातीच्या सेनानींनी माळा लावून तो पुन्हा जिंकला. पेशवाईत नाना फडणविसाचा कारभारी धोंडोपंत नितसुरे याच्याकडे तो होता. मराठी राज्य बुडाल्यावर १८४५ पर्यंत इंग्रज फौज लोहगडावर होती.

लोणावळ्याहून पुण्यास जाताना मळवली हें पहिलेंच स्टेशन आहे. सगळ्या लोकल्स आणि पॅसेंजर गाड्या तेथें उभ्या राहतात. मळवलीस उतरलें, कीं दक्षिणेस लोहगड दिसतो. अगदी जवळ त्याचें विंचूकाटा टोंक पुढें आलेलें आहे. स्टेशनजवळच सुप्रसिद्ध रविवर्मा लिथो प्रेस आहे. प्रेसचा परिसर डाव्या हातास टाकून पुढें निघालें, की भाजें नावाचें लहानसें गाव लागतें. डाव्या हाताची वाट सुप्रसिद्ध भाजें लेण्याकडे जाते. उजवी वाट शेतें पार करून चढणीस लागते, तोंवर डावीकडील विसापूर व उजवीकडील लोहगड अगदीं हाताशीं दिसू लागतात. या दोन्ही किल्ल्यामधील अंतर जेमतेम एक किलोमीटर आहे. मधली चिंचोळी खिंड ओलांडून उजवीकडे वळावें. डाव्या हातास लोहगांव ही लोहगडची पेठ आहे. ती तशीच डावीकडे टाकून वाट लोहगड चढू लागते. ऐन दरवाजाखालीं वाट वळणावळणाची आहे. चार मजबूत दरवाजे पार केल्यावर आपला प्रवेश लोहगडमध्ये होतो.

लोहगडची उंची समुद्रसपाटीपासून १०२४ मीटर आहे गडाभोंवतालीं सुरेख झाडी आहे. अलिकडे ती कमी होऊ लागली असली तरी आजही ती दृष्टीला सुखावणारी आहे. हवा नेहमीच सुखद असते उन्हाळ्यात गडावर भरपूर वारा वाहात असतो.

लोहगडचे चारही दरवाजे फार मजबूत असून त्याची रचना केवळ अपूर्व अशी आहे. किल्ल्यावर गेल्यावर डाव्या हातास एक दगडी इमारत आहे. तींत दोन मुसलमानी थडगीं आहेत. या इमारतीपलिंकडे पडके अवशेष आहेत तिथें

पूर्वी तदर होती. इथून पुढें ३० मीटर उन्नीची टेकडी आहे. तिच्या उजव्या अगास लोमेश ऋषींचे तपश्चर्यास्थळ असलेली ऐसपैस गुहा आहे ही गुहा बौद्धगुहांपैकीं नव्हे, त्याच्याही पूर्वीची आहे. टेकडीवर किल्लेदाराच्या वाड्याचे अवशेष आहेत उजव्या हातास एका मुसलमान पिराची कबर आहे. टेकडीच्या माथ्यावर एक भली मोठी खाच आहे. तिच्यात उतरण्यासाठीं पायऱ्या आहेत. त्याच्या कडेला एक शिलालेख आहे तो आता अस्पष्ट होत चालला आहे "शके १७११ मध्यें हें तळें बाळाजी जनार्दन भानू (नाना फडणवीस) यानीं बांधलें" असा त्याचा आशय आहे अलिकडे डाव्या हातास दक्षिणेकडे त्र्यंबकेश्वराचें देऊळ आणि एक दोन तळीं आहेत. त्याशिवाय एक लहानशी अतिशय रुचकर पाणी असलेली खाव आहे. टेकडीवरून सरळ पुढे गेलें, कीं उत्तरेकडे किल्ल्याचा गाभा संपतो आणि विंचुकाटा नावाची अदमासें १३८० मीटर लांबीची सोंड लागते ही दोन्ही बाजूंनीं बांधली गेली असून अगदीं टोंकाशीं असलेला बुरूज सबंध इद्रायणी खोऱ्यावर पहारा करीत आहे.

लोहगडला पाहायला एक दिवस पुरतो. पहाटेच्या गाडीने मळवलीस उतरून चालू लागावें आणि दिवसभर गड पाहून सायंकाळीं परतावें. एकदोन दिवसाच्या सुट्टींत लोहगडावर जाऊन परतणें सहजशक्य आणि आनंददायी आहे

लोहगडच्या अति उच्च भागावर उभे राहिलें असतां दक्षिणोत्तरेकडील डोंगररांगा, त्यांमधून उठणारे तुंगी, तिकोना, विसापूर, कुवारीगड, इत्यादि गिरिदुग, माथेरानचे विस्तीर्ण पठार, वळवण आणि फागणें जलाशय असा हृदयंगम देखावा दिसतो आणि मन कौतुकानें आणि विस्मयानें भरून येते. इथूनच कालें आणि भाजें ही दोन्हीं लेणींही सहज दिसू शकतात.

मळवलीपासून लोहगडचा मार्ग तसा सोपा आहे. फारसा कुठें चढ नाहीं. भाज्यापासून डोंगरापर्यंतच्या शेतांडींतून जाणारी वाट वगळता इतर मार्ग पैस आहे गडावर वस्ती नसल्यामुळें अतिशय स्वच्छ पाण्यावेगळ्या वस्तू बरोबर न्याव्या लागतात. विहिरीचे पाणी मात्र अतिशय पाचक आणि औषधी गुणधर्म असलेलें आहे.

●

## विसापूर

लोहगडाच्या पूर्वेस लोहगडापासून एका गोळीच्या टप्प्याच्या आत पूर्व-पश्चिम पसरलेला विसापूर किल्ला लोहगडापेक्षा आकारानें अधिक मोठा आहे. याला दक्षिणेकडे आणि उत्तरेकडे दोन दरवाजे होते पण सध्या त्यांच्या केवळ खुणा उरलेल्या आहेत. उत्तर दिशेनें मळवली स्टेशनजवळच्या रविवर्मा प्रेसचे मागून आणि भाजें गावामधून अशा दोन वाटानीं वर चढता येतें. दक्षिणेकडली वाट लोहगडाकडून या किल्ल्याच्या तटाखालून मधील वेचकटातून वर चढते

उत्तर दिशेला एकसारखा भला भक्कम आणि अतिशय सुंदर तट बांधलेला आहे इतका सलग आणि सुंदर तट महाराष्ट्रात क्वचितच आढळतो. या तटास जागोजागीं बुरूज बांधलेले आहेत. किल्ल्याच्या मधोमध एक उंच टेकाड आहे, आणि त्याच्या उत्तरेस कित्येक इमारतींचे अवशेष आढळतात या किल्ल्यावर पाण्याचीं भरपूर टाकीं आहेत आणि एक नवल असें, कीं मारुतीचीं कित्येक रावळें सर्वत्र आढळतात. किल्ल्यावर भरपूर मोकळें मैदान आहे.

इ स. १८१८ सालीं इंग्रजानीं जेव्हा लोहगडावर हल्ला चढविला, तेव्हा अगोदर त्यानीं विसापूर किल्ला हस्तगत केला. लोहगड विसापुरावरील तेन तोफेच्या माऱ्यात असल्यामुळें निरुपायानें मराठ्याना लोहगडही सोडून निघून जावें लागलें.

उत्तरेकडील वाटेनें किल्ल्यात शिरलें, कीं उजव्या हातास दारूगोळ्याच्या कोठाराची इमारत आहे. वर छत नसलें तरी चहू बाजूंच्या भिंती कायम आहेत त्या इमारतींत रात्रीं मुक्काम करता येतो. पाणी मुबलक असल्यामुळे एखादी रात्र या किल्ल्यावर सुखाने राहता येतें

●

## चाकणचा किल्ला

पुणें नाशिक रस्त्यावर पुण्यापासून १८ मैलांवर चाकणचा भुईकोट किल्ला आहे. हा किल्ला सामान्यपणें चौकोनी आकाराचा होता. यास चहू बाजूंनीं पुष्कळ बुरूज रचलेले होते. तट भरपूर उंच आणि रुंद बांधणीचा होता. किल्याभोंवतालीं ३० फूट खोल आणि १५ फूट रुंद असा खंदक होता. तो सतत पाण्यानें भरलेला असे. किल्ल्याचा मुख्य दरवाजा पूर्वेकडे होता. तो ओलांडल्यावर आंत शिरण्यासाठीं आणखी काहीं दरवाजे ओलांडावे लागत. सध्या हा किल्ला अगदीं मोडकळीस आलेला आहे पश्चिमेकडून पूर्वेकडे भला थोरला रस्ता केलेला असून तो पूर्वेकडे चक्रेश्वराच्या देवळापर्यंत जातो. या देवळाजवळ वराहावताराची एक मूर्ति आहे.

या किल्ल्याचा इतिहास बराच जुना असला तरी इ. स. १४४३ पासून पुढील उल्लेख नोंदलेले आढळतात. त्या वेळेस हा किल्ला बहमनी राजवटीच्या स्वाधीन होता. इ स. १५९५ मध्यें अहमदनगरचा बहादूरशाह यानें हा किल्ला शिवाजीराजाचे आजे मालोजी भोसले यास दिला इ स. १६४७ मध्यें शिवाजीराजांनीं चाकणचा किल्लेदार फिरंगोजी नरसाळा यास वश करून हा किल्ला घेतला. इ स. १६७२ मध्यें मुगल सेनापती शाहिस्तेखान यानें चाकणला वेढा घातला. फिरंगोजी नरसाळ्यानें अतिशय शूरपणें किल्ला लढविला. पण निरुपाय होऊन किल्ला त्यास सोडावा लागला.

भुईकोट किल्ला असला तरी शिवकालामध्यें याचे भोंवतालीं कित्येकदा युद्धें लढविलीं गेलीं आहेत

## विचित्रगड

अदमासें ३॥ हजार फूट उंचीचा विचित्रगड किंवा रोहिडा, हा ऐन मावळात वसलेला किल्ला भोरच्या दक्षिणेस सुमारें ६ मैलांवर आहे. पायथ्याशी बाजारवाडी नावाचे एक लहान खेडे आहे. तिथून पश्चिमेकडे गडाची चढण सुरू होते. चढण तशी फार कठिण नाहीं दाड चढून माथ्याशीं पोहोंचलों, कीं आपण गडाच्या पहिल्या दरवाजाशीं पोहोंचतों. गडांत शिरण्यापूर्वी आणखी दोन दरवाजे ओलांडावे लागतात. पहिल्या दरवाजाच्या माथ्यावर गणेशपट्टी, तर दुसऱ्या दरवाजाच्या माथ्यावर दों बाजूस सिंह आणि शरभ हीं यादवकालीन चिन्हें आहेत तिसऱ्या दरवाजाच्या माथ्यावरही हत्ती आहेतच हत्तींच्या खालीं नष्ट होऊ लागलेले दोन शिलालेख आहेत.

तिन्ही दरवाजे ओलांडून आत गेल्यावर सदर म्हणजे कचेरी हें ठिकाण आढळतें. तिच्या पाठीमागें भैरवाचें देऊळ आहे. भैरवासमोर दीपमाळ आणि कांहीं स्मारक शिला आहेत

विचित्रगड हा काहीं फार मोठा किल्ला नाहीं. वरतीं सपाटी जवळ जवळ नाहीं म्हटलें तरी चालेल. भोंवतालीं असलेले पाच सहा बुरूज, कांहीं ओहोरलेलीं तळीं आणि पडझड होऊ लागलेला तट एवढेच इतिहासकालीन अवशेष सध्या शिल्लक आहेत. पूर्वेस फत्तेबुरूज या नावाचा एक बुरूज आहे. त्यावर ढालकाठी म्हणजे निशाण रोवण्याचा गोल ओटा आढळतो.

गड पाहायला तास दीड तास पुरतो कांहीं घरांचे उध्वस्त अवशेष वगळतां प्राचीनकालीन घटनांच्या कसल्याच खुणा गडावर शिल्लक नाहींत

शिवकालामध्ये एका बदचालीच्या महारास शिवाजीराजांनीं एका बुरूजाच्या पायात पुरण्याचा हुकूम केला होता

जेधे, खोपडे, इत्यादि शिवकालीन घराण्याचा या किल्ल्याशीं घनिष्ट संबध होता. पुढें भोरच्या पतसचिवानीं औरंगजेबाशीं झुजून हा किल्ला पुन्हा स्वराज्यात दाखल केला. संस्थानें विलीन होईपर्यंत राजगड, प्रचंडगड, तुंग, तिकोना या किल्ल्यांप्रमाणेंच विचित्रगडही भोरकराकडेच होता. संस्थान होतें तोंपर्यंत किल्ल्याची जुजबी व्यवस्था पाळली जात असे. आता त्याकडे सर्वांचेंच दुर्लक्ष झालें आहे.

●

## ढाकचा किल्ला

कर्जतच्या पूर्वेस अदमासें ६ मैलावर हा किल्ला आहे. यास जाण्याची दुसरी वाट लोणावळ्याहून फुटते. लोणावळ्यापासून अदमासें १० मैल असलेल्या वळवंडें गावातून उत्तरेकडे अदमासें ८ मैलावर हा किल्ला उभा आहे प्रत्यक्ष किल्ल्यावर एखादा तट आणि पाण्याचें टाकें यापरतें आणखी काहींहीं नाहीं. वरतीं कोळी जमातीची एक लहानशी वस्ती आहे

मात्र या किल्ल्याच्या पश्चिम अंगास दक्षिण दिशेकडे एक सुळका आहे. त्या सुळका आणि किल्ल्याचा डोंगर याच्यामधून उतरून किल्ल्याच्या पश्चिम कड्याच्या पोटाखालून चाललें, म्हणजे आपण एका गुहेच्या तळाशीं उभे राहतों. या गुहेंत जाण्याचा मार्ग सोपा नाहीं. खडकात खोदलेल्या काहीं खोबणींच्या आधारें वर चढल्यावर पुढें कड्यामध्यें एक खांब ठेवलेला आढळतो. त्याला कोरलेल्या पायऱ्यांवरून वर चढावें, तों आपण गुहेंत टांगलेल्या एका वेलापाशीं जाऊन पोहोंचतों. या वेलाच्या आश्रयानें अदमासें ३५ फूट वर चढून गेल्यावर आपण गुहेत दाखल होतों.

गुहेंत भैरवाची एक पाषाणमूर्ति आहे. शेजारीं एक थंड पाण्याचें टाकें या दुर्गम वाटेनें बळी द्यायच्या बकऱ्यासुद्धा वर चढून देवाचे भक्त गुहेंत येतात, आणि देवासमोर त्याचा बळी देऊन, रांधून दिवस मावळण्याच्या आत खालीं उतरून जातात. वयात आलेल्या स्त्रियांनीं या देवाचें दर्शन घेऊं नये असा संकेत आहे. या गुहेंतून समोरील निसर्गाचें मोठें उग्र दर्शन घडतें.

## तुंगी

लोहगडाच्या दरवाजाच्या तळाशीं उभें राहून दक्षिणेकडे नजर टाकली, कीं आकाशात शिरणारें एक उंच टोक नजरेंत भरतें. हा तुंगी किल्ला. फागणें धरण झालें नव्हे तोंपर्यंत लोहगडापलिकडे असलेल्या आंबेगावीं उतरून, पवना नदी पार करून तुंगीच्या पायथ्याशीं असलेल्या तुंगी गावापर्यंत जाता येत असे. सध्या धरणामुळे तो मार्ग बंद झाला आहे. लॉंच मिळाली तरच तुंगी गांवापर्यंत पोहों-चता येतें. लोणावळ्याहूनही एक खिंड पार करून तुंगीपर्यंत जाता येतें.

तुंगी गावाहून निघालें, कीं खालीं असलेल्या उत्तराच्या झाडावरून खालीं वाट जाते किल्ल्याचा चढ उभा आहे. दरवाजा एकच आत शिरल्यावर सदरेची इमारत आणि एक देऊळ लागतें तें उजव्या हातास टाकून पुन्हा वर चढलें, कीं चवाळेंभर जागा असलेल्या बालेकिल्ल्याच्या माथ्यावर पोहोंचता यतें ऐन माथ्यावर एक लहानसें तुंगाई देवीचें देऊळ आहे. देवळास प्रदक्षिणा घालण्यास अगदीं जेमतेम रस्ता आहे.

बालेकिल्ल्यावरून भंवतालचा प्रचंड, डोंगरांनीं वेढलेला प्रदेश दिसतो. संस्थानें विलीन होईपर्यंत हा किल्ला भोरकराकडे होता. विलिनीकरणानंतर किल्ल्याची व्यवस्था पाहण्याचें कारणच कोणास उरलें नाहीं.

## कुवारी

पुण्याहून बसनें मुळशीस यावें आणि तिथून लॉंचनें कुवारी गडाच्या पायथ्याशीं पोहोंचावें किंवा लोणावळ्याहून शिवाजी आय् एन् एस्. वरून आठ दहा मैल अंतर चालावें म्हणजे कुवारी गडाच्या पायथ्याशीं पोहोंचता येतें. आग्नेय दिशेस आणि पश्चिमेस असे या किल्ल्यास दोन दरवाजे आहेत. दोन्हींकडून चढ काहीं फारसा अवघड नाहीं. किल्ल्याचा घेर बराच मोठा आहे. सभोंवतालीं भक्कम तट आणि बुरूज आहेत. पाण्याचीं दोन मोठालीं तळीं आहेत. किल्ल्याच्या तटावर

आणि मध्यभागीं पाचसात लहानमोठ्या तोफा इथें तिथें पडलेल्या आहेत.

किल्ल्यावरील मुख्य आकर्षण म्हणजे त्यावरील कुवारी देवीचे मंदिर. पूर्वी कदाचित् वर छप्पर असेल, मात्र आज कुवारी देवीची भव्य मूर्ति पुन्हा पावसांत भिजत उभी आहे. इ. स. १८१८ पर्यंत देवीच्या पूजनाची उत्तम व्यवस्था होती. देवीचे कांहीं दागिनेही होते, पण इंग्रजांनीं १८१८ मध्यें किल्ला घेतल्यावर ते दागिने त्यांनीं मुंबईस आणून मुंबादेवीच्या पुजाऱ्याच्या स्वाधीन केले असें म्हणतात.

या किल्ल्यावरून आंबवणें घाट, मुळशीचें धरण, तळकोकण, घाटमाथा, त्यावरील डोंगरदरे इत्यादि बराच मुलुख दिसूं शकतो

लोणावळ्याहून किंवा पुण्याहून मुळशीमार्गे किल्ल्यापर्यंत पोहोंचून एका दिवसात परतता येतें.

## तिकोना

कामशेटला उतरून तिथून बसनें फागणें धरणापर्यंत पोहोंचावें. धरणाची भिंत ओलांडून पलिकडे गेलों, कीं आपण तिकोना किल्ल्याच्या पायथ्याशीं येतों

किल्ल्याचा चढ कांहीं फारसा अवघड नाहीं. दरवाजांतून आत शिरताक्षणीं खडकात खोदलेलें एक शिलाहारकालीन किंवा त्याच्याही पूर्वीचें देऊळ लागतें. गाभाऱ्याच्या मधोमध माथ्यावर कमळाची सुरेख आकृती कोरलेली आहे. शेजारींच खडकाच्या पोटात खोदलेलें एक सुंदर टाकें आहे. पाणी अतिशय स्वच्छ आणि गार असतें. तिथून पुढें निघालें, कीं बालेकिल्ल्याचा उभा चढ लागतो. त्यावर सहा ते आठ इंच रुंदीच्या आणि दीड ते दोन फूट उंचीच्या सुमारें ४० ते ४५ पायऱ्या आहेत. चढ थेट छातीवर येणारा आहे. पायऱ्याच्या बाजूस गज ठोकले आहेत म्हणून वर चढता येतें. गजाच्या अभावीं चढ कठिण आहे.

माथ्यावर पोहोंचलें, कीं दक्षिणेकडे असलेला पौड तालुका, पश्चिमेकडला सुधागड पेटा, पूर्वेस मावळ, इतका प्रदेश न्याहाळतां येतो. या किल्ल्यावरून पेणपर्यंतचा सर्व प्रदेश न्याहाळतां येतो. पेणवरून घाटमाथा चढून येणारें घाट या किल्ल्यावरून आटोक्यात ठेवतां येतात.

# कुलाबा जिल्हा :

## रायगड

श्रीशिवरायाची राजधानी, म्हणून प्रसिद्ध असलेला रायगड हें महाराष्ट्रिकाचें तीर्थक्षेत्रच आहे. जसें काशीसी जावें नित्य वदावें, तशीच जन्मातून एकदां रायगडाची वारी करण्याची इच्छा प्रत्येक देशाभिमानी महाराष्ट्रिकाच्या मनीं वास्तव्य करीत असते. रायगडाशीं असंख्य पुण्यस्मरणें गुंफलेलीं आहेत. या गडाचा विशेष असा, कीं महाराष्ट्रातील सर्वच गडाशीं तुलना करता यावरील ऐतिहासिक अवशेषाची संख्या कितीतरी अधिक आहे.

### परिसर

रायगड कुलाबा जिल्ह्याच्या महाड तालुक्यात आहे. महाड–महाहाट हें प्राचीन बंदर. मुंबई गोवा मार्गावरील तें एक प्रमुख ठाणें. पुण्याहून महाबळेश्वर पोलादपूर किंवा भोर वरंधघाट मार्गें तिथें पोहोंचता येतें. तिथन अदमासें पंधरा मैल उत्तरेकडे रायगड आहे. तो गांधारी आणि काळ या दोन नद्यांनीं वेढलेला आहे. भवतालीं डोंगरदाटी आहे, तीमुळें अगदीं जवळ पोंचेपर्यंत तो ध्यानीं येत नाहीं.

पैकीं पूर्वेकडून मढ्या, कावळ्या, शेवत्या, शिंगापूरची नळी या घाटवाटा रायगडाच्या खोऱ्यात उतरतात. महाडजवळ गांधारीच्या तीरावर डोंगरात पाल्यास एक लेण्याचा खूप जुना समूह आहे. या सर्व ऐतिहासिक स्थळानीं

वेढलेला रायगड कोंकणदिवा, लिंगाणा किल्ला, अशा डोंगरखुणा शेजारीं घेऊन एखाद्या दाण्या वाघासारखा माडा ठोकून बसला आहे.

**चढाई** – मुंबईहून रायगडसाठीं एस टी बस मिळू शकते, मुंबई-रायगड या नांवें. पुण्याहून मात्र महाडास गाडी बदलावी लागते. महाड-रायगड गाडी दिवसातून ५।७ खेपा करते ही गाडी पाचाडपर्यंत जाते, तर मुंबई-रायगड गाडी थोडा चढ चढून थेट चितदरवाजापर्यंत पोंचवते

चितदरवाजा हें केवळ नाव. तो आज अस्तित्वांत नाहीं. या खिंडींत उभे राहिलें, कीं समोरचें भव्य निसर्गदृश्य पाहून मन विस्मयचकित होतें समोरच डाव्या हाताला तळात वाडी आहे वाडी ही रायगडाची इतिहासकालीन पेठ गडावरील बाजारपेठेंत ज्या वस्तू वाऱ्यापावसाच्या जोजारामुळें ठेवता येत नसत, त्या गूळमिठासारख्या कित्येक वस्तू पेठेंत मिळत. उत्तरकाळीं गडावरचे किल्ले दारही पेठेंत घरें बाधून राहात असत.

चितदरवाजाशीं उतरलें, कीं उजव्या हाताला लगेच किल्ल्यावर चढायची वाट दिसते ती नीट गडावर नेऊन पोंचविते. मात्र शिवकालामध्यें या वाटेपेक्षा तिच्या पलिकडून खालीं तळात पोचणारी आणि तिथून नाना दरवाजा ओलाडीत गडाच्या चढणीस लागणारी वाट अधिक वाहती होती. आजची वाट तीन टप्पे वगळता तशी फारशी अवघड नाहीं डाव्या हातास काळ नदीचें खोरें आणि पलिकडे उच्च आकाशाशीं भिडणारे सुळके दिसतात. वाळमुऱ्याची खिंड ओलाडून हिरकणी बुरुजाखालीं ऐन गडाशीं भिडलें, कीं जवळजवळ अर्धा किलोमीटर वाट उंच कड्याच्या पोटाखालून जातें पुढें शिवकालामध्यें रचलेल्या पंच्याऐंशीं नव्वद पायऱ्या चढून गेल्यावर गडाचें महाद्वार लागतें. गडावर चढायची आणखी एक मुष्किल वाट आहे, वाघ दरवाजातून वर येणारी. मात्र या वाटेनें अडीचशें मीटर उभा कडा चढावा लागतो. डोंगर दरे भटकायची उत्तम सवय असल्याविना या वाटेनें चढायचें मनात आणू नये.

रायगडाचा माथा समुद्रसपाटीपासून पावणेनऊशे मीटर उंचावर आहे शिवछत्रपति म्हणाले होते, ' गड दीड गाव उंच, चहूबाजूनीं ताशीव कडा. कोठें पाखरू बसूं म्हणेल तर त्यासही जागा नाहीं. ' सभासदानें बखरीत हें नोंदून ठेवलें आहे. गड ऐन कोंकणात आहे. तरी इतक्या उंचीमुळें उन्हाळ्यातही फारसें उकडत नाहीं रात्री सुखद असतात. पाऊस मात्र शें शंभर इंच पडतो ऐन पावसाळ्यात

सगळें धुकटानें वेढलेलें असतें. तेव्हा पावसाळा हा ऋतु गड पाहायला तसा फारसा सोईचा नाहीं.

महाड बंदरातून वरघाटी जाणाऱ्या तीनचार वाटा रायगडाच्या पायथ्याजवळून जातात त्या वाटाच्या पाहणीवरून आणि पाल्याच्या लेण्यामुळें असा तर्क करिता येतो, कीं या किल्ल्याची रचना होऊन अदमासें अडीच ते तीन हजार वर्षें झालीं असलीं पाहिजेत मात्र इतिहासात या गडाची प्रथम नोंद आढळते, ती विजयनगरच्या सम्राटाच्या स्वामित्वाची.

इ स १४३६ मध्यें बहमनी पातशहा दुसरा अल्लाउद्दीन यानें हा किल्ला जिंकला. तिथपासून इ. स १६५६ पर्यंत निजामशाही, आदिलशाही इत्यादि शासनें इथें नादलीं १६५६ मध्यें रायगड (त्या वेळचें नाव रायरी) आदिलशाहीचा सरदार जावळीचा मोरे याजकडे होता. याच सुमारास सह्याद्रीवर आणि त्याच्या दुर्गांवर अतिशय प्रेम करणाऱ्या श्रीशिवछत्रपतींनीं हा किल्ला चहूं अंगानीं न्याहाळला याबर त्यांचे प्रेम बसलें. तो किल्ला त्यानीं मोऱ्यापासून जिंकून घेतला. आपली नवी राजधानी याबर उभारावी, असे त्याच्या मनीं उपजलें. त्याच्या आज्ञेनें इमारतीखात्यावरचा प्रमुख हिरोजी इदुलकर यानें पूर्वीच्या जेमनेम इमारती आणि तटबुरूज पाडून टाकून त्या जागीं नव्या इमारती उभारल्या. जगदीश्वरासमोरच्या शिलालेखांत तो म्हणतो.

‘इथें श्रीशिवछत्रपतींच्या आज्ञेनें मीं विहिरी, जलाशय, तलाव, प्रासाद, उपवनें, बाजार, स्तंभ, हस्तीशाळा, राजवाडे, मंदिरें इत्यादि इमारती बांधल्या.’

याच गडावरच्या राजसभेत श्रीशिवछत्रपतींनी शके १५९६ आनन्द नाम संवत्सर, ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी, शनिवार, या दिवशीं स्वतःस राज्याभिषेक करवून घेतला (इसवी सन १६७४ जून) आणि याच गडावर इ. स. १६८० च्या चैत्र शुद्ध पौर्णिमेस हा थोर मनाचा पुण्यपुरुष कैलासवासी झाला.

इ. स. १६८९ नोव्हेंबरची तीन तारीख, या दिवशीं औरंगजेबाचा सरदार जुल्फिकारखान यानें मराठ्यापासून रायगड जिंकला, तिथपासून मराठ्यानीं इ. स. १७३३ च्या जूनमध्यें पुन्हा जिंकून घेईपर्यंत किल्ला औरंगजेबाचा सरदार जंजिऱ्याचा सिद्दी याजकडे होता. इ. स. १८१८ च्या १० मे रोजीं कर्नल प्राथरनें मराठ्याचा पराभव करून किल्ला आपणाकडे घेतला. या युद्धाच्या वेळीं गडावरील बहुधा सर्व इमारतींचा नाश झाला.

भवतालचा प्रदेश न्याहाळीत आपण भल्या भव्य महाद्वारातून आत प्रवेश करतों द्वाराची मजबुती, दों बाजूंचे दोन बलदंड बुरूज इत्यादि पाहून मन विस्मयानें भरून येतें. आत शिरल्यावर जाणवतें, कीं अजून आपण गडाच्या माथ्यावर पोंचलोंच नाहीं. आणखी १०० मीटर अंतर चढून जावें तेव्हा डाव्या हातास असलेला लोहस्तंभ, मदारशाची कबर, इत्यादि न्याहाळीत, ऐन डाव्या हातास असलेला कोरडा हत्तीतलाव मागें टाकीत आपण जिल्हापरिषदेच्या धर्मशाळेपाशीं येऊन उभे राहतों. समोर उभे असलेले दोन अनेकमजली जयस्तंभ आणि बालेकिल्ल्याची प्रचंड भिंत आपल्याला खुणावतात. जळानें तुडुंब भरलेला गंगासागर तलाव डाव्या हातास टाकीत पालखी दरवाजानें आपण वर चढतों आणि उजव्या हातास एका ओळींत असलेल्या सात इमारतींच्या अवशेषासमोर उभे राहतों. हीच वाट चालून गेल्यावर पुढें मेणा दरवाजा लागतो, आणि त्यापलिकडील मोकळें मैदान. याच वाटेनें उजवीकडे पुढली सोंड उतरून अदमासें मैलभर गेलें, कीं सुप्रसिद्ध हिरकणी बुरुज लागतो, तिथून पाचाडच्या जिजाबाई आईसाहेबांच्या वाड्याचे अवशेष दिसू लागतात.

मेणादरवाजातून परत फिरावें, तर उजवीकडे–थोडें तळात प्रधानाच्या वाड्याचे अवशेष, आणि अंधारकोठड्या आहेत तसेंच पुढें येऊन उजव्या हाताच्या दरवाजातून आंत प्रवेश करताच श्री शिवछत्रपतींच्या राहात्या वाड्याचा चौथरा, पलिकडे फडाचा कचेरीचा प्रचंड ओटा, छत्रपतींचें निजी सभागृह दिसते. पायाखालील वाटेनें समोरची प्रचंड भिंत उजवीकडे टाकून आपण सभागृहाच्या विस्तीर्ण प्राकारात येऊन पोंचतों. पूर्वेकडे असलेला प्रचंड नगारखाना, आणि पश्चिमेकडे असलेला सिंहासनाचा चौथरा न्याहाळीत असता मन आदरानें नम्र होतें. नगारखान्याच्या प्रचंड द्वारातून बाहेर पडावें, तों समोर अदमासें तीस ते चाळीस मैल अंतरावर असलेले राजगड आणि प्रचंडगड आपलें लक्ष वेधून घेतात. समोर उजव्या हातास कुशावर्त तलाव आणि त्याच्या बाजूस असलेले अधिकाऱ्याच्या वाड्याचे अवशेष दिसतात डाव्या हातानें पुढें निघावें, तर होळीच्या माळावरून दुतर्फा दुकानाचे रेखीव चौथरे असलेल्या बाजारपेठेंत आपण प्रवेशतों इथून अदमासें अर्ध्या मैलावर असलेलें जगदीश्वराचें मंदिर आपल्याला जणू खुणावीत असतें. मंदिरासमोरच आपल्या त्या अतिशय आवडत्या राजाची समाधि आणि शेजारीं त्याच्या बाघ्या कुत्र्याचें स्मारक आहे.

उजव्या हातास तळांत दारूचें कोठार आणि वाघदरवाजा आहेत. समोर अदमासें मैलभर अंतरावर भवानी टोक आहे. डाव्या हातास आहे कोळिंब तलाव. परत फिरताना डाव्या हातास असलेले बामणवाड्याचे अवशेष आणि उजवीकडले शिबंदीचे घरटे ओलांडून तसेंच उजव्या हातास खाली उतरावें, तर दारूचें आणखी एक कोठार आणि पलिकडील टकमक टोक आढळात येतें. टकमक टोकावर जाऊन उभें राहावें, तर उजव्या हातास काळ नदीचें खोरें आणि तळीं अंथरलेलें कोंकण दिसतें. आपण अदमासें नऊशे मीटर उंचीवर, एका अगदीं चिंचोळ्या, सरळ तुटलेल्या कड्याच्या ऐन माथ्यावर उभे असतों!

टकमकावरून माघारें वळावें, तर समोर डाव्या अंगास असलेला लिंगाणा किल्ला, आणि त्या पलिकडले प्रचंडगड आणि राजगड दिसू लागतात नगारखान्यासमोरून उजवीकडे पाहिलें, तर प्रतापगड आणि मकरंदगड दिसतात. आकाश अगदीं स्वच्छ असेल, तर नगारखान्याच्या माथ्यावरून समुद्राची चकचकीत रेषा दिसू शकते.

गडावर जिल्हापरिषदेची धर्मशाळा आहे. सर्व सोयींनीं युक्त असें एक दालनही आहे. मात्र त्या सोयींबद्दल जिल्हापरिषद काहीं भाडें आकारते. धर्मशाळेसमोर उपाहारगृह आहे. आगाऊ पत्रव्यवहार केला, तर तिथें भोजनाची व्यवस्थाही होऊ शकते

रायगड संपूर्ण पाहणें असेल, तर कमींत कमी दोन दिवस हवेत. चांदण्या रात्री साधून गेल्यास रात्रींदेखील गड भटकता येतो.

रायगड हें पवित्र स्वातंत्र्यमंदिर आहे. ही जाणीव सतत बाळगून मग गडावर हिंडावें. म्हणजे मग ट्रॅन्झिस्टर लावणें, वेडीवांकडी गाणीं, नाच, असें स्वैर वर्तन टळतें. कोळशानें अगर खडूनें आपलीं नावें लिहिणें बरें नव्हे

ज्यांनीं हे किल्ले जिंकीत आणि राखीत असता आपापलीं शरीरें धारातीर्थीं-वर त्यागलीं, त्यांनींही आपलीं नावें कुठें लिहून ठेवलेलीं नाहींत.

## लिंगाणा

तोरणा आणि रायगड याच्यामध्यें सह्याद्रीच्या एका फाट्यावर शिवलिंगासारखा उभा सुळका असलेला लिंगाणा किल्ला रायगडावर नजर ठेवून उभा आहे. शिवकालामध्यें तर्फ रायगडखालीं खुद्द रायगड, तळातली वाडी आणि लिंगाणा या तिन्हींचा समावेश होत असे. कांहीं काळपर्यंत हा किल्ला रायगडचा तुरुंग म्हणूनही वापरला गेला.

पायथ्याशीं असलेल्या पाणें गावापासून किल्ल्याचा चढाव सुमारें ४ मैल आहे. तळात लिंगणमाची नावाचें लहानसें गाव आहे. किल्ल्याचा रस्ता लिंगणमाचींतूनच फुटतो.

किल्ल्याचा चढ अवघड आहे. पूर्वी वर चढण्यासाठीं पायऱ्या कोरलेल्या होत्या. पण आतां त्या अगदीं पडून गेल्या आहेत. शिडीच्या साह्यानें वरतीं चढावें लागतें. वर गेल्यावर कड्याच्या आडवटात पाण्याचीं टाकीं आणि कैदी ठेवण्यासाठीं उपयोगात आणलेल्या काहीं गुहा आहेत. या गुहाच्या माथ्यावरील प्रचंड सुळका काल-परवापर्यंत अजेय मानला जात असे. पण मुंबईच्या काहीं गिर्यारोहकानीं यंदाचे वर्षीं तो सर केला.

किल्ल्यावरून पश्चिमेकडील रायगड, तळातली काळनदी आणि आसमंतातले प्रचंड कडे इत्यादि प्रदेश दृष्टीच्या टप्प्यांत येतो.

## अलिबाग

सध्या अलिबाग हें जिल्ह्याचें ठाणें झालें आहे. अलिबागेच्या दों बाजूस नागाव, थळ, चौल, सासवणें, इत्यादि ८ आगरें असल्यामुळें या भागास 'अष्टागर' म्हणतात. अष्टागर हा भाग माड, पोफळी, केळी, आणि भाजीपाल्यानें समृद्ध आहे. गावाच्या पश्चिमेस ऐन समुद्रामध्यें अलिबागचा पाणकोट वसलेला आहे.

समुद्रास भरती येते, त्या वेळेला कोटाच्या चहूबाजूंनीं पाणी असतें. मात्र ओहोटीचे वेळीं पूर्वेची बाजू मोकळी होते. अलिबागजवळ किनाऱ्यास लागून सुप्रसिद्ध

वेधशाळा बसविलेली आहे. एका बाजूला वेधशाळा, मध्यें समुद्रकिनारा आणि पलिकडे नैर्ऋत्येस किल्ला अशी ही रचना आहे.

पूर्व दिशेला वाळू ओलांडीत पैल गेलें, कीं किल्ल्याचें महाद्वार लागतें. हें सामान्यपणें ईशान्येस आहे. मोठ्या दरवाज्याच्या आत दुसरा एक लहान दरवाजा आहे त्याच्या खालीं तळघर आहे. असें म्हणतात, कीं तळघरांत असलेल्या दोन कोठ्यापैकीं एकींत तांदूळ साठवीत, तर दुसरींत तेल, तूप, गहू इत्यादि भुसारमाल साठवीत.

एका प्रचंड खडकावर दक्षिणोत्तर अशी या किल्ल्याची रचना केली आहे. चहूअंगानीं नऊशें फूट लांब, साडेतीनशें फूट रुंद आणि पंचवीस फूट उंच असा मजबूत तट बांधलेला आहे. तटाच्या दक्षिण अंगाला एक प्रचंड वाडा होता त्याच्या अलिकडील अंगास महिषासुरमर्दिनीचें देऊळ आहे. थोरल्या वाड्याच्या पलिकडे पाण्याचा प्रचंड हौद आहे. वाड्याजवळ एक पायऱ्यांची विहीर आहे. नवल असें, कीं चहूबाजूंनीं समुद्र असूनही या विहिरीचें पाणी मात्र अमृतासारखें मधुर आहे.

याच वाड्याजवळ एका स्वतंत्र तटबंदी आवारामध्यें ताशीव घडीव दगडानीं बांधलेलें एक टुमदार गणपतीचें देऊळ आहे. आंतील मूर्ति अतिशय सुंदर आहेत.

या किल्ल्यास एकूण बुरूज सतरा. चहू कोंपऱ्यास चार, पश्चिमेकडे पांच. पूर्वेकडे चार. उत्तरेस तीन आणि दक्षिणेस एक. किल्ल्याच्या दक्षिणेकडे आणिक एक लहानसा दरवाजा आहे.

अलिबागचा किल्ला कित्येकदा आग लागून जळाला. पण याहीपेक्षा आंग्रे कुटुंबातील भाऊबंदकीच्या अग्नीमुळे किल्ल्यामध्यें अनेकदा युद्धें झालीं. इ. स. १८४० मध्यें इंग्रजानीं अलिबाग संस्थान खालसा करून किल्ला आपल्या ताब्यांत घेतला या किल्ल्यात कित्येक दिवसपर्यंत इंग्रजाच्या सैन्याची एक तुकडी राहात असे. सध्यां एकूणच सर्व दुर्लक्षामुळें किल्ल्याची फार पडापड झालेली आहे.

●

## कोरलई

रेवदंड्याजवळ कुंडलिका नदी समुद्रास मिळते, तिथें, त्या खाडीच्या पलिकडील तीरावर ऐन समुद्रकाठीं कोरलईचा किल्ला वसला आहे. रेवदंड्यास होडींत बसून पैल जावें लागतें. तळामध्यें कोरलई—नोरलई हीं मच्छीमाराचीं लहानुलीं गावें आहेत. समुद्रकांठीं, या गावांच्या पश्चि कडे असलेल्या टेकडीवर अदमासें पावणेतीनशें फूट उचीवर किल्ला उभारला आहे. किल्ल्याचें द्वार पूर्व दिशेस, कुंडलिकेकडे तोंड करून उभारलें आहे. द्वारातून आंत शिरल्यावर गोड पाण्याची एक विहीर लागते.

किल्ल्याची बाधणी दक्षिणोत्तर आहे. अदमासें तीन हजार फूट लांब आणि रुंदी मात्र शेंशंभर फूट. तीन दिशास पाणी, आणि दक्षिणेकडे जमीन. उत्तर दिशेस समुद्रसपाटीपासून पांच दहा फूट उंचीवर नऊ फूट उच भिंत बांधलेली माची आहे. तिचें नाव कुसाची वातेरा. इ. स. १५२१ मध्यें या भागाच्या पुर्तुगीज गवर्नरनें ती बांधली. पश्चिमेकडे दारूचीं कोठारें आणि बुरुजावर बऱ्याच तोफा.

बालेकिल्ल्यात जाण्यासाठीं इथूनच दक्षिणेकडे चढावें लागतें. कांहीं बुरूज दों बाजूंस टाकून, सात दरवाजे ओलाडले कीं बालेकिल्ला येतो. याची लांबी तीनशें हात, रुंदी सुमारें तीस हात. पाण्याचा हौद आणि एका चर्चचे ध्वस्तावशेष इतकें आत शिल्लक आहे.

इ. स. १५९४ मध्यें निजामशाहीशीं कित्येकदा कटकटी करून आणि त्यांमध्यें आपले दहावीस सरदार गमावून पुर्तुगीजानीं हा किल्ला बळकावला. इ. स. १७४० मध्यें पेशव्यांनीं फिरग्यास जेर करून त्यांचेपासून किल्ला हिसकावून घेतला. १८१८ मध्यें मराठी राज्य ल्यास जाईपर्यंत हा पेशव्यांकडेच होता.

किल्ल्यावरून मुख्यतः सायंकाळीं सूर्यास्ताचें दृश्य फार सुंदर दिसतें.

## मुरुड-जंजिरा

मुरुड हें तालुक्याचें ठिकाण आहे. पूर्वी तें संस्थानची राजधानी होतें. गाव फार सुबक आहे. माडा पोफळींचीं सुंदर झाडें आहेत. ऐन समुद्राच्या काठीं असल्यामुळें पश्चिमेकडून वाहणारा वारा रात्रंदिवस अंगें सुखावत असतो.

गावाच्या उत्तरेस एक खाडी आहे. किल्ल्यावर जाण्यापूर्वी ती ओलांडावी लागते. पुढें एक लहानशी टेकडी आहे. ती उतरून पलिकडे गेलें, कीं सावित्री नदीची प्रचंड खाडी आणि तिच्यात एखाद्या प्रचंड कासवासारखा जंजिरा किल्ला दिसतो. मात्र तो ऐन खाडीमध्यें असल्यामुळें त्याच्यापर्यंत पोहोंचण्यासाठीं होडीचा आश्रय करावा लागतो डाव्या हातास राजपुरी नावाचें गाव आहे. राजपुरी ही शिलाहाराची राजधानी. जवळच कुड्याच्या डोंगरात काहीं बौद्ध लेणीं आहेत.

होडींत बसून निघालें, कीं आपण किल्ल्याच्या ऐन महाद्वारापाशीं पोहोंचतों. खाडींतलें पाणी बहुधा नेहमींच डुचमळत असतें. त्यामुळें खूपच सांभाळून पायरीवर पाय ठेवावा लागतो. पावसाळ्यांत आणि भरतीचे वेळीं तर पाणी पायऱ्या ओलांडून थेट दरवाज्यात पोहोंचतें.

महाद्वारांतून आत शिरलें, कीं आणखी एक द्वार ओलांडावें लागतें. तिथें उजव्या हाताला किल्ल्याचे मूळचे धनी जे कोळी, त्यानीं स्थापिलेलें रामपंचायतन होतें. त्याचें पुढें शिद्दीनें पीरपंचायतन केलें आहे. तिथून जवळच सिद्दी घराण्यांतील काहीं मातबराच्या कबरी आहेत. पुढें पटांगणात तीन नांगर मांडलेले आहेत. मूळचा धनी जो रामकोळी त्याला पकडण्यासाठीं निजामशाही सेनापति पीरमखान ज्या जहाजात बसून आला, त्या जहाजाचे हे नांगर. त्या विजयाचे चिन्ह म्हणून ते तिथे ठेवले आहेत.

किल्ल्यात एकूण तीन मोहोल्ले किंवा पेठा. एक महार, कोळी, चांभार इत्यादि बलुतेदाराची, दोन मुसलमानाच्या. सध्या या तिन्ही पेठा ओसाड आहेत.

किल्ल्याच्या मध्यभागीं दारूगोळ्याचें कोठार आहे. त्याच्या पश्चिमेकडे खजिन्याचें कोठार. दक्षिण दिशेला आणि वायव्येला पाण्याची दोन तळीं आहेत. दक्षिणेकडील तळ्याला लागून एक दुमजली इमला आहे. पावसाळ्यांत वळचणीचें

पाणी या तळ्यापर्यंत आणून पोहोंचवलेलें असतें

बालेकिल्ल्यामध्यें किल्लेदाराचा चौखणी वाडा अदमासें दीड दोनशें फूट उंचा-वर आहे. याच्या दक्षिणेस कोळीवाडा आणि कांहीं हिंदू शिल्पाचे अवशेष आहेत या ठिकाणीं एक वाटोळी शिळा आहे. असें म्हणतात, कीं मुरुडचा प्रत्येक नबाब तख्तावर बसण्यापूर्वीं या शिळेवर बसत असे

सगळ्या किल्ल्याभोंवतालीं अतिशय मजबूत पक्क्या बांधणीचा तट आहे. अदमासें १०० फूट अंतर सोडून या तटास १९ बुरूज बांधले आहेत. प्रत्येक बुरूज कमानदार आहे. बुरुजाच्या मधून बाहेरच्या दिशेस तोंड करून प्रचंड तोफा मांडलेल्या आहेत. ध्वजस्तंभाजवळ जी प्रचंड तोफ आहे, तिचें नांव कलाल-बांगडी. तिच्या जवळ दुसरी एक प्रचंड तोफ आहे. पलिकडे लांडाकासम नांवाची कांहींशी आखूड अशी तिसरी बुलंद तोफ आहे. प्रत्येक बुरुजांतून तोंडें बाहेर काढलेल्या बाकी सर्व तोफा एक तर पितळी आहेत, किंवा देशी बनावटीच्या लोखंडी तरी.

हा जंजिरा खाडीच्या सामान्यपणें मध्यभागीं असल्यामुळें खारा वारा सतत वाहात असतो. तटावरून पश्चिम दिशेस जावें, तर तिथें किल्ल्याचा पश्चिम दरवाजा आणि धक्का दिसतो. समुद्राला कितीही भरती आली, तरी हा धक्का पंधरा वीस हात वर राहातो

पंधराव्या शतकाच्या शेवटीं राजपुरीला कोळ्याची वस्ती होती. लुटारू आणि चाच्यांचा वारंवार उपद्रव होत असल्यामुळें सरकारी अधिकाऱ्याची परवानगी घेऊन कोळ्यानीं खाडींतल्या या प्रचंड खडकावर एक मेढेकोट उभारला या कोळ्यांचा नायक राम पाटील होता पुढें एतबारराव नांवाचा बलदंड कोळी या कोळ्यांचा प्रमुख झाला खाडीमध्यें असें दुर्जेय आश्रयस्थान मिळाल्यामुळें तो कोणास जुमानीना झाला त्याचें पारिपत्य करण्यासाठीं निजामशहानें पीरमखान नांवाचा चतुर सेनापति सैन्य देऊन धाडला. आपलें सैन्य तीन गलबतांत भरून पीरमखान राजपुरी खाडींत येऊन थांबला. मोठ्या अदबीनें पीरमखानानें होडी-मधून कांहीं अधिकारी एतबाररावाकडे धाडले. आपण व्यापारी आहोंत आणि एक रात्रीपुरता आपणास आश्रय हवा आहे, अशी मागणी त्यानें एतबार-रावाशीं केली. एतबाररावानें ती मान्य केली. तिन्ही गलबतें मेढेकोटाशीं येऊन लागलीं, आणि हे पाहुणे मेढेकोटांत दाखल झाले. सायंकाळीं त्यांनीं कोळ्यास

भरपूर दारू पाजली, आणि त्या बेहोशींत कोळी व्यग्र असता तिन्ही गलबतातील पेटाऱ्यात लपून असलेले सैनिक बाहेर पडून त्यानीं मेढेकोटचा ताबा घेतला.

पुढें पीरमखानानतर बुऱ्हाण नावाचा निजामशाही अधिकारी या कोटाचें काम पाहाण्यासाठीं आला. कच्चा मेढेकोट पाडून त्या जागी इ. स १५६७ सालीं पक्का कोट बांधण्यास प्रारभ केला. १५७१ सालीं तें काम पुरें झालें. सुमारें अधा मैल लांबी, १।। मैल परीघ आणि १९ बुरूज असलेला हा कोट कित्येक वर्षेंपर्यंत दुर्जेय राहिला बुऱ्हाणनें या कोटाचें नाव "किल्ले महरूब" असें ठेविलें

महाराष्ट्रामध्यें मराठ्याचें स्वराज्य झाल्यावर शिवाजी महाराजानीं तीन वेळा हा किल्ला जिंकण्याचे कसोशीचे प्रयत्न केले. पण या ना त्या निमित्तानें ते यशस्वी झाले नाहींत. शिवाजीराजाच्या नतर छत्रपति संभाजीनें इ. स. १६८२ मध्ये सतत महिनाभर जजिरा किल्ला वेढून चहूंबाजूनीं तोफाचा भडिमार केला तरी गडकरी सिद्दी आटोपास येईना. हें पाहून सभाजी राजानीं राजपुरी-पासूनची मधंध खाडी दगडानीं भरून काढण्याचा अतिशय साहसी पण अयशस्वी प्रयत्न केला !

पुढें पेशवाईमध्यें देखील सिद्दी बुडवायचे कित्येक प्रयत्न झाले. पण ते सर्व असफळ झाले शेवटीं भारत स्वतत्र झाल्यावर इतर संस्थानाच्या बरोबर जजिरा सस्थानही विलीन होऊन स्वतत्र झालें !

●

## घोसाळ गड

रोह्याच्या दक्षिणेस ६ मैलावर रेवदंड्याची खाडी आणि साळव्याची खाडी याच्यामधील एका टेकडीवर घोसाळगड बाधलेला आहे. खाडीच्या भरतीचें पाणी किल्ल्याच्या दक्षिण आणि पूर्व पायथ्यापर्यंत येऊन पोहोंचतें मात्र पश्चिमेकडील एक हजार फूट उचीची बाजू पाण्यापासून सुरक्षित राहाते. याच दिशेला खाडीपलिकडे तळ्याचा किल्ला आहे.

घोसाळें नांवाच्या लहानशा खेड्यांतून या किल्ल्यावरील रस्ता फुटतो सध्यां किल्ल्याची अगदीं पडापड झाली आहे. त्यामुळें मुख्य दरवाजा कुठें होता याचा पत्ता लागत नाहीं किल्ल्याजवळ भवानी आणि गणपती अशीं दोन देवालयें आहेत. किल्ल्याच्या पश्चिम भागाकडे एक बुरूज आहे. ही पूर्वीची टाल-काठीची जागा.

सध्या बंदीखाना म्हणून एक इमारत दाखवली जाते. तिच्या दक्षिणेकडील भिंतींत एक कमानदार दरवाजा आहे, आणि तेथून खालीं उतरण्यासाठीं काहीं पायऱ्या आहेत किल्ल्यामध्यें पाण्याचीं बरींच टाकीं आहेत. परंतु त्यांचें पाणी पिण्याजोगें नाहीं.

इ. स. १६४८ मध्यें हा किल्ला शिवाजीराजाच्या ताब्यात आला. इ. स. १६५९ मध्यें अफझलखान स्वराज्यावर चालून आला, त्या वेळीं सिद्दीनें या किल्ल्यास वेढा घातला होता. पण अफझलखानाच्या मृत्यूची वार्ता कळताच त्यानें तो वेढा उठविला. इ. स. १८१८ मध्यें रायगड घेण्यापूर्वी कर्नल प्रॉथरनें या किल्ल्यावर कब्जा केला.

## तळगड

घोसाळगडाजवळ खालीं पलिकडेच तळगड उभारलेला आहे. पायथ्याशीं तळें नावाचें एक लहानसें खेडें आहे. तिथपासून किल्ल्याची उंची ४०० फूट आहे. जों जों किल्ल्याचा माथा जवळ येतो तों तों चढ कठिण होऊं लागतो वाटेंत राजपुरीच्या महालकऱ्याच्या कचेरीची जागा आहे. कचेरीच्या बाहेर काहीं तोफा पडलेल्या आहेत.

किल्ल्याचा तट तिहेरी आहे. किल्ल्याच्या मुख्य दरवाजास हनुमान दरवाजा म्हणतात. किल्ल्याच्या आत एक मोठें विपुल पाण्याचें टाकें आहे. किल्ल्याची लांबी—रुंदी अनुक्रमें ४०० यार्ड आणि ३० यार्ड आहे. किल्ल्यामध्यें सदर, मशीद, खडकात कोरलेल्या काहीं खोल्या, भुयारें, तळघरें, पाण्याचीं टाकीं, इत्यादि अवशेष आहेत. त्याशिवाय एक महादेवाचें मंदिरही आहे.

इ. स. १६४८ सालीं घोसाळगडाबरोबरच तळगडही शिवाजीराजांनीं जिंकला. इ. स. १८१८ मध्यें कर्नल प्रॉथरनें रायगड जिंकण्यापूर्वी घोसाळगडाबरोबरच तळगडही ताब्यात घेतला.

## अवचित गड

रोहें गावापासून कुंडलिका नदीच्या उत्तरेस तीन मैलावर असलेल्या एका सुळक्यावर हा किल्ला बांधलेला आहे. या किल्ल्यावर चढायच्या वाटा दोन. एक रोह्याकडून आणि दुसरी उत्तर दिशेस मेढें नावाचें एक गांव आहे तिथून. याची उंची तळापासून अदमासें १ हजार फूट आहे. दरवाज्याच्या दोन्ही बाजूंना दोन बुरूज आहेत. पैकीं एक पडलेला आहे. किल्ल्याचा तट अनगड दगडांनीं बांधलेला असून त्याच्या दोन्ही टोकास गोपुराप्रमाणें दिसणारे दोन बुरूज आहेत. पैकीं दक्षिणेकडील बुरुजाच्या भिंतींत एक शिलालेख आहे. त्यांतील मजकूर असा—

—श्री गणेशाय नमः श्री जयदेव शके १७१८ नलनाम संवत्सरे चैत्र शुद्ध प्रतिपदा.

या बुरुजावरून भोंवतालच्या प्रदेशाचे विहगम दृश्य दिसूं शकतें. किल्ल्यात कांहीं तोफा पडलेल्या आहेत. उत्तरेकडील बुरुजावर एक उध्वस्त वाडा आहे. वाड्याच्या ईशान्येस एक बुरूज असून दक्षिणेकडील भिंतींत एक दरवाजा आहे.

दक्षिण दिशेस बालेकिल्ला आहे. त्याची लांबी–रुंदी अनुक्रमें ३०० यार्ड आणि १०० यार्ड आहे. बालेकिल्ल्याच्या उत्तरेकडे दोन्ही टोकाशीं दोन दरवाजे आहेत आत एक पाण्याचा द्वादशकोनी हौद आहे, त्याला आत उतरण्यासाठीं पायऱ्या आहेत. पश्चिमेकडील अंगास खडकात कोरलेलीं पाण्याचीं ७ टाकीं आहेत.

टाक्याच्या मध्यभागीं एक समाधि असून तिच्या पुढें एक दीपमाळ आहे. बालेकिल्ल्याच्या वायव्य दिशेला महादेवाचें देवालय आहे. बालेकिल्ला आणि किल्ल्याची दक्षिण बाजू यांच्यामध्यें कित्येक घराचे उध्वस्त घरटे आहेत.

किल्ल्याच्या माथ्यावरून उत्तरेकडला मिऱ्या डोंगर, रतनगड हा किल्ला, तसेंच दक्षिणेत कुंडलिका नदी आणि तिच्या तीरावरचा प्रदेश दिसूं शकतो.

## कोथळीगड

नेरळच्या पूर्वेस १२ मैल आणि कर्जतच्या ईशान्येस १४ मैल अंतरावर एका सुळक्यावर कोथळीगड उभारलेला आहे. ह्याच्या तळाशीं पेठ नावाचे खेडें आहे. हें खेडेंच मुदलात डोंगरावर वसलेलें आहे. याच डोंगराचा एक सुळका आकाशात उभवलेला आहे. त्यावर हा किल्ला बांधलेला आहे. या किल्ल्याचा चढाव अतिशय बिकट आहे. किल्ल्याचा दरवाजा अजून उभा आहे. आत पाण्याचीं दोन टाकी आहेत. किल्ल्यामध्यें एक मोठी गुहा आहे. तिचे खांब मूळ पाषाणातून कोरून काढलेले आहेत आश्चर्य असें, कीं या गुहेतून वरच्या टप्प्यावर जायचा मार्ग कोरून काढलेला आहे. तो आडवातिडवा मार्ग चढून वर जावें, तों आपण किल्ल्याच्या ऐन माथ्यावर जाऊन पोहोंचतों. वर जागा अगदीं थोडी आहे.

खालीं तळात कांहीं पचरशी तोफा इथें तिथें पडल्या आहेत. या किल्ल्याच्या मर्यादित आकारावरून असें ध्यानीं येतें, कीं याचा उपयोग केवळ एक चौकी म्हणूनच होत असावा.

•

## कर्नाळा

पनवेलच्या दक्षिणेस ८ मैलावरून वेगवती नावाची नदी वाहाते. तिच्या वायव्येस कर्नाळा किल्ला उभा आहे. माथ्यावर उभ्या असलेल्या अदमासें १५० फूट उंचीच्या एका प्रचंड, हाताच्या अंगठ्यासारख्या सुळक्यामुळें हा किल्ला फार लांबून ओळखता येतो. मुंबईहून महाडकडे जाणाऱ्या राजमार्गावर हा किल्ला आहे. याच्या भोंवतालीं अलिकडे शासनानें पक्ष्यासाठीं अभयारण्य निर्माण केलें आहे.

अभयारण्यातून वर चढणाऱ्या बांधून काढलेल्या वाटेनें अदमासें मैलभर चालून गेलें, कीं किल्ल्याचा प्रचंड खडक सामोरा येतो. थोडी खडकांतली चढण चढून गेल्यावर किल्ल्याचा पहिला दरवाजा लागतो. हा दरवाजा चढून जाण्या साठीं पायऱ्या बांधलेल्या आहेत. सध्या हा दरवाजा अगदीं पडू घातला आहे.

आत गेल्यावर डाव्या हातास काहीं इमारतींच्या भिंती आणि बुधला दिसतो. बुधल्याच्या तळाशीं चहू अंगास धान्य साठवण्याच्या कोठ्या आणि पाण्याचीं टाकीं कोरली आहेत. बुधल्याच्या माथ्याजवळ आग्यामाशांचीं प्रचंड पोळीं लटकलेलीं असतात. भोंवतालचे ठाकर या पोळ्याचा मध काढण्यासाठीं सुळक्यावर चढून जातात कडे चढायची सवय असलेल्या गिर्यारोहकास थोड्या कष्टानें बुधल्यावर चढता येतें.

बुधल्याच्या पलिकडे तटाबुरुजानीं वेढलेला किल्ल्याचा दुसरा भाग लागतो. या भागाकडे जाण्याचा मार्ग सुळका उजव्या हातास टाकून पुढें निघतो.

या किल्ल्यावरील बुधल्याच्या तळाशीं असलेल्या टाक्यावरुन असें अनुमान निघतें, कीं या किल्ल्याची रचना सुमारें दोन हजार वर्षांपूर्वी झालेली असावी. मात्र याचा उल्लेख यादवकाळामध्यें आढळतो. पुढे काहीं दिवस हा किल्ला पोर्तुगीजाच्या स्वाधीन होता इ स. १६७० मध्यें स्वतः शिवाजीराजानीं यास वेढा घालून हा किल्ला जिंकून घेतला होता. संभाजीराजाच्या निधनानंतर औरंगजेबानें महाराष्ट्रातील इतर किल्ल्यांबरोबर हाही किल्ला जिंकून घेतला होता पण पुढें लौकरच मराठ्यानीं तो पुन्हा मिळकावला.

एक तर हा किल्ला मुंबईपासून जवळ आहे. दुसरें असें, कीं याचे भोंवतालीं शासनानें अभयारण्य केलें आहे. यामुळें मुंबईच्या कित्येक निसर्गप्रेमिकाच्या तुकड्या दर सुट्टींत हा किल्ला पाहण्यासाठीं येत असतात.

●

## प्रबळगड

माथेरानच्या पश्चिमेस ४ मैल आणि पनवेलच्या पूर्वेस ८ मैल अशा सुमारास एका प्रचंड टेकडीवर प्रबळगड उभारलेला आहे. समुद्रसपाटीपासून याची उंची अदमासें २३०० फूट आहे. या किल्ल्याला ११ बुरूज आणि २ दरवाजे आहेत. किल्ल्याच्या माचीवर नाचणी-वरी सारखें काहीं पीकही काढलें जात असे. अधूनमधून किल्ल्यावर काहीं गुराखी आपापलीं गुरें घेऊन जातात. त्या गुराना पाणी पिण्यासाठीं माथ्यावर एक लहानसें तळें आहे.

इ. स. १८२७ ला पुरंदरजवळील सुप्रसिद्ध स्वातंत्र्यवीर उमाजी नाईक हा आपले ३०० लोक बरोबर घेऊन प्रबळगडावर येऊन राहिला होता. आणि तिथून त्यानें—

——इथून पुढें कोणीही ब्रिटिश सरकारला एक पैही वसूल न देता तो आम्हांकडे द्यावा. ही आज्ञा अमान्य करील त्याला शासन केलें जाईल.

असा जाहीरनामा काढला होता. या जाहीरनाम्यावरची तारीख २५ डिसेंबर १८२७ अशी आहे. ●

## माणिकगड

पनवेलच्या आग्नेयेस सुमारें १५ मैलावर माणिकगड नावाचें लहानसें खेडें आहे. त्याच्या पाठीमागें हा किल्ला उभा आहे. पूर्व, पश्चिम आणि उत्तर या तिन्ही दिशाना तुटलेले कडे आहेत. फक्त दक्षिणकडूनच काय ती वर जायला वाट आहे किल्ल्यावर उत्तम पाणी आहे. मात्र किल्ल्याचें बांधकाम अतिशय ओबडधोबड आहे.

राजमाची, कर्नाळा आणि खंडाळ्याचें नागफणी या ठिकाणांच्या मध्यभागीं असलेला माणिकगड भोंवतालच्या डोंगरातून वेगळा उठून दिसतो. ●

## चंदेरी

चंदेरी किल्ला पनवेल तालुक्यात पनवेलच्या नैर्ऋत्येस १० मैलावर आहे तळाशीं तानसई नावाचें एक लहानसें खेडें आहे. या खेड्यातूनच किल्ल्यावर रस्ता जातो. एका बाजूस मलंगगड आणि दुसरीकडे पेब अशा दोन्ही किल्ल्याच्या मध्यभागीं टेहळणीसाठीं म्हणून हा किल्ला उभारला होता.

हल्लीं या किल्ल्यावर तटबंदी, दरवाजा, बुरूज इत्यादि कसलेच अवशेष शिल्लक नाहींत. केवळ काहीं उध्वस्त घरें आणि दोन टाकीं एवढ्याच किल्ल्याच्या खुणा वर आढळतात. मुंबईला जवळ असल्यामुळें मुंबईचे कित्येक निसर्गप्रेमी या किल्ल्यावर येऊन जातात. ●

## पेब ( विकटगड )

पनवेलच्या ईशान्येस ९ मैलावर माल्दुर्ग नावाचें खेडें आहें. या खेड्याजवळ विकटगड वसला आहे. पायथ्यापासून याची उंची अदमासें १ हजार फूट आहे किल्याचे पायथ्याशीं पेबी देवीचें देऊळ आहे. त्यावरूनच बहुधा या किल्याला पेबचा किल्ला असें नाव पडलें असावें. सुमारें निम्मा चढ चढून गेलें, कीं महिषाचें देऊळ लागतें. पुढें दोन फर्लोंगावर खडकांत खोदलेलें एक टाकें आणि दोन गुहा आहेत. इथून वर जाण्यास मात्र वाट शिल्लक नाहीं. खडकाला मेखा ठोकून आणि दोर बाधूनच वर चढावें लागतें. माथ्यावर पोहोंचलें, कीं कांहीं घराचे अवशेष आणि पाण्याचें एक टाकें आहें. बाराही महिने हें तळे तुडुंब भरलेलें असतें.

●

## मलंगगड

कल्याणच्या दक्षिणेस सुमारें दहा मैलावर मलंगगड उभा आहे. थेट गडापर्यंत एस्. टी. बसेस जातात.

अतिशय बळकट अश्या या किल्याचा चढ बिकट आहे. तिमजली इमारतीसारखे या किल्यास तीन टप्पे आहेत. अदमासें अठराशें फूट उंचावर पहिला टप्पा आहे या टप्प्यावर बरी झाडी आहे. इथेंच हाजी मलंग या मुसलमान साधूची कबर आणि त्या कबरीच्या सेवकाचीं घरें आहेत. नवल असें कीं कबरीच्या मुख्य पूजकाचा अधिकार मात्र केतकर या हिंदु घराण्याकडे आहे.

इथून वर तीनशें फुटावर असलेल्या दुसऱ्या टप्प्यापर्यंत पोंचायला खडक फोडून पायऱ्या केल्या आहेत. या टप्प्यावर एक पडकी भिंत, उध्वस्त दरवाजा आणि काहीं उखळलेले चौथरे आहेत.

इथून वरील तिसऱ्या मजल्यावर जाण्यासाठीं खडक कोरून पायऱ्या केल्या आहेत. या मात्र बिकट आहेत. या जिन्याची उंची अदमासें शंभर फूट असून तो वाकडातिकडा आहे. काहीं पायऱ्या अडीच ते तीन फूट उंचीच्या आणि अतिशय

चिंचोळ्या आहेत. काही ठिकाणी दों बाजूस हात टेकायला खोबणी कोरल्या आहेत

वरील माथ्याची लांबी रुंदी दीडशें आणि साठ फूट आहे. सुमारें मध्यभागीं एक औदुंबराचें प्राचीन झाड आहे. काहीं जुनीं टाकीं आणि पडापड झालेल्या काहीं इमारतींचे चौथरे, यापलिकडे वर काहींही नाहीं. याच टाक्यातून नळानें पाणी खालीं नेलें आहे.

वरून भवतालच्या खाड्यांची आणि पर्वतशिखराची अवर्णनीय शोभा दिसते.

●

## सुधागड

पालीपासून अदमासें दोन मैलावर सुधागड डोंगराच्या दाटींत वसलेला आहे याची उंची समुद्रसपाटीपासून अदमासें २५०० फूट आहे. चढण तशी सोपी आणि सावलीची आहे. इ. स. १९५० मध्यें संस्थानें विलीन होईपर्यंत हा किल्ला भोर संस्थानाकडे असल्यामुळें सचिवानीं याची व्यवस्था बरी ठेवली होती. १९५० नतर मात्र दुर्लक्षामुळें सर्वत्र पडापड झालेली आहे. किल्ल्याचा दरवाजा आतां अगदीं पडूं लागला आहे. वर भोराई देवीचें एक बऱ्यापैकीं देऊळ आहे. भोराई ही पंतसचिवाची कुलदेवता. आश्विनांत या मंदिरामध्यें नवरात्र बसत असे, आणि त्यासाठीं भोरकर काहीं रकम खर्च करीत. आत तें बद झालें आहे. देवळात एका बाजूस एक चिनी मातीचा शिवकालीन राजष ठेवलेला आहे.

किल्ल्यावर आजही बरी झाडी आहे. अनेक घराचे चौथरे आणि पडक्या भिंती चहूबाजूस आढळतात. तटाला असलेल्या एका छिद्रातून चोरवाटेनें खालीं उतरतां येतें. घेऱ्यांत पांढरीचीं झुडुपें आहेत. हीं झुडुपें सर्वत्र आढळत नाहींत.

किल्ल्याभोंवतीं पूर्वी चांगली दाट झाडी होती. डुकरें, भेकरें, आणि काहीं वाघही भोंवतालीं वस्ती करून असत.

आज किल्ल्याची अगदीं दुर्दशा होत आहे

●

## पद्म दुर्ग
## कासा किल्ला

राजपुरी खाडी समुद्रास मिळते, तिथें तिच्या ऐन मुखावरील एका प्रचंड खडकावर इ. स १६६३ सालीं शिवाजी महाराजांनीं हा किल्ला बांधला. मुरुडच्या जंजिऱ्यापासून हा अदमासे २ मैल अंतरावर आहे किल्ल्याला एक मजबूत लहानसा दरवाजा आणि ६ बुरूज आहेत किल्यामध्यें इथें तिथें कांहीं तोफा पडलेल्या आहेत. आत पावसाचें पाणी साठवून एक तलाव रचलेला आहे. खडकाच्या कमी अधिक उंचीप्रमाणें तटाचीही उंची कमी जास्त झालेली आहे.

सिद्दीचा जंजिरा जिंकण्याचा प्रयत्न करीत असताच त्याच्या घरट्यापासून इतका जवळ ऐन समुद्रात शिवाजीराजानीं उभारलेला हा किल्ला पाहून त्याच्या बेडर साहसाविषयीं मन आदरानें भरून येतें.

अलिकडे कांहीं शिडाची गलबतें गोडें पाणी भरून घेण्यासाठीं या किल्ल्यातील तळ्याचा उपयोग करतात.

●

## सरसगड

पाली गावाजवळ त्याच्या अगदीं पूर्वेस उत्तुंग, चहूं दिशांना उभे कडे असलेला सरसगड उभा आहे. चढायची वाट दुर्गम आहे. या किल्ल्याची लांबी उत्तर दक्षिण अशी आहे.

दक्षिणेकडून आणि उत्तरेकडून अशा दोन वाटा किल्ल्यावर चढतात. त्यातल्या त्यात उत्तरेकडील वाट अधिक सोपी आहे. या वाकड्या तिकड्या वाटेवर कांहीं खडकात खणलेल्या पायऱ्या आहेत. सामान्यपणें अर्धा चढ चढून गेलें, म्हणजे दों बाजूंना बुरूज असलेला खालच्या किल्ल्याचा दरवाजा लागतो. या दारातून आंत शिरल्यावर एक बरेंच मोठें तळें लागतें. त्यात वर्षभर भरपूर पाणी असतें. इथून वरची वाट अधिक अवघड आहे.

किल्ल्याच्या माथ्याची लांबी-रुंदी अगदीं कांहीं थोडे एकर आहे. वरतीं गवत माजलेलें आहें. आणि त्या गवतामध्येंच एका पीराचे थडगें आहें. पश्चिमेकडे

एक लहानसें टाकें आणि त्याच्या शेजारीं एक महादेवाचें देऊळ आहे.

ऐन माथ्यावरून डोंगर, दरे, घाटवाटा, यांनीं गच्च झालेला प्रदेश दृष्टीस पडतो. थेट समुद्रापर्यंत कोकण दृष्टीपथांत येतें.

दक्षिणेकडे एक लहानसें शृंगारलेलें दार आहे. त्याच्या शेजारीं पहारेकऱ्यासाठीं बांधलेली खोली आणि पाण्याचें टाकें आहे. याच्याजवळच एक ३० फूट लांब आणि २० फूट रुंद असा प्रचंड जलाशय आहे. या दारावाटे खालीं उतरायची वाट खडकातून कोरून काढलेली आणि अतिशय अवघड आहे.

# सातारा जिल्हा :

## प्रतापगड

महाबळेश्वरामधील एल्फिन्स्टन पॉइन्टसारख्या पश्चिमेकडील कोणत्याही टोकावर उभें राहावें आणि पायतळीं पसरलेल्या डोंगरदरींत न्याहाळावे. अगदीं समोरच प्रतापगडाचें दर्शन घडतें. महाबळेश्वर ते पोलादपूर असा प्रचंड उतरणीचा घाट कोकणात पोंचतो. या घाटाच्या मध्यावर घनदाट झाडीनें गच्च भरलेलें जावळी खोरें पसरलेलें आहे. याच खोऱ्यात, पारघाटाच्या माथ्यावर कोयना नदीच्या दुआबात प्रतापगड वसलेला आहे. महाबळेश्वरपाशीं सुरू होणारा आंबेनळीचा घाट उतरुन, कोयना नदी उतरल्यानंतर कुंभरोशी हें लहानसें गांव लागतें.

महाबळेश्वर ते कुंभरोशी हें अंतर अदमासें सतरा किलोमीटर आहे. तिथून पुढें सडकेनें अदमासें दीड किलोमीटर गेलें, की डाव्या हातास प्रतापगडाकडे जाणारा फाटा फुटतो. त्याचीं वळणें आणि वाकणें पार केल्यानंतर डाव्या हाताला अफजलखाँची कबर मागें टाकीत आपण प्रतापगडाच्या ऐन पायथ्याशीं पोहोंचतों. कुंभरोशीपासून प्रतापगडाकडे जाणारी पायवाट कुंभरोशी गांवातून फुटते

हा दुर्ग शिवछत्रपतींनीं बांधलेला आहे. बालेकिल्ला चढून गेल्यानंतर डाव्या हातास असलेलें महादेवाचें मंदिर फक्त पूर्वीपासूनचें. जावळी जिंकल्यानंतर छत्रपतींच्या ध्यानीं आलें, कीं या मोक्याच्या जागीं एखादा बुलंद किल्ला बांधला पाहिजे. त्यांनीं सगळा भवताल दृष्टीखालीं घातला. पार आणि किन्हेश्वर या दोन्ही गावामध्यें असलेला हा ढोरप्याचा डोंगर त्यांच्या ध्यानास आला, आणि

त्यांनीं मोरोपंत पेशवे यांना किल्ला बांधावयाची आज्ञा दिली. मोरोपंतांनीं इ. स. १६५७ मध्यें मुहूर्त केला आणि तटाबुरुजांनीं भरभक्कम, असा हा देखणा किल्ला बांधून काढला.

राजे बळिवंत झाले, अनावर झाले, हें आदिलशाहाच्या ध्यानात आलें. तेव्हा मग विजापुराहून धिप्पाड, बलाढ्य आणि क्रूरकर्मा अफझलखाँ यास राजाच्या निर्दालनासाठीं धाडण्यात आलें. बहुत विचार करून राजांनी त्याची गाठ प्रतापगडाच्या पायथ्याशीं, जावळीच्या गर्द रानात घ्यावी, असें योजिलें. अफजलखॉनें मोठ्या प्रौढीनें तें निमंत्रण मानलें. आपली प्रचंड फौज वाईस ठेवून तो दहा हजार स्वारानिशीं प्रतापगडानजीकच्या पार या गावीं येऊन पोहोंचला. मुलाखत होतेवेळीं बरोबर सैन्य असू नये हें दोघांनींही मान्य केलें. गुरुवार, १० नोव्हेंबर, १६५९ मार्गशीर्ष शुद्ध षष्ठीसह सप्तमी या दिवशीं दुपारीं दोन वाजण्याच्या सुमारास ती रोमहर्षक मुलाखत झाली आलिंगन देण्याच्या मिषानें अफजलखॉनें राजास धरून आवळलें, आणि त्याच्यावर शस्त्र चालविलें. हें पाहून राजांनीं हातांतील बिचव्यानें खानाचा कोथळा बाहेर काढला. पळू पाहणाऱ्या खानाचें मस्तक संभाजी कावजीनें कापलें. पाठोपाठ राजाच्या सेनेनें चहूबाजूंनीं बाहेर पडून खानाच्या सैन्याची लांडगेतोड केली.

राजांनीं प्रतापगडावर आपली आराध्यदेवता तुळजापूरची माय भवानी इची प्रतिकृति स्थापन केली. त्या देवीस राज्याभिषेकापूर्वी त्यांनीं सव्वा मण सोन्याचें छत्र समर्पण केलें होतें.

प्रतापगड ही सातारकर छत्रपतींची खाजगी मिळकत आहे छत्रपति मॉंसाहेब सुमित्राराजे भोसले यांच्या अध्यक्षतेखालीं महाराजा शिवछत्रपति प्रतिष्ठान ही संस्था स्थापन झाली असून तिच्या वतीनें गडावर नवनवीन उपक्रम केले जात आहेत महादरवाजाचें छत दुरुस्त करण्यात आलें आहे महादरवाजा ओलांडून आंत गेल्यावर कांहीं थोडक्या पायऱ्या चढून जाताच डाव्या हातास श्री. भवानीचें देऊळ लागतें. भवानीच्या मूर्तीसमोर स्फटिकाचें एक देखणें शिवलिंग आहे. मंदिराच्या मागील बाजूस प्रतिष्ठानाच्या वतीनें एक भव्य, सर्व सोईंनीं युक्त असें विश्रामगृह नुकतेंच बांधण्यात आलें आहे. मंदिरातून बाहेर पडल्यानंतर डाव्या हातास फडणीस, पुजारी इत्यादि सेवेकऱ्यांचीं घरें लागतात. पायऱ्या चढून गेलें, कीं गडाचा बालेकिल्ला लागतो. त्याच्यासमोर हनुमानाचें मंदिर आहे

दरवाज्यातून आत शिरल्यानंतर डाव्या हातास महादेवाचें मंदिर आणि सदरेची जागा लागते. उजवीकडे श्रीछत्रपतींची अश्वारूढ प्रतिमा आणि तिच्या भोंवतालीं उद्यान आहे. तसेंच पुढें गेल्यावर जावळी खोरें आणि आकाश स्वच्छ असेल, तर उत्तरेस रायगडही दिसूं शकतो. दक्षिणेस असलेला मकरंदगडही सहज न्याहाळता येतो पूर्वेकडील महाबळेश्वरची भव्य पर्वत श्रेणी नजर खिळवून टाकते.

भवानीमंदिराच्या पूर्वेस बराच लांबपर्यंत गेलेला तटबंदीचा एक चिंचोळा भाग आणि त्याच्या शेवटी अफजलबुरूज, हें दृश्य लक्ष वेधून घेण्यासारखें आहे. अफजलबुरुजावरून उजवीकडे असलेली अफजलखाँची कबर अगदीं सहज दिसू शकते.

महाबळेश्वरहून प्रतापगडापर्यंत बसेस सुटतातच. त्याशिवाय खाजगी गाड्याही मिळूं शकतात. पायथ्यापासून थेट वरपर्यंत जाण्यासाठीं अशक्तास खुर्च्याही उपलब्ध असतात चौघे भारवाहक खुर्चीसह माणसाचें ओझें वरपर्यंत नेतात. पायथ्याशीं पोहोंचल्यावर प्रतापगड पाहून परतणें हें सहज शक्य आहे.

मराठ्यांच्या इतिहासातील अत्यंत रोमहर्षक प्रसंग ज्या स्थळीं घडला तें हें स्थळ प्रत्येक भारतीयानें एकदां तरी पाहावें असें आहे.

## मकरंदगड

राजगड, तोरणा, रायरेश्वर, महाबळेश्वर इत्यादि स्थळीं जाणाऱ्या प्रवाशांचें लक्ष आपल्या घोड्यावरील खोगिराच्या आकृतीनें वेधून घेणारा मकरंदगड महाबळेश्वरापासून वायव्येस सुमारें सात मैलांवर आहे. मुंबई पॉइंट, बॉबिंगटन पॉइंट, ससून पॉइंट इत्यादि महाबळेश्वरावरील स्थानापासून हा चांगला स्पष्ट दिसतो. महाबळेश्वर मकरंदगडापेक्षा अदमासें सहाशें फूट उंच आहे.

बॉबिंगटन पॉइंटवरून खालीं उतरलें कीं देवली नामक खेड्यापाशीं कोयना नदी आडवी येते ती ओलांडून पलिकडील टेकडी चढलें कीं घोणसपूर येतें. हें खेडें मकरंदगडाच्या ऐन पायथ्याशी आहे.

किल्ल्याच्या आकारावरून तसें पाहण्यासारखें आता फारसें काहीं उरलें नाहीं. तट बहुधा सर्व पडून गेला आहे. दरवाजाची तीच गत. किल्ल्याच्या वायव्य टोकावर जाणें प्राय अशक्यच आहे. मात्र नैर्ऋत्य टोकावर शिडी लावून जाता येतें.

या टोकावर मल्लिकार्जुनाचें प्राचीन देवालय आहे. दर वर्षी त्याची यात्रा भरते, तेव्हा भवताऊचे खेडून देवाच्या दर्शनास जातात. एरवीं फारसें कोणी या किल्ल्याकडे वळत नाहीं

## वासोटा

जावळी तालुक्याच्या ईशान्येस कोयनेचें खोरें. त्या खोऱ्यामध्यें तांबी नामक खेडें. जवळच वासोटा आणि मेट इंदोली नामक आणखी दोन लहान लहान गावें. या तिन्ही गांवाच्या कुशींत सह्याद्रीच्या एका फाट्यावर वासोटा किल्ला उभा आहे. उंची समुद्रसपाटीपासून सुमारे ३७०० फूट.

मेट इंदोलीमधून किल्ल्याची वाट जाते. प्रारभीं कारवीचें दाट रान आहे. तें पुढें कमी होतें. किल्ल्याजवळील प्रदेश मोकळा आहे. दरवाजा दुहेरी आहे. माथा सपाट. सुमारें पधरा एकर आकाराचा. त्यावर महादेव आणि चंडिका अशीं दोन प्राचीन देवालयें. तीन चार टाकीं आणि दोन तळीं. पैकीं धाकट्याचें पाणी चांगलें आहे.

सध्या पडून गेलेला एक प्रचण्ड वाडा, त्यात बहुधा किल्लेदार राहात असावा. तट प्रायः सर्वच पडून गेलेला. काहीं भागाची शिवकालोत्तर दुरुस्ती केलेली असावी. पश्चिम दिशेस अदमासें दीडशें फूट खोलीचा बाबूकडा नावाचा कडा आहे. ती अपराध्यास लोटून ठार मारण्याची जागा. माथ्यावरून कोंकण फार सुंदर दिसतें.

भोज शिलाहारानें हा किल्ला बांधला. जावळी सर केल्यावर शिवछत्रपतींनीं इ. स. १६५५ मध्यें हा किल्ला जिंकला. राजांनीं याचें नामकरण वज्रगड असें

केलें होतें शिवकालीं आणि नतर एक उत्तम तुरुंग म्हणून याचा वापर केला जात असे दुसऱ्या बाजीरावानें सातारकर छत्रपति आणि त्याचें कुटुंब इथें कांहीं दिवस ठेवलें होतें

हटर आणि मॉरिसन नामक दोघा इग्रजास पकडून सेनापति बापू गोखले याच्या आज्ञेने या किल्ल्यावर ठेवलें होते.

तत्पूर्वी प्रतिनिधींची रक्षा ताई तेलीण इजकडे हा किल्ला काहीं दिवस होता. सेनापति बापू गोखल्यानीं हा घेण्याचे प्रयत्न केले. पण ताईनें कांहीं काळपर्यंत बापूची मात्रा चालू दिली नाहीं त्या प्रकारासबधींची एक आर्या प्रसिद्ध आहे—

पतप्रतिनिधि याचा किल्ला आहे अजिंक्य बासोटा
तेलिण मारी सोटा बापु गोखल्या सभाळ कासोटा ॥

## सज्जनगड

अजिंक्यताऱ्याजवळील बोगदा ओलाडून दक्षिणेकडे निघावें तर पश्चिम दक्षिणेकडे असलेला सज्जनगड इतर डोंगरातून सुटावलेला सहज दिसू लागतो. साताऱ्हून सज्जनगडाकडे बसेस सुटतात. त्याचप्रमाणें खाजगी मोटारीही मिळूं शकतात. उरमोडी नदीच्या तीरावर असलेलें परळी गाव सज्जनगडाच्या ऐन पायथ्याशीं आहे. परळी ते सातारा हें अतर सुमारें ६ मैल आहे. गावाच्या पलिकडे गेलें, कीं किल्ल्यावर जाण्याची वाट लागते पूर्वी वाट अनगड होती पण आता समर्थभक्तांच्या साह्यानें थेट वरपर्यंत पायऱ्या बाधलेल्या आहेत. चढाच्या सुमारें मध्यभागीं डाव्या हाताच्या देवळींत कल्याणस्वामींची एक सुबक प्रतिमा आहे.

किल्ल्याच्या दक्षिणेकडील कोपऱ्यात किल्ल्याचे दोन मुख्य दरवाजे आहेत पैकीं एका दरवाजावर एक कोरीव शिलालेख आहे. दोन्ही दरवाजाना साधणाऱ्या पायऱ्या ओलाडून आत गेलें, कीं गडाचा आटोपशीर माथा दिसू लागतो. गडावरील मुख्य इमारत श्रीराम मंदिर आणि त्याच्या शेजारीं असलेली श्रीसमर्थांची समाधि. या इमारतींपर्यंत दरवाजातून थेट फरसबंदी वाट गेली आहे.

६०३ 22८५८

डाव्या हातास थोडें दूरवर आगलाई देवीचें प्राचीन देऊळ आहे. मंदिराजवळच कैलासवासी श्रीधरस्वामींची कुटी आहे.

मंदिराचा गाभारा ओलांडून आत शिरलें, कीं आपण समर्थांनीं स्थापन केलेल्या श्रीरामपंचायतनापाशीं पोहोंचतो मंदिर स्वच्छ नेटकें आहे. देवळासमोर अशोकवृक्षाची सुंदर राई आहे राइच्या पलिकडे भोजनशाळा आणि यणाऱ्या प्रवाश्यासाठीं बांधलेल्या खोल्या आहेत.

मंदिराकडे तोंड करून उभें राहिलें, कीं डाव्या हातास श्रीसमर्थांचा मठ आहे. त्यात श्रीसमर्थांस शिवछत्रपतींनी दिलेला पलंग, समर्थांची कुबडी, पीकदाणी इत्यादि वस्तु सांभाळून ठेवल्या आहेत.

मंदिराखालीं तळघरात श्रीसमर्थांची समाधि आहे. तिची तिन्ही त्रिकाळ मोठ्या निष्ठेनें समारंभपूर्वक पूजा केली जाते.

राममंदिराच्या उत्तरेस पाण्याचें एक तळें आहे. तळ्याच्या भोंवतालीं कांहीं घरें आहेत. तिथें श्रीसमर्थांच्या समाधीचे सेवेकरी आणि पुजारी राहतात.

सज्जनगड अर्थात परळीचा किल्ला हा भोजशिलाहारानेंच बांधलेला असावा. इ. स. १६७३ मध्यें हा शिवाजीराजानीं जिंकून घेतला. त्यानंतर आपले गुरु श्रीरामदासस्वामी यास मोठ्या आदरानें आणून त्यांची स्थापना राजानीं या किल्ल्यावर केली. समर्थांच्या काळात महाराष्ट्रातील कित्येक संतमहंतांचा राबता या किल्ल्यावर होता. इ. स. १६८० सालीं शिवछत्रपतींचें निधन झाल्यावर श्रीसमर्थ उदास झाले, आणि इथेंच किल्ल्यावर त्यानीं इ. स. १६८१ मध्यें समाधि घेतली.

इ. स. १८१८ मध्यें मराठेशाही बुडाल्यावर इंग्रजानीं आपल्या फलटणीची एक तुकडी किल्ल्यावर ठेवली होती.

श्रीसमर्थ सेवा मंडळाच्या प्रयत्नामुळें सध्या किल्ल्यावरची व्यवस्था चांगली उत्तम ठेवली जात आहे.

## कल्याणगड ( नांदगिरी )

कोरेगांवाच्या उत्तरेस ८ मैलांवर सातारा स्टेशन-पासून जवळच महादेवाच्या डोंगराच्या फाट्यावर कल्याणगड आहे. याची उंची समुद्रसपाटीपासून ३॥ हजार फूट आहे. किल्ल्याच्या सर्व बाजूंनीं तुटलेला कडा आहे. पायथ्याशीं असलेल्या धुमाळवाडींतून किल्ल्यांत चढावें लागतें. रस्ता वळणावळणाचा आहे. निम्मा चढ चढून गेलें, कीं एक गुहा लागते. गुहेंत शिरल्यावर आंत असलेल्या थंड पाण्यामधून चालत जावें लागतें गुहेच्या अगदीं मागील भागात पार्श्वनाथाची एक सुंदर मूर्ति आहे.

किल्ल्याला दोन दरवाजे आहेत. पैकीं पहिल्या दरवाजांतून आत शिरलें, कीं एक तळघर लागतें. पूर्वेकडे एक टाकी आहे. तींतील पाणी फार चांगलें आहे. दुसऱ्या दरवाजातून आत शिरल्यावर आपण किल्ल्याच्या माथ्यावर येतों. तिथें काहीं उध्वस्त घराचे अवशेष आहेत किल्ल्यावर एकूण चार तळीं आहेत. पैकीं सगळ्यात मोठें तळें ९० फूट लांब आणि ४० फूट रुंद आहे.

किल्ल्यावर सामान्यपणें मध्यभागीं एक वटवृक्ष आहे. हा फार लांबून दिसू शकतो. याचे जवळच अबदुलकरीम नामक एका मुसलमान फकिराची समाधि आहे.

इ. स. १८७३ मध्यें हा किल्ला छत्रपति शिवाजी महाराजाच्या सैनिकांनीं जिंकून घेतला. याचाही निर्माता भोजशिलाहारच होता, असें म्हणतात.

●

## वसंतगड

पुण्याहून कऱ्हाडला जातांना कऱ्हाडजवळ उजव्या हातास तळबीड नावाचें गाव आहे. त्याच्या पाठीमागे वसंतगड हा भक्कम किल्ला उभा आहे.

तळबीडमधूनच किल्ल्यावर जाण्याचा मार्ग सुरू होतो. किल्ल्याचा दरवाजा पूर्व दिशेस आहे. तळाशीं आग्नेयेस असलेल्या खोडशी या खेड्यामधून किल्ल्यापर्यंत तोफा नेण्यासाठीं एक ओबडधोबड गाडीवाट पूर्वी केलेली होती.

मुख्य दरवाजाच्या आत आणिक एक दरवाजा आहे माथ्यावर असलेली एकमेव उत्तम इमारत म्हणजे वसंतगडावरचे श्रीराममंदिर. चैत्र शुद्ध नवमीस श्रीरामजन्माच्या उत्सवाच्या वेळीं किल्ल्यावर यात्रा भरते

मंदिराच्या उत्तरेकडे एक भव्य बुरूज आहे त्यावर उभें राहिलें असता कृष्णा-कोयनाचीं खोरीं आणि संगमावर पसरलेलें कऱ्हाड इत्यादि मुलूख स्पष्ट दिसतो. पश्चिमेस असलेल्या कोंकणापर्यंतचा सगळा प्रदेश डोंगरानीं भरलेला आहे.

## जंगली जयगड

पाटणच्या पश्चिमेस, कोयना धरणाच्या तीरावर असलेल्या हेळवाकच्या ईशान्येस कोंकणच्या दिशेस झुकलेल्या एका डोंगराच्या शिखरावर हा दुर्गम किल्ला बांधलेला आहे वाटेंत तोरणें आणि नावजे अशीं दोन लहान खेडीं लागतात पुढे बाजूच्या दाट अरण्यातून वाट काढीत गेल्यावर एक टेकडी लागते आणि तिथून १०० हात लांबीवर खालीं तळात जंगली जयगड आहे. वाटेने गच्च कारवीचें रान आहे.

एक खडक चढून गेल्यावर किल्ल्याच्या उत्तराभिमुख द्वारातून आत प्रवेश होतो. आत पुष्कळ इमारतींचे उध्वस्त अवशेष आणि कित्येक तळीं आहेत. पश्चिमेस कोंकणापर्यंत तुटलेला कडा आहे

तिथून मकरंदगडापर्यंतचें सह्याद्रीमधलें दाट अरण्य स्पष्ट दिसू शकतें.

इ. स. १८१० मध्यें पतप्रतिनिधींची रक्षा जी ताई तेलीण तिच्या स्वाधीन हा किल्ला होता.

## चंदन-वंदन

लोहगड आणि विसापूर या जोडकिल्ल्याप्रमाणेंच सातारा जिल्ह्यांतील चंदन आणि वंदन ही किल्ल्यांची जोडीही इतिहासांत प्रसिद्ध आहे. पैकीं वंदनला जायची वाट जरंड्याखालील वाडीतून फुटते. अनगड धोंड्यानीं बांधलेल्या उखलखल पायऱ्यावरून चढाव चढत गेलें, कीं पूर्वेकडील पहिला दरवाजा लागतो. इथून पुढील वळणांची वाट चालून गेले कीं फार्शी शिलालेख असलेला दुसरा दरवाजा येतो. आंतील बाजूस पाहारेकऱ्यांसाठीं बांधलेल्या खोल्या आहेत.

पुढें काहीं पायऱ्या चढल्यावर किल्ल्याचा माथा येतो. वरतीं पडापड झालेलीं कित्येक घरें आणि चौथरे आहेत. त्यामध्यें ब्राह्मणआळी नामक दों बाजूला असलेल्या चौथऱ्याची ओळ आहे. पुनः काहीं पायऱ्या चढल्यावर येतो सरकारवाडा. शेजारीं एक मशीद आहे. सरकारवाड्याच्या खालच्या अंगास आणि कबरस्तानाजवळ पाण्याचे दोन उत्तम साठे आहेत. वायव्येकडील कोपऱ्यात एक भलें थोरलें फुटकें तळें आहे.

सरकारवाड्याच्याही वर उभ्या पायऱ्याची शभर फूट उंचीची एक टेकडी आहे. तिच्या माथ्यावर एका वाड्याचे ध्वस्तावशेष आहेत.

भोंवतालीं आवश्यक तिथें तटबंदी आणि बुरूज बांधले आहेत.

चंदन किल्ला वंदनापासून सुमारें अर्ध्या मैलावर आहे. याचा दरवाजा नैर्ऋत्य दिशेस आहे. दरवाजापर्यंतची वाट बिकट आहे. पुढें काहीं पायऱ्या चढून गेलें कीं आपण माचीवर पोंचतों. तिथे एक प्रचण्ड वटवृक्ष आणि महादेवाचें देऊळ आहे. तिथून माथ्यावर पोंचण्यासाठीं कांहीं फरसबंदी पायऱ्या चढाव्या लागतात. इथें अपूर्ण अवस्थेतील एका इमारतीचे दोन दगडी खांब आहेत. प्रत्येक खांब च्यार चार भल्या थोरल्या दगडाचा आहे. पूर्वी तटावर मोठमोठे धोंडे कसे चढवीत, याची काहींशी कल्पना या खांबावरून येते. पहिला दगड तळात रचल्यावर शेजारीं तेवढा मातीचा भराव घालून त्यावरून लोटीत दुसरा दगड, असे हे च्यारी दगड चढविले आहेत

किल्ल्यात एक फुटलेलें तळें आणि काहीं इमारतींचे अवशेष आहेत.

भोज शिलाहारानें निर्माण केलेल्या किल्ल्याच्या संघात या जोड किल्ल्यांचा अन्तर्भाव होतो

## अजिंक्यतारा

सातारच्या दक्षिणेस अगदीं गांवालगत असलेल्या या किल्ल्यास औरंगजेबानें अजिमतारा हें नाव दिलें होतें. पण सध्या लोक यास अजिंक्यतारा याच नावानें ओळखतात. सातारा शहरापासून या किल्ल्याची उंची अदमासें ९०० फूट आहे. याच्या माथ्यावरून उत्तरेकडे वसलेलें सातारा शहर, चंदन–वंदन, पश्चिमेकडील यवतेश्वर, दक्षिणेकडील सज्जनगड इत्यादि प्रदेश दिसूं शकतो. याची पूर्वपश्चिम लांबी ११०० यार्ड आणि दक्षिणोत्तर रुंदी ६०० यार्ड आहे. या किल्ल्यास दोन दरवाजे आहेत. पैकीं महाद्वार उत्तर दिशेला. तर धाकटा दरवाजा दक्षिणेकडे आहे. सातारा शहरामधून थेट किल्ल्यापर्यंतचा पक्का रस्ता बांधलेला आहे. जुने रस्ते दोन. एक भवानी पेठेंतून आणि दुसरा अदालत वाड्यावरून वर जातो.

तटाची रुंदी सुमारें १० फूट आहे. उंची अदमासें १५ फूट. भोंवतालीं बुरूज बांधलेले आहेत. किल्ल्यात ८-९ तळीं आहेत. दुसरे बाजीराव पेशवे यांनीं बांधलेला वाडा आणि इतर कांहीं घरें सध्या मोडकळीस आलेलीं आहेत. किल्ल्याच्या ईशान्य कोपऱ्यात मंगळाई देवीचें देऊळ आहे. या शतकाच्या प्रारंभापर्यंत किल्ल्यावर ब्रिटिश फौज ठेवलेली असे.

हा किल्लाही भोज शिलाहारानें बांधला आहे. पुढें यावनी सत्तेखालीं आल्यावर इ. स. १५८० मध्यें नगरची विख्यात चांदबीबी हिला या किल्ल्यात कांहीं दिवस कैदेंत ठेवलें होतें.

छत्रपति शिवाजीमहाराजांनीं १६७३ मध्यें हा किल्ला जिंकून घेतला. इ. स. १६९९ मध्यें औरंगजेबानें या किल्ल्यास वेढा घातला. त्यानें किल्ल्याची चहूंकडून नाकेबंदी केली. मराठ्यांचा किल्लेदार प्रयागजी प्रभू यानें मोठ्या शर्थीनें किल्ला लढविला. किल्ला हस्तगत होत नाहीं हें पाहून औरंगजेबानें किल्ल्याच्या तटाखालीं सुरुंग खोदविले. पैकीं एक सुरुंग उडताच ही मौज पाहण्यासाठीं तटावर जमलेले मराठे सैनिक आकाशात उडाले. इतक्यात दुसराही सुरुंग उडाला, आणि त्यामुळें आकाशात उंच गेलेला कडा बाहेरील दिशेस कोसळून त्याचे खालीं मोगलांचे सुमारें २ हजार सैनिक ठार झाले. तरी मराठे दाद देईनात. शेवटीं किल्ल्यातील अन्नसामग्री संपल्यावर निरुपायानें मराठे किल्ला खालीं करून निघून गेले.

इ. स. १७०६ मध्यें छत्रपति राजाराम महाराज जिंजीहून महाराष्ट्रात आले

आणि त्यानीं किल्ला घेतला. इ. स. १७०८ मध्यें शाहू महाराज उत्तरेंतून आल्यावर हा किल्ला त्याच्याकडे आला. इ. स. १७३० मध्यें छत्रपति ताराऊसाहेब आणि इ. स. १७४१ मध्यें अर्काटचा नबाब चंदासाहेब अशीं दोघें जणें या किल्ल्यावर कैदेंत होतीं. इ. स. १८१८ पर्यंत हा किल्ला सातारकर छत्रपतींकडे होता. इ. स. १८१८ मध्यें इंग्रजानीं मराठी राज्याबरोबर हाही किल्ला बळकावला.

●

## केंजळगड

सातारा जिल्ह्यातील किल्ल्यांपैकीं ज्या किल्ल्याच्या पायऱ्या फार श्रम करून खडकात कोरलेल्या आहेत, असा हा केंजळगड वाईच्या ईशान्येस सुमारें ११ मैलावर आहे या दिशेस असलेल्या महादेवाच्या डोंगराचा मांढारदेव नांवाचा एक सुळका पुढें आलेला आहे. त्यावर हा किल्ला बांधलेला आहे. याच किल्ल्याच्या उत्तरेस असलेल्या रायरेश्वर या इतिहासप्रसिद्ध देवस्थानाकडे याच सोंडेवरून जाता येतें.

किल्ल्याची उंची समुद्रसपाटीपासून सुमारें ४॥ हजार फूट आहे. किल्ल्याचा माथा केवळ अडीचशें यार्ड लांब, १०० यार्ड रुंद आहे वाईकडून असें खवली नावाच्या खेड्यातून या किल्ल्याचा रस्ता जातो, तर उत्तरेकडील आंबेवर या गावामधूनही या किल्ल्यावर चढतां येते. किल्ल्यावर चढण्याचा रस्ता मात्र उत्तरेस आहे. या दिशेनें कडा तोडून १०० पायऱ्या खणलेल्या आहेत. एका बाजूस उंच खडक आणि दुसऱ्या बाजूस खोल कडा अशी ही पायऱ्याची वाट मोठी बिकट आहे. पायऱ्याच्या प्रारंभीं एक मोठा बुरूज बांधलेला आहे.

किल्ल्यात काहीं जमीनदोस्त झालेल्या इमारती आहेत पैकीं दारूच्या कोठाराची इमारत काहीशी बऱ्या अवस्थेंत आहे किल्ल्यात पाण्याचीं ५–७ टाकीं आहेत, पण उन्हाळ्यांत तीं सर्व आटून जातात.

या किल्ल्यावरून दक्षिणेकडील पांचगणी, महाबळेश्वरची पठारें आणि उत्तरेकडील रायरेश्वरचें पठार इत्यादि प्रदेश दिसू शकतो.

●

## वैराटगड

वाईच्या नैर्ऋत्येस ६ मैलावर पाचगणीकडून या दिशेस आलेल्या डोंगराच्या एका सोंडेवर वैराटगड उभारला आहे. तळाशीं असलेल्या व्यवधन गावातून सुमारें २ मैल चालून गेलें, कीं आपण किल्ल्याच्या माथ्याजवळ पोहोंचतों. सभोंवतालचा कडा सुमारें ३० फूट उंचीचा आहे. या कड्यावर अदमासें पुरुषभर उंचीचा तट बांधलेला आहे. तटाचें काम करताना चुना वापरलेला नाहीं. किल्ल्यावर सदर, सैनिकासाठीं बांधलेल्या अलगा इत्यादि काहीं घरांचे ध्वस्तावशेष आहेत. किल्ल्यावर ४-५ पाण्याचीं टाकीं आहेत.

भोज शिलाहारानेंच याही किल्ल्याची निर्मिती केली. किल्ल्याच्या मध्यभागीं एक झाड आहे. तें खूप दुरून दिसतें. किल्ल्याच्या तटातून खालीं उतरण्यासाठीं एक चोरवाट आहे.

या किल्ल्यावरून पूर्वेकडला बराच मोठा प्रदेश दिसू शकतो.

●

## पांडवगड

वाईपासून ईशान्येस अदमासें ४ मैल अंतरावर चार हजार फूट उंचीचा पांडवगड हा किल्ला आपल्या नैसर्गिक रचनेनें लक्ष वेधून घेतो किल्ल्याच्या पायथ्याशी शेलारवाडी नावाचें गाव आहे. तिथून थोडी चढण चढून गेलें म्हणजे किल्ल्यावरील देवस्थानाचे पुजारी जे कोळी, त्यांची वस्ती लागते. या वस्तीपासूनचा अदमासें २०० यार्ड उंचीचा चढाव थोडा अवघड आहे. खडक फोडून त्यात ओबडधोबड पायऱ्या कोरलेल्या आहेत, त्या चढाव्या लागतात.

किल्ला सामान्यपणें चौरस आकाराचा आहे. वरील भूमीचें क्षेत्रफळ ६ एकर दरवाजा उत्तराभिमुख आहे. त्याची बांधणी काहीं जुनी आणि काहीं नवी अशी सरमिसळ पद्धतीची आहे. माथ्यावरती अदमासें १०० फूट लांब आणि ६० फूट रुंद असें कोरडे तळें आहे. याशिवाय १०–१२ लहान टाकीं असून

त्यापैकीं २ टाक्याचें पाणी उत्तम आहे. आत देवीचीं दोन ठेंगणीं देवळें आहेत.

कोल्हापूरच्या शिलाहार घराण्यापैकीं भोज शिलाहारानें दक्षिणेकडे जे किल्ले बांधले त्यांमध्यें पांडवगडाची गणना होते. इ. स. १६७३ मध्यें पांडवगड शिवाजीमहाराजांनीं जिंकला. इ. स १७०१ मध्यें औरंगजेब दक्षिणेवर स्वारी करून आल्यावर हा किल्ला त्याच्या हातीं आला, पण लौकरच तो मराठ्यांनीं परत घेतला इ. स. १८१७ मध्यें दुसऱ्या बाजीरावाचा मंत्री त्र्यंबकजी डेंगळे यानें हा किल्ला बळकाविला पण पुढें इ. स. १८१८ मध्यें मराठेशाही बुडाली त्या वेळीं इतर किल्ल्यांबरोबर हाही इंग्रजांनीं जिंकला. या किल्ल्यावरून भोंवतालच्या डोंगरांनीं वेढलेला प्रदेश आणि कृष्णेचें खोरें दिसू शकतें

●

# कोल्हापूर जिल्हा :

## पन्हाळगड

कोल्हापूरपाशीं पोचलें, कीं सह्याद्रीचें उग्रपण मावळतें. दरारा मात्र शिल्लक उरतो. त्याच्या भोंव-तालींच्या रांगा ठेंगण्या होत गेल्या आहेत. पैकीं वायव्येकडे एक रांग उतरली आहे. तिचें एक टोक ज्योतिबा. तिच्या पुढलें पन्हाळगड, शेवटील टोक मसाईचें पठार.

कोल्हापूरहून अंबाघाट मार्गें कोंकणाकडे निघालें, कीं वाघबिळापासून पन्हाळ्याचा फाटा फुटतो, अन् २० किलोमीटर अंतर कापलें, की आपण पन्हाळ्यावर पोहोंचतों. पन्हाळ्यावरून दिसणारा परिसर मोठा देखणा आहे. कोल्हापुरापाशीं पंचगंगेचें पात्र. ऊसमळ्याची दाटी. साखर कारखान्याचीं धुराडीं. पश्चिमेकडे अंबा घाट. अणस्कुरा घाट. उत्तरेस वारणानदीचें खोरें. दक्षिणेस भोगावती. खेटून वाहाणारी कासारी. कडे खिंड, कोतोळी खिंड, अशा पन्हाळ्याकडे येणाऱ्या वाटा. मावळतीकडले कोंकण खुणावत असतेंच. अशा या मोक्याच्या ठिकाणीं फार वर्षांपासून पन्हाळगड वसला आहे. पन्हाळ्यास अनेक पायवाटांनीं पोहोंचता येतें. पश्चिमेकडून गडावर यायला तीन दरवाज्यावाटे आणखी एक वाट आहे.

समुद्रसपाटीपासून हिशेब करता पन्हाळगड ९४० मीटर उंच आहे खरा, पण कोल्हापूरपासून ही उंची सुमारें २१० मीटर आहे. ऐन पायथ्यापासून तर केवळ ८२ मीटर उंचीवर पन्हाळा वसला आहे. पाऊस ११५ सें मी. पडतो. दीड दोन महिने वगळता वर्षभर हवा अतिशय सुखकर असते गडावर बकुळीचे

वृक्ष खूप आहेत. त्यांच्या फुलाचा गंध सर्वत्र दरवळत असतो.

पन्हाळगड बहुत जुना. याचीं कितीक नावें. पुराणकाळचें नाव ब्रह्मगिरि. पुढें पराशर ऋषीचें तपश्चर्यास्थळ, म्हणून पराशराश्रम असें नामकरण झालें. पन्नगालय नावानेंही हा किल्ला ओळखला जात असे. पन्हाळगडावर अनेक तळीं. त्यात फुलणाऱ्या कमळावरून पद्मालय असें नांव त्यास लाभलें. शिवकालीन संस्कृत काव्यामध्यें कवींनीं यास पर्णालदुर्ग म्हटलें. गड आदिलशाहींत नांदू लागला, त्या वेळीं काहीं दिवस शहानबी दुर्ग म्हणूनही ओळखला जाऊ लागला. पण पन्हाळा हें नाव आज सर्वत्र रूढ आहे.

हा किल्ला कोणीं बांधला याविषयीं इतिहासवेत्त्यामध्यें थोडा मतभेद आहे. दंतिदुर्ग, राष्ट्रकूट यांच्याकडे कोणी या किल्ल्याच्या निर्मितीचें श्रेय देतात. काहांच्या मतें भोजशिलाहारानें इतर अनेक किल्ल्याबरोबर याचीही निर्मिती केली काहीं का असेना, याच्या तटाबुरुजाची पुन्हा एकदा बांधणी करून भोज शिलाहारानें याचा पुनरुद्धार केला. त्याची राजधानी पन्हाळ्यावर होती. शिलाहारानंतर यादव, पाळेगार, बहमनी अशा कित्येक सत्ता पन्हाळ्यावरच नांदल्या. गडावरील काहीं इमारतींची निर्मिती आदिलशाहीच्या काळात झाली आहे. मात्र महाराष्ट्राच्या इतिहासात पन्हाळा प्रसिद्धीस आला तो शिवकाळातच. शिवछत्रपतींचें पन्हाळ्यावर, फार प्रेम. दिनांक २८ नोव्हेंबर १६५९ च्या मध्यरात्रीं शिवछत्रपतींनीं पन्हाळ्यास प्रथम पदस्पर्श केला. त्यानंतर दिनांक २ मार्च १९६० रोजीं ते पुन्हा पन्हाळ्यावर आले, आणि पाठोपाठ सीद्दी जौहरनें पन्हाळ्यास वेढा घातला. हा सिंह पिंजऱ्यात कोंडला गेला. शेवटीं मोठ्या हिकमतीनें सीद्दीस तहाच्या बोलण्यात गुतवून दिनांक १२ जुलै रोजीं महाराज राजदिंडींतून पन्हाळा उतरले, आणि विशाळगडाकडे चालते झाले. ती आषाढी पौर्णिमा होती. कोसळत्या पावसांत महाराजांनीं हें साहस केलें. दुसरे दिवशीं गजापुराजवळील पावनखिंडींत बाजीप्रभु देशपांड्याच्या वीरमरणाचा रोमहर्षक प्रसंग घडला. इथपासून तो दिनांक ६ मार्च १६७३ पर्यंत पन्हाळा विजापूरकराकडे होता. दिनांक ६ मार्च रोजीं कोंडाजी फर्जंद, गणाजी, मोत्याजीमामा खळेकर असे छातीचे बांके मावळे पन्हाळ्यावर कोसळले आणि केवळ साठ मावळ्यानिशीं कोंडाजीनें पन्हाळा जिंकून शर्थ केली.

महाराजांचें निधन झालें त्या वेळीं शंभुराजे पन्हाळ्यावरच होते. इथूनच ते

गयगडला निघाले. पुढें औरंगजेबाकडून तो मराठ्यांनीं पुन्हा जिंकून घेतला. नंतर तो कोल्हापूरकर छत्रपतींकडे होता उन्हाळ्यात कोल्हापूरकर छत्रपति पन्हाळ्यावर येऊन राहात. कित्येकदा तर त्यानीं कोल्हापूर संस्थानाचा राज्यकारभार इथूनच चालविला.

नामांकित वस्ती, दवाखाना, वाचनालय, प्रवाशासाठीं विश्रामगृहें इत्यादि सर्व सोयी ज्यावर आहेत असा किल्ला महाराष्ट्रात एकमेव पन्हाळा.

एस्. टी. थेट गडात जाऊन उभी राहाते. पूर्वी चार दरवाजा होता, तो पाडून तिथून आत प्रवेश करायची डांबरी सडक निर्मिली आहे किल्ला अदमासे ८ कि. मी. घेराचा आहे. वर सपाटी भरपूर आहे. सज्जाकोठी, कलावंतिणीचा सज्जा, बालेकिल्ला, गंगाजमना कोठ्या, तीनदरवाजा, वाघ दरवाज्याजवळचें तबक उद्यान, जलमंदिर, कोल्हापूरकर संभाजीराजाचें देवालय, धर्मकोठी, नागझरी, पराशरगुहा, साधोबाचा दर्गा, सोमेश्वर तलाव, एकमुखी दत्तमंदिर, कवि मोरोपंताचें जन्मस्थान, रामचंद्रपंत अमात्याची समाधि इत्यादि प्रेक्षणीय स्थळे किल्ल्यावर चहू बाजूस पसरली आहेत.

किल्ल्यावर मध्यमवर्गीयासाठीं शासनानें विश्रामगृहें बांधलीं आहेत. तीस रुपये अनामत रक्कम भरून तीं मिळू शकतात. प्रत्येक गृहात पाच माणसाची सोय आहे. भाडें प्रति दिवशीं सोळा रुपये पडतें. गडावर सर्वत्र नळ, शौचकूप, इत्यादि अद्ययावत सोयी आहेत. वीज सर्वत्र खेळविली आहे. उत्तम डांबरी रस्ते आहेत. शिवभक्त भालजी पेंढारकर, शांतारामबापू, लोहिया इत्यादींचे चांगले सुसज्ज बंगले गडावर आहेत. सज्जाकोठीमध्यें शासकीय विश्रामगृहही आहे बाजाराची सोय आहे. त्याशिवाय आठवडी बाजारही भरतो गावात भोजनालयेंही आहेत.

गडावर चारदोन दिवस राहायच्या बेतानें यावें. ज्यांना ऐतिहासिक वातावरणामध्यें, फारशी अडचण न होता सुखानें सुट्टी घालवायची असेल त्यांच्यासाठीं पन्हाळा हे एक उत्तम स्थळ आहे

३

## पावनगड

पन्हाळ्याच्या पूर्वेस सुमारे अर्ध्या मैलावर हा पन्हाळ्याचा उपदुर्ग बांधलेला आहे. पन्हाळा आणि पावनगड यांमध्यें एक मोठी दरी आहे. चहूबाजूंनीं २० ते २५ फूट उंचीचा कडा तुटला असल्यामुळें या किल्ल्यास विशेष बळकटी आलेली आहे. जिथें जिथें कड्याचा चढाव सोपा होता, तिथें तिथें तो फोडून उभा तासलेला आहे. किल्ल्याच्या सभोंवार १५ फूट उंचीचा तट उभारलेला होता. त्यास दोन दरवाजे होते. परंतु इंग्रजांनीं इ स. १७४४ मध्यें तट आणि दरवाजे पाडून टाकले.

किल्ल्यामध्ये काहीं प्राचीन घराचे अवशेष आणि तेल, तूप साठविण्याचे दगडी रांजण आहेत. किल्ल्यांत पाणी फार सुंदर आहे. किल्ल्याच्या दक्षिण दिशेकडे १०–२० नांदतीं घरें आहेत.

## विशाळगड

कोल्हापुरापासून विशाळगडापर्यंत पावसाळा वगळता इतर दिवसात एस्. टी. बसेस् जातात. आंबेघाटापासून डाव्या हातास रस्ता फुटतो, आणि तो पाढरपाणी, गजापूर या गावावरून विशाळगडापर्यंत पोहोंचता होतो. बसच्या थांब्यापासून पलिकडे गडापर्यंत एक दरी आहे. ती उलटून गेलें, कीं गडात पोहोंचायला काहीं पायऱ्या चढाव्या लागतात. सध्यां एका लहानशा दरवाज्यापलिकडे गडाचे सर्व दरवाजे पडलेले आहेत. आत शिरताक्षणीं एक लहानशी टेकडी लागते. तिच्या पलिकडे एका पीराचा दर्गा, सरकारवाडा, पाण्याचीं भोपाळ तळें आणि अर्धचंद्र तळें नावाचीं दोन तळीं आहेत. पैकीं भोपाळ तळें हें कोणी भूपाळ नृपाळानें बांधलें त्याचें क्षेत्रफळ अदमासें ६॥ हजार फूट आहे. अर्धचंद्र तळें १७ फूट लांब, १५ फूट रुंद आणि ८ फूट खोल आहे

तळ्याच्या काठावर महादेवाचें अतिशय गोमटें मंदिर आहे. शेजारीं देवाच्या

पुजाऱ्याचीं आणि सेवेकऱ्याचीं १०–२० घरें आहेत. देवळातील शिवलिंग अतिशय सुदर आहे

या वस्तीपासून पश्चिमेकडे निघालें, कीं, डाव्या हातास पाताळलोक नावाचा दरा आहे. त्यात नरवीर बाजीप्रभू आणि फुलाजी प्रभू याच्या समाध्या आहेत. वस्तीच्या उजव्या हातास राजाराम महाराजाच्या पत्नी सती गेल्या, त्याची सतीशिळा आहे.

गजापुरापासून अलिकडे सुमारें २ मैल अंतरावर इतिहासप्रसिद्ध पावनखिंड आहे. या खिंडीतच नरवीर बाजीप्रभू देशपांड्यांनीं केवळ ३०० मावळ्याच्या साह्यानें सिद्दी जोहारचें सैन्य अडवून शिवछत्रपतींना वाट मोकळी करून दिली होती. गडावरील तोफाचे आवाज कानीं पडल्यावर याच ठिकाणीं त्यांनीं देह ठेवला. त्यांचा मृतदेह विशाळगडावर नेऊन तिथें शिवछत्रपतींनीं त्यांचा अंत्यसस्कार करविला. इ. स. १६८९ मध्यें औरंगजेबानें या किल्ल्यास वेढा दिला. तो कित्येक महिनेपर्यंत चाललेला होता. शेवटीं मोठ्या शर्थीनें चहूंबाजूंनीं कोंडी झाल्यावर मराठ्यानीं निरुपायानें किल्ला सोडला

हाही किल्ला इतर किल्ल्याप्रमाणेंच भोज शिलाहारानें बांधला. या किल्ल्याच्या भोंवतालीं मलिक उत्तुजार, फाजलखान इत्यादि सेनापतींचीं मराठ्याशीं शर्थीचीं झुजें झालीं आहेत.

कोल्हापूरकर छत्रपतींनीं हा किल्ला पतप्रतिनिधींस दिला. ते तेथील सरकारवाड्यात राहून आपल्या संस्थानचा कारभार पाहात असत.

## रांगणा

ऐन घाटमाथ्यावर, भुदरगडाच्या नैर्ऋत्येस ३० मैलावर तर कोल्हापूरच्या नैर्ऋत्येस ५५ मैलावर रांगणा किल्ला उभारलेला आहे. पूर्व, पश्चिम आणि दक्षिण या तिन्ही दिशांनीं किल्ल्याची चढण अवघड आहे. फक्त उत्तरेकडील चढाव सोपा आहे. किल्ल्याची लांबी पूर्व पश्चिम पावणेपाचशें फूट तर दक्षिणोत्तर रुंदी बावीसशें फूट आहे.

भोज शिलाहारानें उभारलेल्या किल्ल्यापैकीं एक किल्ला रांगणा. याचें द्वार उत्तर दिशेस आहे. किल्ल्याच्या तटाचे दगड अनगड, चुन्यात बसविलेले आहेत. चहू बाजूंना इमारतींचे ध्वस्तावशेष आहेत. दोनतीन विहिरी आणि एखाददुसरें तळें एवढा पाण्याचा साठा आहे. तळ्याच्या पाळीवर एक देऊळ आणि त्याच्या-पुढें दीपमाळ आहे.

इ. स. १६५९ सालीं शिवछत्रपतींनीं हा किल्ला विजापुरकराकडून जिंकून घेतला, आणि त्याचा उत्तम बंदोबस्त केला. सध्या रांगण्यास गारगोटीवरुन बरेंच आंत जावें लागतें कित्येक मैल रान तुडवल्यावर, एका खिंडातून पश्चिकडे गेलें, कीं, एकदम रांगणा किल्ला दिसूं लागतो. किल्ल्यावरून साखरप्यापासूनचा थेट समुद्रापासूनचा कोंकण प्रदेश दिसूं लागतो.

## भूधरगड

कोल्हापूर जिल्ह्याच्या दक्षिण भागात कोल्हापूरपासून ३६ मैलावर भूधरगड उभा आहे. सध्या हा पेटा भूधरगड पेटा म्हणून ओळखला जातो. याची दक्षिण–उत्तर लांबी २६०० फूट आणि पूर्व–पश्चिम रुंदी २१०० फूट आहे. या किल्ल्याला दोन दरवाजे आहेत. तट बहुधा ढांसळलेला आहे. किल्ल्यात एक लहानसें खेडेंच वसलेलें आहे. किल्ल्यावर केदारलिंग आणि भैरव अशीं दोन देवस्थानें आहेत. इ. स. १६६७ सालीं शिवाजीराजांनीं या किल्ल्याची दुरुस्ती करून त्याचा उत्तम बंदोबस्त केला. शिवछत्रपतींच्या निधनानतर मोगलांनीं हा किल्ला जिंकून घेतला होता. पण अदमासें ५ वर्षांनीं मराठ्यांनीं हा पुन्हा बळकाविला. त्या वेळीं मोगल सेना-पतींचीं जीं निशाणें मराठ्यांच्या ताब्यात आलीं, तीं त्यांनीं भैरवनाथाचे मंदिरास देऊन टाकलीं.

या किल्ल्यात सध्या कोल्हापूरकराचा एक जुना वाडा आणि धान्याची एक कोठी आहे.

# ठाणें जिल्हा

### भुईकोट

ठाणें जिल्ह्यांत डहाणू, पालघर आणि वसई तालुक्यात पोर्तुगीजांनीं बांधलेले कित्येक भुईकोट आहेत. पैकीं डहाणू, शिरगांव, मनोर, दांतिवरें, केळवें, माहीम इत्यादि किल्ले इ. स. १७३९ मध्यें चिमाजी आप्पानीं वसई घेण्यापूर्वी जिंकून घेतले. सध्यां या सर्वच किल्ल्यांची पडापड झालेली आहे. यापैकीं काहीं किल्ल्यांपेक्षा तर पुण्याच्या शनवारवाड्याचेंही आकार अधिक मोठे आहे. भोंवताली तट, चार किंवा सहा बुरूज, आंत असलेली पाण्याचीं टाकीं, शिपायांचीं घरें, मुख्य दरवाजा, असें सामान्यपणें या भुईकोट गडाचे स्वरूप आहे.

बहुधा हे सगळे भुईकोट खाड्यांच्या तीरावर बांधलेले आहेत. पोर्तुगीज ही दर्यावर्दी जमात. पोर्तुगालशीं सरळ संबंध ठेवता यावा, या उद्देशानें त्यांनीं खाड्यांच्या तीरांवर हे कोट उभारले. याच्याच बळावर पोर्तुगीजांनीं कित्येक वर्षेंपर्यंत पश्चिम किनारा आपल्या स्वाधीन ठेवला होता.

## वसई

वसईरोड या पश्चिम रेल्वेवरील स्थानकापासून वसई शहर सुमारें ३ मैल लांब आहे, आणि शहराच्या पश्चिम दक्षिणेकडे मैलभर अंतरावर वसईचा भुईकोट किल्ला आहे.

पूर्वी किल्ल्याच्या चहू बाजूनीं पाण्याचा वेढा होता, पण आता केवळ उत्तर आणि पश्चिम या दोनच बाजू पाण्यानें वेढल्या आहेत.

वसई गावातून किल्ल्याकडे निघालें कीं उजव्या हातास किल्ल्याचें भव्य, वळणावळणाचें प्रवेशद्वार दिसतें. लाकडी फळ्यास मले प्रचण्ड लोखंडी खिळे ठोकलेले आहेत. दाराशेजारूनच तटावर चढता येतें, आणि तिथून किल्ल्याचें विहंगम दृश्य दिसूं लागतें. उत्तुंग प्रार्थनालयाचे भग्न मनोरे, प्रचण्ड वाड्याचे अवशेष, मोडलेल्या वाटा, बालेकिल्ला, तुरुंग, न्यायालय इत्यादि उध्वस्त मकाणें पाहून मन खिन्न होतें.

पायऱ्यावरून उतरावें, आणि किल्ल्यात प्रविष्ट व्हावें, तर आपण एका उत्तुंग चर्चपाशीं येऊन पोंचतों. धर्माध्यक्षाची वेदी आणि समोर प्रचण्ड आवार. त्यात कित्येक मृत पुरलेले आहेत, त्याच्या नांवाच्या शिळा पुर्तुगीज भाषेंत आहेत. पुर्तुगीज कलाकाराच्या शिल्पकलेनें मन थक्क होतें.

ती वाट दों बाजूच्या ध्वस्त ढिगाऱ्यातून दक्षिणेकडे जाते. पुढे एक गोड्या पाण्याची विहीर, बालेकिल्ला, न्यायालय, तुरुंग आदि इमारती आहेत. डावीकडे तीन चर्चेस् उभीं आहेत.

सेंट जोसेफचें मात्रिझ, नोस्स सिंज्योर द व्हीद, मिझरी कोर्दीय रुग्णालय, डोमिनिकन चर्च, जेसुइट चर्च, ऑगस्टिअन चर्च, फ्रान्सिस्कन चर्च या सर्व प्रचण्ड इमारती पाहून जेव्हा या नांदत्या असतील तेव्हा हें दृश्य कसें दिसत असेलसें वाटतें, पण इथेंच कुठें तरी पेटत्या चितावर जिवंत जाळल्या गेलेल्या धर्मनिष्ठाचे आकात घुमत असतीलसे जाणवून मन खिन्नतेनें भरून येतें.

डाव्या हातास चौकामध्यें दोन मंदिरें. एक वज्रेश्वरीचें आणि दुसरें शंकराचें. पैकीं वज्रेश्वरीचें मंदिर चिमाजी आप्पानीं वसईचा पाडाव केल्यावर त्या पराक्रमाचें स्मरण म्हणून बांधलें आहे.

डाव्या हाताची वाट पुढें बंदराकडे बाहेर पडते. बंदरात एक सुबक धक्का बांधला आहे बाहेरून तटाचें दृश्य भव्य दिसतें. परत फिरावें, तर वाटेंत एक मारुताचें मंदिर दिसतें. अर्थात् हीं सर्वच मंदिरें वसई मराठ्यांच्या ताब्यांत आल्यावर निर्माण झालेलीं आहेत.

किल्ल्याच्या पूर्व अंगानें तट फोडून सडक थेट बंदरापर्यंत काढलेली आहे. तिनें माघारें वळावें, तों उजव्या हातास चिमाजी आप्पाच्या सैनिकांनीं उढविलेला सॅबॅस्टिअन बुरूज लागतो तो मराठ्यानीं पुनः बांधून काढला आहे.

सामान्यपणें दशकोनी आकाराचा आणि दीड मैल परीघ असलेला हा कोट पुर्तुगीजांची निर्मिति आहे. पूर्वपश्चिम लांबी सुमारें पाऊण मैल, तर दक्षिणोत्तर रुंदी सुमारें अर्धा मैल. तट अदमासे तीस ते पस्तीस फूट उंच. त्याची रुंदी पांच ते पधरा फुटांपर्यंत कमी जास्त आहे. दहाही कोनांवर दहा बुरूज आहेत.

या भक्कम, अजेय किल्ल्यामधूनच पुर्तुगीज शासन उत्तर कोंकणावर आपला अधिकार गाजवीत होतें. उन्मत्त झालेले धर्मान्ध पाद्री याच मकाणामध्यें राहून धर्मान्तर करायचें नाकारणाऱ्या प्रजेस नाना प्रकारचे क्रूर दण्ड देत होते. भवतालची प्रजा अगदीं त्रस्त होऊन, गांजून गेली होती.

शेवटीं इ. स १७३९ मध्यें बाजीराव पेशव्यांचे धाकटे बंधु चिमाजी आप्पा सैन्य घेऊन वसईवर कोसळले. उत्तरेकडील पुर्तुगीजांचीं सर्व ठाणीं बळकावून त्यानीं वसईवर एल्गार केला. बाहेरून रमेदी आणि सॅबॅस्टिअन या बुरुजाखालीं मराठ्यानीं प्रचण्ड सुरुंग खणले लढाई म्हणावी अशी झाली. दोन्ही बाजूंचे शेकडों सैनिक मृत्युमुखीं पडले. शेवटीं आकाशात उडालेल्या या दोन्ही बुरुजांपैकी सॅबॅस्टिअन बुरुजाच्या खिंडारातून मराठी सैन्य आत शिरलें, आणि वसईचा पाडाव झाला.

किल्ल्याच्या ध्वस्त खिंडारांतून हिंडत असतां इतक्या दुर्जेय पुर्तुगेज सत्तेला पराभूत करणाऱ्या मराठी सैन्याविषयींच्या आदरानें मन भरून येतें.

## सिद्धगड

नेरळपासून कळंबपर्यंत पक्का रस्ता आहे, तिथून सिद्धगडाचा पायथा पूर्वेकडे अदमासें १० मैल आहे. तळाशीं डोंगरनारी आणि बोरवाडी नावाचीं आदिवासींचीं दोन खेडीं आहेत. बोरवाडीपासून मात्र चढ लागतो तिथून सिद्धगावापर्यंत दोन वाटा. एक लांबची सरळ वाट आणि दुसरी डेऱ्याची वाट. डेऱ्याची वाट थोडी अवघड आहे. सुमारें अर्धा पाऊण मैल चढ चढून गेल्यावर एका काटकोनी कड्याच्या पोटाशीं शिडी उभी केलेली आहे. तिच्या पायऱ्यावर पाय ठेवीत आणि कड्यास दोन्ही हात टेकीत वर चढावें लागतें. या लाकडी शिडीच्या माथ्याशीं पोहोंचलें, कीं डेऱ्यासारखा आकार असलेल्या एका खडकास वळसा घातल्यावर वाटेवर पाऊल टेकता येतें. याहीपुढें कांहीं अंतर चालून गेलें, कीं पुन्हा एक निसणी म्हणजे खोबणी कोरलेला लाकडी खांब. बाजूच्या कड्याला धरून, आणि कड्यात पसरलेल्या मुळ्यांना हात देत कडा चढून गेलें, कीं वरचीं सिद्धगांवातलीं खोपटें दिसतात. तिथून सिद्धगडाचा प्रचंड सुळका छातीवर आल्यासारखा वाटतो. वाट मळलेली नव्हे. तिच्यावर कुठें सावलीही नाहीं. क्वचित् कुठें खडकात कोरलेल्या पायऱ्या आहेत. निम्म्या चढावर डाव्या हातास एक सातवाहनकालीन लेणें आहे. पुढील अवघड आणि उभा चढ चढून गेल्यावर अदमासें ३॥ हजार फूट उंचीवरल्या माथ्यावर पोहोचता येतें. तिथें महादेवाचें एक छप्पर नसलेले देऊळ आणि पश्चिमेकडे उध्वस्त चौथऱ्यावर एक फुटकी तोफ आहे.

वरून राजमाची, प्रबळ, पेब, कर्नाळा, माणिकगड, मलंगगड, दुर्गाडी, तुंगी, कोथळा, आणि गोरखगड इतके किल्ले एका दमात पाहता येतात. दोन चवाळीं भरतील इतकेंच मकाण असलेला हा किल्ला पाहाण्याचें एक नामांकित ठिकाण म्हणून प्रसिद्ध होता.

●

## माहुली

बोरीबंदर कसारा लोकलनें आसनगाव स्टेशनवर उतरलें, कीं उत्तरेस माची नांवाचें माहुलीच्या पायथ्याशीं असलेलें एक खेडें लागतें. तिथून थेट गडापर्यंत मुबलक झाडी आहे. चढ कठिण आहे. अदमासें मध्यावर एका शिडीवरून वर चढावें लागतें. चढत असतां माहुली किल्ल्याभोंवतालचीं निमुळतीं शिखरें लक्ष वेधून घेतात. किल्ल्याचा मूळ दरवाजा एका तुटलेल्या दरीच्या तोंडाशीं आहे. सध्या त्या दरवाजात केतकीचें रान माजलें आहे.

माथ्यावर गेलें, कीं या किल्ल्याचीं तीन शिखरें दिसतात. उत्तरेकडे असलेला पळसगड, मधला माहुली आणि दक्षिणेकडील भंडारगड.

माथ्यावर एक निमजगा आहे. त्याच्या भवतालीं कांहीं उध्वस्त घरटी आढळतात. किल्ल्याच्या चहू बाजूस पाचसहाशें फूट उंचीचा एकसारखा कड आहे.

माहुली किल्ल्यावर एका उच्चस्थावर एक बुरूज आहे. वरील जमीन सुपीक असून तींत पुरुष पुरुष उंचीचें गवत वाढतें. माहुली किल्ल्यामधून पळसगड आणि भंडारगड येथें जाण्यासाठीं दोन दुर्गम दऱ्या ओलांडाव्या लागतात

इ स १६३६ चे सुमारास या किल्ल्यावर शहाजी राजाचा अधिकार होता. ते सौ. जिजाबाईसाहेब आणि धाकटे शिवाजीराजे यांचेसह या किल्ल्यावर अधूनमधून राहात असत. इ. स. १६६१ मध्यें शिवाजी महाराजांनीं हा किल्ला मोगलांपासून सर केला. इ. स. १६६५ मध्यें जयसिंगाशीं झालेल्या तहांत हा किल्ला औरंगजेबाला द्यावा लागला. पण १६७० मध्यें शिवाजीराजांनीं तो पुन्हा जिंकून घेतला.

## अर्नाळा किल्ला

अर्नाळा नांवाच्या एका लहानशा बेटाच्या वायव्य दिशेस हा पाणकोट बांधलेला आहे. उत्तर कोंकणांतील वैतरणा ही एक मोठी नदी या किल्ल्याजवळ समुद्रास मिळत असल्यामुळें तिच्या खाडीच्या सर्वच प्रदेशावर या पाणकोटांतून नजर ठेवतां येते.

किल्ल्याचा आकार लंबवर्तुळाकृती आहे. तटाची उंची सामान्यपणें ३० फूट आहे. भोंवतालीं बुरूज आहेत. किल्ल्याच्या आत कांहीं इमारतींचे अवशेष आहेत. आत गोड पाण्याच्या विहिरी आहेत. त्याशिवाय एक अष्टकोनी तलावही आहे. त्र्यंबकेश्वर आणि भवानी अशीं दोन देवळें आहेत.

किल्ल्याच्या प्रवेशद्वारावर एक शिलालेख आहे. त्याचा प्रारंभ असा—

—बाजीराव अमात्य मुख्य सुमती आज्ञापिलें शंकरा—

हा किल्ला पाहण्यास खाडींतून जावें लागतें. दातिवरें आणि अर्नाळा या दोन्ही गावामधून तेथें जातां येतें. ●

## अशिरगड

माहीमच्या ईशान्येस २२ मैलावर अशिरी नावाचा डोंगर आहे. त्याच्या सुळक्यावर भोज राजानें बांधलेला अशिरगड आहे. या किल्ल्याच्या पायथ्याशीं वरणीपू या नावाची कोळी लोकांची एक वसाहत होती. पोर्तुगीजांची सत्ता या भागात स्थापन झाल्यावर त्यानीं तिथें एक कोट बांधला.

या किल्ल्याची चढण अतिशय अवघड आहे. मोठ्या बिकट वाटेनें, अरुंद, तुटलेल्या अशा एका खिंडींतून कसेंबसें वर चढत आपण एका गुहेंत पोहोंचतों. या गुहेंतूनही वर चढलें, कीं किल्ल्याचा पहिला दरवाजा लागतो. पुढें ७० पायऱ्यांचा एक खडकांत कोरलेला जिना आहे. तो चढून गेलें, कीं किल्ल्याचा दुसरा दरवाजा लागतो. याही दरवाज्याच्या आत तटबंदी केलेला तिसरा दरवाजा आहे. एकुण सर्व चढण अतिशय कठिण असल्यामुळें एका अर्थें हा किल्ला खरो-खरी दुर्ग या नांवास पात्र आहे. किल्ल्याच्या माथ्यावर अर्धा मैल लांबी रुंदीचें मैदान आहे, आणि पाण्याचीं तीन उत्तम तळीं आहेत.

या भागातला हा अतिशय मोक्याचा डोंगरी किल्ला असल्यामुळें पोर्तुगीजांनीं याबर मोठा कडेकोट बंदोबस्त ठेवला होता. इ. स. १७३८ मध्यें मराठ्यांनीं उत्तर कोंकणावर स्वारी केली असतां, चिमाजीआप्पाच्या सेनेनें हा किल्ला पोर्तुगीजां-पासून जिंकून घेतला. ●

## तारापूर

तारापूर खाडीच्या दक्षिण तीरावर माहीमच्या उत्तरेस १५ मैलावर हा जलदुर्ग बांधलेला आहे. पोर्तुगीजांनीं हा इ. स. १५९३ मध्यें बांधून पुरा केला इ. स. १८१८ पर्यंत हा किल्ला उत्तम स्थितींत होता.

किल्ल्याच्या तटाचे दगड ताशीव आहेत याचें क्षेत्रफळ अदमासें ५०० फूट आहे. तटाची उंची सुमारें ३० फूट आणि जाडी १० फूट आहे. पौर्णिमा अमावास्येस समुद्रास भरती आली, कीं त्याचें पाणी किल्ल्याच्या उत्तरेकडील तटापर्यंत पोहोंचतें. किल्ल्याच्या तीन बाजूस सध्या कोरडा पडलेला खंदक आहे. पूर्वेकडील तटाच्या मध्यभागीं किल्ल्याचा दुसरा दरवाजा आहे. आत पुष्कळ विहिरी असून त्याचें पाणी गोड आहे.

पोर्तुगीजांनीं मोठ्या यत्नानें बांधलेला हा किल्ला त्यांनीं तसाच मोठ्या हिंमतीनें झुंजविला. इ स. १७३९ मध्यें चिमाजीआप्पानीं या किल्ल्यास चहूकडून वेढा दिला आणि तटाखालीं ४ सुरुंग लावले. मोठ्या निकराच्या झुंजीनतर हा किल्ला पाडाव झाला. इ. स. १७७६ मध्यें रघुनाथराव पेशवे पुण्याहून पळाले, ते काहीं दिवस या किल्ल्यात जाऊन राहिले होते. पुढें इ. स. १८०३ मध्यें इंग्रजांनीं या किल्ल्यावर ताबा मिळविला.

## गोरखगड

मुरबाडच्या आग्नेयेस सुमारें १२ मैलावर आणि सिद्धगडाच्या उत्तरेस २ मैलावर हा आपल्या आकारामुळे दर्शकाचें लक्ष वेधून घेणारा किल्ला उभा आहे. तळापासून याची उंची अदमासें ४०० फूट आहे. खालचा किल्ला आणि वरचा किल्ला असे याचे दोन भाग आहेत. टेकडीच्या पायथ्यापासून खालच्या किल्ल्याचा मार्ग अतिशय बिकट आहे. तो तुटलेल्या कड्याच्या अगदीं काठावरून गेलेला आहे. हा चढाव संपतो तिथें पहिला दरवाजा आहे. त्याच्या मागील बाजूस असलेल्या

## सुवर्णदुर्ग

रत्नागिरी जिल्ह्यांत जे संपूर्णपणें समुद्रानीं वेढलेले शिवकालीन जलदुर्ग आहेत, त्यामध्यें सुवर्णदुर्गाची गणना केली जाते. हा किल्ला हरणईच्या उत्तर पश्चिमेला सुमारें २ फर्लांग अंतरावर समुद्रात एका खडकावर उभारलेला आहे. अहोरात्र सागरजळ याच्या तटाशीं धडका देत असतें. अनेकदां तर हरणई बंदरात होडींत बसून सुवर्णदुर्गावर जाणें काहींसें अवघड असतें.

या किल्ल्याचा तट पुष्कळ उंच आहे. उत्तर पूर्वेला असलेलें याचें द्वार चळणावळगांनीं बांधलेलें आहे. पश्चिमेकडे काहीं ठिकाणीं खडक फोडून किल्ल्याचा तट उभारला आहे. इतर ठिकाणीं ताशीव चिऱ्यांनी तो उभारला आहे. तटास पुष्कळ बुरूज आहेत. आत पाण्याची दोन तळीं आणि बोरीची झाडें या वेगळें काहीं नाहीं.

दरवाज्याजवळच एक कासवाची प्रतिमा आणि समोर डाव्या हातास हनुमताची सुंदर मूर्ति आहे. दरवाज्याच्या दोन्ही बाजूंस दोन देवड्या आहेत. उत्तरेकडील बुरूजाखालीं काहीं कोठड्या आहेत. बोरीच्या जंगलामध्यें काहीं वाड्याचे उध्वस्त अवशेष आढळतात.

इ. स. १६६० चे सुमारास शिवाजीराजांनीं हा किल्ला जिंकून घेतला. त्यांनीं याची नीट दुरुस्ती करून त्याच्या आश्रयानें आपलें आरमार ठेविलें.

पुढें पश्चिम किनाऱ्यावर आंग्र्याची कारकीर्द सुरू झाली. कान्होजी आंग्र्याच्या निधनानंतर तुळाजी आंग्र्यांचे वेळीं आंग्र्याचे अतिशय शक्तिशाली आरमार सुवर्णदुर्गाच्या आश्रयानें राहू लागलें.

इ. स. १७५५ मध्यें इंग्रज आणि आंग्रे यांच्या बऱ्याच झटापटी या किल्ल्याच्या भोंवतालीं झाल्या. इ. स. १८०२ मध्यें दुसरा बाजीराव काहीं दिवस या किल्ल्याच्या आश्रयाला होता.

हरणई बंदरातील या किल्ल्याची अतिशय देखणी जागा, याचा आकार, तटाचा भव्यपणा, यांमुळें भर समुद्रातून आणि बंदरावरूनही हा किल्ला ठळकपणें नजरेस भरतो.

## सुमारगड

खेड तालुक्यात खेडच्या पूर्वेस असलेल्या तळें या गावाजवळून सह्याद्रीच्या एका फाट्यावर बांधलेल्या सुमारगडाकडे वाट जाते डोंगर चहू अंगानीं तुटलेला आहे. सभोंवार तट आहे, आणि त्याची उंची १५ ते २० फूट आहे. किल्ल्यास काहीं बुरुज आहेत. शिड्या लावल्याविना किंवा दोर न बांधता या किल्ल्यात चढणें अवघड आहे. किल्ल्यावर छाती छाती उंचीचें गच्च गवत आहे. एक दोन पाण्याची तळीं आणि कांहीं इमारतींचे अवशेष वगळता किल्ल्यावर पाहण्याजोगें फारसें काहीं नाहीं

बहुधा भोंवतालच्या प्रदेशावर लक्ष ठेवण्यासाठींच पाहाऱ्याचें ठिकाण म्हणून या किल्ल्याचा उपयोग होत असावा. माथ्यावरून पूर्व आणि पश्चिम दोन्ही दिशाचें फार मोठें क्षेत्र नजरेच्या टप्प्यांत येतें.

## महिपतगड

खेड तालुक्याच्या पूर्व अंगास सुमारें १२ मैलावर रसाळगड, सुमारगड, आणि महिपतगड असे तीन किल्ले उभे आहेत. पैकीं सर्वांत उत्तरेचा आणि आकारानें प्रचंड असा महिपतगड या किल्ल्यास दक्षिणेकडील पोलादपूरवरूनही जातां येतें किल्ल्याचा माथा सपाट आहे. त्याचें क्षेत्रफळ सुमारें १२० एकर आहे. चहू अंगानीं कडे तुटले असल्यामुळें प्रत्येक ठिकाणीं तटबंदीची गरज नाहीं. केवळ कांहीं ठिकाणीं जिथें कडा चढावयास सोपा, तिथें पूर्वी तटबंदी उभारलेली होती. सध्या तटबंदी आणि दरवाजे दोन्ही पडून गेलेले आहेत.

मात्र या किल्ल्याचा विशेष असा, कीं या किल्ल्यास अनेक दरवाजे होते. उत्तरेकडे कोतवाल दरवाजा. ईशान्यकडे लालदेवडी दरवाजा पूर्वेस पुसाटी दरवाजा. या दरवाजानें वर चढायचें म्हणजे शिडीचा उपयोग करावा लागत असे. दक्षिणेकडे खेड दरवाजा. पश्चिमेस शिवगंगा दरवाजा. या दरवाज्याजवळच एक शिवलिंग आहे.

किल्ल्यावर गणपति, मारुती अशी दोन पडकीं देवालयें आहेत, आणि परेश्वर नावाचें एक प्रचंड देवालय आहे. याच्या आवारांत दोन तळीं आहेत. किल्ल्याच्या साधारणपणें मध्यभागीं न वापरलेल्या चुन्याचे प्रचंड ढीग आहेत.

किल्ल्याच्या बाबतींत नावाजण्याजोगी अशी कोणतीही ऐतिहासिक घटना घडली नाहीं.

●

## रसाळगड

महिपत, सुमार आणि रसाळ या दुर्गत्रयींतला आकाराने आटोपशीर, मजबूत, दक्षिणेकडील किल्ला रसाळगड. माथ्याचें क्षेत्रफळ सुमारें ५ एकर आहे. किल्ल्याच्या पायथ्याशीं असलेल्या माडव नांवाच्या खेड्यातून या किल्ल्यावर पोहोंचण्याचा रस्ता जातो. उत्तरेकडे अरुंद असलेला किल्ला दक्षिणेकडे रुंद होऊन दोन फाट्यांमध्यें वाटला गेला आहे. किल्ल्याचा दरवाजा उत्तर दिशेस आहे. हा बुरुजांनीं चांगला मजबूत केला गेला आहे. बाहेरील दरवाज्याच्या समोर कोनाड्यात मारुतीची मूर्ति आहे. दरवाजा ओलांडून कांहीं अंतर गेल्यावर किल्ल्याचा दुसरा दरवाजा लागतो.

किल्ल्यामध्यें सोलाई आणि वाघाई अशा दोन दैवतांचीं ठाणीं आहेत. दर-वर्षी या दोन्ही देवताची यात्रा भरते. देवालयासमोर डोंगराचे जे दोन फाटे झाले आहेत ते दोन्ही तटबंदीनें मजबूत केलेले आहेत. आग्नेयेकडील फाट्यावर छप्पर नसलेली एक इमारत आहे. ही पूर्वीची कोठी होती. पुढें कांहीं पाण्याचीं टाकीं आहेत.

बालेकिल्ल्यांत दारूची उध्वस्त कोठी आणि किल्लेदाराचा वाडा अशा दोन इमारती आहेत. या किल्ल्याचा देखणा आकार, वरून दिसणारें विहंगम दृश्य, यामुळें दर्शकास किल्ला पाहतांना मोठें सुख होतें.

●

कि....६

## पालगड

खेडच्या वायव्येकडील सीमेवर जो एक उच्च डोंगर आहे, त्याच्या शिखरावर पाली गावाशेजारीं पालगड हा किल्ला उभा केलेला आहे. किल्ल्याच्या उत्तरेकडील उतरणीवर हिरवी गच्च झाडी आहे, तिला देवरान म्हणतात.

किल्ल्याचे तट-बुरुज प्राय: पडून गेले आहेत. वरील रान सुमारें १॥ एकर आहे. पूर्वी या किल्ल्यावर कांहीं तोफा पडलेल्या होत्या उध्वस्त अवशेषांपलिकडे या किल्ल्यात तसें पाहण्याजोगे फारसें कांहीं नाहीं.

## गोपाळगड

दाभोळ खाडीच्या दक्षिण तीरावर खाडी आणि समुद्र अशा बेचक्यात गोपाळगड उभा आहे. त्यापासून अंजनवेल गांव अर्धा मैल लांब आहे. खाडींत शिरणाऱ्या आणि बाहेर जाणाऱ्या जहाजांवर या किल्ल्यावरुन चांगली नजर ठेवता येते. किल्ल्याचें क्षेत्रफळ एकूण ७ एकर. पूर्व, पश्चिम आणि उत्तर अशा तीन दिशास समुद्र आणि खाडीचें पाणी आणि दक्षिणेकडे खदक अशी या किल्ल्याची रचना आहे. खदकाची खोली अदमासें १५ फूट आहे. हल्लीं हा खदक ओहरलेला आहे.

किल्ल्याचा तट एकसारखा बांधलेला नाहीं. गरज लागली त्याप्रमाणें चहूबाजूंनीं कमी अधिक उंचीचा तट बांधून बंदिस्त केला आहे. किल्ल्याला एकूण १२ बुरूज आहेत. याला पूर्व आणि दक्षिण असे दोन दरवाजे आहेत पूर्वी किल्ल्यात ज्या इमारती होत्या, त्याचे अवशेष केवळ सध्या शिल्लक आहेत. किल्ल्यात पाण्याच्या ३ विहिरी आहेत.

इ. स. १६६० मध्यें शिवाजीराजांनीं हा आदिलशाहापासून बळकाविला. शिवाजीराजाच्या नंतर छत्रपति संभाजीराजांनीं या किल्ल्याची उत्तम दुरुस्ती केली. इ. स. १६९९ मध्यें जंजिऱ्याच्या सिद्दीनें हा किल्ला मराठ्यापासून घेतला. पण

इ स. १७४४ मध्यें तुळाजी आंग्रे यानें हबशाकडून हा किल्ला पुन्हा जिंकून घेतला. इ. स. १८१७ मध्यें इंग्रजानीं हा किल्ला घेतल्यावर १८२९ पर्यंत या किल्ल्यावर इंग्रजांचें कांहीं देशी सैन्य होतें.

●

## गोवळकोट

चिपळूणपासून गोवळकोट बंदराकडे जाऊं लागलें, कीं बंदराच्या ऐन कोंडींत हा कोट उभारलेला दिसतो. टेकडीची उंची काही फार नव्हे. याच्या तीन बाजवास वासिष्ठी नदीची खाडी आणि चौथ्या बाजूस खंदक होता सध्या तो गाळानें भरून गेला आहे. याचें क्षेत्रफळ सुमारें २ एकर. सध्यां किल्ला अगदीं मोकळा आहे पूर्व आणि उत्तरेच्या बाजूला असलेले दोन्ही दरवाजे, तट आणि बुरूज पडक्या अवस्थेंत आहेत. दक्षिणेकडील भिंतींत माता भवानीचें एक देऊळ आहे.

●

## जयगड

शास्त्री नदीच्या मुखाशीं एका बाजूस समुद्र आणि दुसऱ्या बाजूस खाडी अशा बेचक्यात जयगड किल्ला उभा आहे. क्षेत्रफळ अदमासें ४ एकर तटाचा थोडासा भाग आणि एक दोन बुरूज वगळता शेष सर्व तटबंदी आजही उत्तम स्थितीत आहे माथ्यावरील तटबंदीचें रक्षण करण्यासाठीं समुद्रकिनाऱ्याच्या बाजूनें पुन्हा एक तट उभारला आहे.

किल्ल्यात कांहीं पडू लागलेल्या इमारती आणि उत्तम पाण्याच्या विहिरी आहेत. किल्ल्याच्या पूर्वेकडील उतरणीपासून वरपर्यंत पायऱ्या बांधलेल्या आहेत. या चढून गेलें, कीं किल्ल्याचा मुख्य दरवाजा लागतो.

आदिलशाही चाचाचा एक नाईक, कान्होजी आंग्रे, शाहूराजे, इत्यादिकांचे शासन आलटून पालटून या किल्ल्यावर होतें.

●

## पूर्णगड

मुचकुंदी नदीच्या खाडीच्या ऐन तोंडावर समुद्रकांठीं एक टेकडी आहे, तिच्यावर हा किल्ला बांधलेला आहे. किल्ल्याचें क्षेत्रफळ २२ एकर आहे. तटाचा अदमासें ३० फूट लांबीचा भाग कोसळून पडला. तो वगळता शेष सर्व बांधकाम अद्याप चांगल्या अवस्थेंत आहे. किल्ल्यामध्यें काहीं तोफा आणि तोफगोळे इतस्ततः पडले आहेत. किल्ल्याचे तोंडाशीं मारुतीची एक भव्य मूर्ति आहे.

या किल्ल्यावरून भोंवतालचें दृश्य मोठें सुंदर दिसतें.

## भरतगड

मालवण तालुक्यातील मसुरें गांवाजवळच्या एका उंच डोंगरावर भरतगड बांधलेला आहे. याचें क्षेत्रफळ सुमारें ६ एकर आहे. आंतील लांबुळक्या बालेकिल्ल्याची लांबी-रुंदी १५० आणि ६० यार्ड आहे. तटास उत्तर आणि दक्षिणेकडे दोन बुरूज आहेत. मध्यें पायऱ्या असलेला एक बुरूज आहे. उत्तरेकडील तटाजवळ लहानसें देवालय असून त्याच्याजवळ एक विहीर आहे. याची खोली सवादोनशें फूट आहे. किल्ल्याच्या मुख्य तटाला १० बुरूज काढले आहेत.

इ. स. १६८० मध्यें सावंतवाडीकर फोंड सावंत यांनीं हा किल्ला बांधला. याच्याच कारकीर्दीत किल्ल्याभोंवतीं कित्येक चकमकी झाल्या. सध्या किल्ल्यामध्यें कांहीं निरुपयोगी तोफा पडलेल्या आहेत.

## भगवंतगड

हाही किल्ला मालवण तालुक्यामध्यें भरतगडाजवळ एका उंच डोंगरावर बांधलेला आहे. वरचें क्षेत्रफळ अदमासें १॥ एकर आहे. तटाबुरुजाची पडापडी झालेली आहे. आंत पाणी अगदीं कमी आहे. एक दोन टाकीं आहेत पण तीं ओहोरलेलीं. कांहीं निरुपयोगी तोफा इकडे पडलेल्या आहेत. किल्ल्यामध्यें एक लहानसें देऊळ आहे.

इ. स. १७०१ मध्यें बावडेकर पतप्रतिनिधींनीं भरतगडाच्या तोडीस तोड म्हणून हा किल्ला बांधला. त्यानंतर बरेच दिवस तो त्यांच्याकडे होता.

इ. स. १८१८ च्या ३० मार्चला इंग्रज सेनापति इमलॉक यानें एका छोट्याशा लढाईनंतर हा किल्ला जिंकून घेतला.

•

## यशवंतगड

रेडी खाडीच्या ऐन मुखाशीं, महाराष्ट्राच्या अगदीं दक्षिण टोकास हा बळकट किल्ला बांधलेला आहे. समुद्र आणि खाडी दोन्हींच्या बेचक्यात एक खाडी आहे. या टेकडीच्या पायथ्याशीं सपाट मैदान आहे. त्याच्या भोंवतालीं किल्ल्याचा तट बांधलेला आहे. किल्याच्या पूर्व आणि दक्षिण दिशास खाडीचें पाणी, तर पश्चिमेकडे समुद्र आहे. किल्ल्याच्या ऐन पश्चिम अंगास माडाच्या बागा आणि काही थोडी वस्ती आहे. किल्ल्याच्या नैर्ऋत्य दिशेस ठेंगणी तटबंदी असून एक दरवाजा आहे. त्या दरवाज्यापासून समुद्रापर्यंत चांगला मजबूत तट बांधलेला आहे. त्या तटास मधें मधें बुरूज आहेत. किल्ल्याच्या तटाचा एकूण घेर सुमारें १॥ मैल आहे. तटाच्या दरवाजातून बालेकिल्ल्यावर जाण्यासाठीं पाखाडी बांधलेली आहे. सुमारें मध्यावर आणिक एक तट आणि दरवाजा आहे. या दरवाज्यापासून थेट बालेकिल्ल्यापर्यंत पायऱ्या बांधलेल्या आहेत. या पायऱ्या चढून गेलें, कीं बालेकिल्ल्यात प्रवेश होतो. बालेकिल्ल्याच्या तटाची उंची अदमासें २५ फूट आहे. तटाच्या भोंवतालीं एक आग्नेय दिशा वगळता खंदक खणलेला

आहे याची रुंदी २४ फूट आणि खोली अदमासें १३ फूट आहे. अलिकडे हा खंदक कोरडा पडलेला आहे.

बालेकिल्ल्याचा घेर सुमारें पाव मैल आहे आंतील प्रमुख वाडा दोनचौकी असून त्याच्या दोन्ही कोपऱ्यावर दोन बुरूज आहेत. किल्ल्याच्या भिंती चांगल्या मजबूत आहेत आतील कांहीं इमारती वस्ती करण्याजोग्या आहेत.

इ. स १८६२ मध्यें शिवाजीराजांनीं सिंधुदुर्ग बांधला त्या सुमारासच हा किल्ला ताब्यात घेऊन त्याची फार चांगली दुरुस्ती केली. छत्रपतींच्या निधनानतर पुढें सावंतवाडीच्या फोंड सावंतांनीं हा किल्ला बळकाविला. इ १८१९ सालीं इंग्रजांनीं फोंड सावंताशीं युद्ध करून किल्ल्यावर तोफांचा मारा सुरू केला, आणि शेवटीं हा किल्ला जिंकला.

# नाशिक जिल्हा :

## ब्रह्मगिरि

समुद्रसपाटीपासून अदमासें ४॥ हजार फूट उंचीचा आणि अतिशय कठिण चढ असलेला दुर्ग ब्रह्मगिरि त्र्यंबकेश्वराच्या पाठीमागें उभा आहे. किल्ल्याच्याच कुशींत असलेल्या गंगाद्वारापर्यंत बांधलेल्या ७०० पायऱ्या चढून गेलें, कीं डाव्या हातास किल्ल्याची वाट वळते. खडकातून खोदून काढलेल्या सुमारें २०० पायऱ्या चढून गेलें, कीं आपण माथ्यावर पोहोंचतों. किल्ल्याचें मुख्य द्वार दक्षिण दिशेस आहे. उत्तर दिशेकडे असलेल्या दुसऱ्या दरवाज्याची वाट खडकांतून कोरून काढलेली आहे आणि बंद आहे.

किल्ल्यावर एका खडकावर गंगावतरणाच्या वेळीं शंकरानीं जटा आपटल्या, त्याच्या खुणा उमटलेल्या दाखवतात. वरतीं एक चतुष्कोणी कुंड आहे. तें गोदावरीचें आदिम उगमस्थान. जवळच एक शंकराचें देऊळ आहे

किल्ल्याभोंवतालीं आवश्यकता भासली तिथें तट आणि बुरुज बांधून किल्ला अतिशय मजबूत केला आहे. टकमकीच्या कड्याकडे जाताना खडकात कोरून काढलेल्या पायऱ्यांवरून खालीं उतरावें लागतें. कांहीं अंतर चालून जाऊन पुन्हा तशाच कोरलेल्या पायऱ्यांवरून चढावें लागतें.

इ. स. १६२९ मध्यें शहाजीराजानीं त्र्यंबकचा किल्ला आपल्याकडे घेतला. इ. स. १६३६ मध्यें शहाजीराजानीं हा किल्ला पुन्हा मोंगलांकडे दिला. १६७० मध्यें वणीदिंडोरीस झालेल्या घनघोर लढाईनंतर शिवाजीराजासाठीं मोरोपंत

पेशवे ह्यांनीं हा किल्ला पुन्हा जिंकून घेतला. इ. स. १६६७ मध्यें रघुनाथराव पेशव्यास मुलूख तोडून देताना थोरल्या माधवरावांनीं हा किल्ला त्याना दिला होता. १८१७ सालीं दुसऱ्या बाजीराव पेशव्यानें ब्रह्मगिरि, सिंहगड, पुरंदर आणि राजगड हे चारी किल्ले ब्रिटिशास दिले.

दुसऱ्या पेशव्याचा सचिव त्र्यंबकजी डेंगळे याचाही या किल्ल्याशीं अनेकदां संबंध आला होता. इ. स. १८१८ मध्यें घनघोर युद्धानंतर हा किल्ला ब्रिटिशांनीं जिंकला

## अंकाई

दौंड–मनमाड रेल्वे फाट्यावर मनमाडपासून जवळच अंकाई नावाचें स्टेशन आहे. त्या स्टेशनाशेजारीं अंकाई टकाई हे जोडकिल्ले उभे आहेत. पैकीं अंकाई हा अधिक महत्वाचा. समुद्रसपाटीसून त्याची उंची ३२०० फूट आहे. खानदेश, गोदावरीचें खोरें इत्यादि प्रदेशावर या किल्ल्यावरून नजर ठेवतां येत असे.

तळाशीं असलेल्या अंकाई या लहानशा गावामधून अंकाईचा रस्ता जातो. मार्गामध्यें तीन अलंकृत लेणीं आहेत. लेणीं मागें टाकून पुढें निघालें, कीं खडकातून खोदलेल्या अतिशय मजबूत पायऱ्या लागतात. क्वचित् काहीं ठिकाणीं या पायऱ्या डोंगराच्या पोटातून गेल्या आहेत.

चहूंबाजूनीं १५० ते २०० फूट उंचीचा कडा तुटला असल्यामुळें किल्ल्यावर चढणें एक वाट वगळता अवघड आहे. किल्ल्याचें मैदान अदमासें एक मैल रुंद आहे. पूर्व दिशेला एक लहानशी टेकडी आहे.

गडास तळात एकूण ६–७ तट आहेत. आणि ते तट दोन दारातून ओलांडावे लागतात.

किल्ल्यावर खडकात कोरलेलीं दारूचीं कोठारें आणि धान्याचे कोठे आहेत. पाण्याची टाकीं भरपूर आहेत. मात्र या सर्व इमारती सध्यां पडूं लागल्या आहेत.

अंकाईपासून जवळच असलेला टंकाई हा चहूबाजूंनीं अंकाईसारखा दुर्लंघ्य

असलेला किल्ला अंकाई किल्ल्यावरील नाना वस्तूंचें कोठार म्हणून वापरला जात असे

शहाजहांचा सेनापति खान-खानान यानें इ. स. १६३५ मध्यें अंकाई टंकाई हे दोन्ही किल्ले जिंकून घेतले. सुरत आणि औरंगाबाद यामधील महत्त्वाचें ठाणें म्हणून या जोडकिल्ल्यांचा उपयोग होत असे.

## धोडप

चांदोरपासून पश्चिमोत्तर दिशेला १५ मैलावर असलेला धोडपचा किल्ला हा अजिंठा रांगेतला सगळ्यात उच्च किल्ला आहे. याची उंची समुद्र-सपाटीपासून अदमासें पावणेपांच हजार फूट आहे. आपल्या वैशिष्ट्यपूर्ण आकृतीमुळें हा किल्ला नाशिक, सिन्नर, कळवण, आणि सटाणा या चारी स्थळांहून वेगळेपणानें उठून दिसतो.

चांदूरकडून आलें, कीं गडातळच्या माची नांवाच्या गावात प्रवेश होतो. उत्तरेकडे ओतूर नावाचें एक खेडें आहे. ओतूरहून वर निघालें, कीं वाटेंत जाभूळ, सादडा, आंबा, अशा वृक्षाच्या दाटींतून मार्ग जातो. याच दिशेला पूर्वी चांगलें उत्तम अरण्य होतें. त्या अरण्यामध्ये पूर्वी वाघ आणि चित्तेही सापडत.

वळणावळणाच्या चढाच्या रस्त्यानीं वर पोहोंचलें, कीं एका दुहेरी दारातून आत प्रवेश होतो. आत गेल्यावर पुन्हा खडकाळ वाटेवरून बरेंच वर चढावें लागतें. तिथे माथ्यावर गडाचा मुख्य दरवाजा आहे. या दरवाज्याजवळच पर्शियन भाषेंतले दोन शिलालेख खडकात कोरलेले आहेत. पुन्हां थोडें वर चढून गेल्यावर सदर म्हणजे किल्लेदाराची कचेरी लागते. सदरेच्या पाठीमागें खडकाच्या खाणी-मुळें झालेलें एक पाण्याचें तळें आहे. जवळच एक जुनी तोफ पडलेली आहे. तोफेमागे ध्वजस्तभ असून त्याच्याशेजारीं देवीचे देऊळ आहे.

त्याशिवाय काहीं कोठ्या, दारूचीं कोठारें, घरें, इत्यादींचे अवशेष आहेत. देवीच्या पश्चिमेस पाण्याचें एक उत्तम टाकें आहे.

इ. स. १५५० चे सुमारास राज्य करीत असलेल्या बुऱ्हान निजामशाहाकडे कित्येक दिवस हा किल्ला होता. इ. स. १६३५ मध्यें मुगल सेनापति अल्लावर्दीखानानें हा जिंकून घेतला. पुढें पेशव्यांच्या कारकीर्दीत हा पेशव्यांनीं बळकाविला. इ. स. १७७८ सालीं रघुनाथराव पेशव्यांनीं धोडपच्या शेजारीं येऊन आश्रय घेतला थोरल्या माधवरावांनीं अतिशय चपळपणें धोडपपर्यंत मजल मारताच रघुनाथराव पेशव्यांनीं किल्ल्यांत आश्रय घेतला. पण सवाई माधवरावाच्या चातुर्यामुळें रघुनाथरावाला त्यास शरण जावे लागलें. इ. स. १८१८ मध्यें इतर किल्ल्यांबरोबर हाही इंग्रजांनीं घेतला.

## मुल्हेर

सटाणा तालुक्यात मुल्हेर या इतिहासप्रसिद्ध गावाशेजारीं मुल्हेर हा उत्तुंग दुर्ग उभा आहे. याच्या पूर्वेस मोरागड आहे, आणि पश्चिमेस हातगड. मुल्हेर गावातूनच किल्ल्याकडे जायचा रस्ता फुटतो. सपाटीपासून किल्ल्याची उंची अदमासें २००० फूट आहे. बराच चढ चढून गेल्यावर तीन प्रवेशद्वारें ओलांडावीं लागतात, आणि आपण एका प्रचंड वस्तीच्या अवशेषांत येऊन पोहोंचतो या वस्तीमध्यें काहीं घरें, काहीं देवळें, काहीं अतिशय सुंदर विहिरी अशा कित्येक बांधकामांचे पडून गेलेले अवशेष आहेत. या सान्याच मैदानात आंब्याचीं भरपूर झाडें आहेत.

इथून वर अदमासें १५० फूट चढून गेल्यावर बालेकिल्ला लागतो. याची नैसर्गिक रचना मोठी भव्य आहे. बालेकिल्ल्यावर फत्तेलष्कर, रामप्रसाद आणि शिवप्रसाद या नावाच्या सात फूट लांबीच्या तोफा होत्या

वरतीं एका मोठ्या इमारतीचे अवशेष आणि भडंगनाथ या नाथपंथी सत्पुरुषाची समाधि आहे भोंवतालीं पाण्याचीं पुष्कळ टाकीं आहेत. कांहीं दारूची उत्तम कोठारेंही इथें आढळतात.

मयूरध्वज आणि ताम्रध्वज नामक दोन बंधूंच्या आधिपत्याखालीं हा किल्ला बहुत प्राचीन काळीं नांदत होता. याचा पहिला ऐतिहासिक उल्लेख इ. स. १३४०

मधील आढळतो. त्या वेळीं मानदेव नावाच्या अधिपतीच्या ताब्यात हा किल्ला होता इ. स. १५९० मध्यें बागलाण तालुक्याचे मानबिंदू म्हणून मुल्हेर आणि साल्हेर या दोन्ही किल्ल्याचा उल्लेख आढळतो. इ. स. १६१० मध्यें फिंच नावाच्या इग्रज प्रवाशानें या किल्ल्याचा उल्लेख महमुदी नावाचें सोन्याचें नाणें पाडण्याची टांकसाळ म्हणून केलेला आहे

सुरतेवर स्वारी करताना शिवाजी राजे मुल्हेर आणि साल्हेर या किल्ल्या-जवळूनच गेले. राजांनीं इ. स. १६६३ सालीं साल्हेर आणि मुल्हेर हे दोन्ही किल्ले जिंकून घेतले होते.

## अलंग–कुलंग

इगतपुरीपासून दक्षिण-पूर्वेला सुमारें १० मैलांवर अहमदनगर जिल्ह्याच्या सीमेवर ही किल्ल्याची जोडगोळी वसलेली आहे. इ. स १८१८ च्या युद्धामध्यें कुलंगवर चढायचा मार्ग इग्रजाच्या तोफाच्या भडिमारामुळें प्राय' नष्ट झालेला आहे.

मलंगवर काहीं प्रयत्नानीं चढता येतें. पण तोही मार्ग धोक्याचाच आहे. अलं-गच्या पूर्वेस नवरानवरी या नावाचीं दोन उंच टोकें आकाशात उगवलेलीं दिसतात.

वरतीं काहीं उत्तम पाण्याचीं टाकीं आहेत. खडकात कोरलेलीं काहीं कोठीघरें आणि तटाबुरुजाचे अवशेष दिसतात.

इ. स. १७६० मध्यें इतर किल्ल्यांच्याबरोबर हे पेशव्यानीं मुगलापासून जिंकून घेतले. इ. स. १८१८ सालीं इतर किल्ल्याबरोबर हेही इंग्रजाच्या हातीं पडले.

## अहिवंत

दिंडोरीच्या उत्तरेस अदमासें १५ मैलावर चांदूर रांगेमध्यें अहिवंत दुर्ग उभा आहे. खानदेश आणि गंगाथडी अशा दोन्ही दिशांनीं यावर चढतां येतें. पैकीं खानदेशाकडून येणारा मार्ग अधिक सोपा आहे. गंगथडींतून वर चढणारा मार्ग एका पाणलोटातून जातो. पाणलोटापलिकडे कांहीं पायऱ्या खोदलेल्या आहेत.

किल्ल्यावर दोन द्वाराचे अवशेष आहेत. शिवाय पडापड झालेला तट आहे. दगडचुन्यानें बांधलेला एक अंबरखानाही वरतीं आहे. वर पाणी भरपूर आणि चांगलें आहे.

अहिवंत किल्ल्याचें नांव रामचंद्रपंत अमात्यांनीं आज्ञापत्रामध्यें मुद्दाम उल्लेखिलें आहे. "साल्हेरी अहिवंतापर्यंत महाराष्ट्र राज्य पसरलें होतें," या अर्थाचें वाक्य त्यांनीं दुर्गप्रकरणामध्यें लिहिलें आहे.

●

## साल्हेर

मुल्हेरच्या पश्चिमेस डोंगरांच्या दाटीमध्यें आपल्या निमुळत्या शिखरामुळें लक्ष वेधून घेणारा साल्हेर किल्ला उभा आहे. एक पूर्वेकडून आणि दुसरा पश्चिमेकडून अशा दोन मार्गांनीं साल्हेरवर चढतां येतें. पैकीं पूर्वेकडील मार्ग हा खडकामध्यें चांगल्या रुंद पायऱ्या कोरून तयार केला गेला आहे. पश्चिमेकडील मार्गावर दरवाज्याचे अवशेष आहेत.

या किल्ल्याच्या अगदीं माथ्यावर एक निमुळती टेकडी आहे. तिच्या शिखरावर परशुरामाच्या पादुका आहेत. या पादुकांवर असलेलें छत सध्या शिल्लक नाहीं. टेकडी उतरून पश्चिमेकडे चालू लागलें, कीं एक यज्ञकुंड, पाण्याचीं कांहीं टाकीं आणि कांहीं इमारतींचे अवशेष आढळतात.

मोरोपंत पेशव्यांनीं आपल्या प्रबळ मराठी सेनेच्या साह्यानें साल्हेर हा प्रबळ दुर्ग मुगलांपासून जिंकून घेतला होता. आज्ञापत्रामध्यें स्वराज्याचा विस्तार सांग-

ताना रामचंद्रपंत अमात्यांनीं या दुर्गाचा उल्लेख मुद्दाम केलेला आहे.

या किल्ल्याच्या पश्चिमेस गुजराथची हद्द सुरू होते. कांहीं वर्षेपर्यंत हा किल्ला बडोद्याच्या गायकवाडांकडे होता. स्वराज्याच्या उत्तरेकडील किल्ल्यामध्यें साल्हेरचा किल्ला हा उत्तुंग आणि बळकट दुर्ग म्हणून नावाजला गेला होता.

●

## रामसेज

दिंडोरीच्या दक्षिणेकडे ७ मैल आणि नाशिकच्या उत्तरेस ७ च मैलावर ३॥ हजार फूट उंचीचा रामसेजचा किल्ला उभा आहे. चढ तसा सोपा आहे. प्रवेशद्वारें एकांत एक अशीं दोन आहेत. वर चढण्यासाठीं एक चोरवाट आहे. किल्ल्याभोंवतीं तटबंदी केली आहे. आतां ती ढासळूं लागली आहे. किल्ल्यात दोन दारूचीं कोठारें आहेत. पाण्याचीं टाकीं भरपूर आहेत. पहिल्या द्वाराजवळ श्रीरामाचें एक लहानसें देऊळ आहे.

इ. स. १६८२ सालीं औरंगजेबानें शहाबुद्दीनखान नावाच्या सरदारास बरोबर सैन्य देऊन हा किल्ला घेण्यासाठीं धाडलें. त्यानें किल्ल्याजवळ एक लाकडी प्रचंड धमधमा रचला. परंतु मराठ्यानीं त्या धमधम्यास आग लावून तो जाळून टाकला. शेवटीं इ. स. १६८७ सालीं मुगलानीं हा किल्ला जिंकला. इ. स. १७७० मध्यें औरंगजेबाच्या मृत्यूनंतर या किल्ल्याचा ताबा पुन्हा मराठ्याकडे आला. इ. स. १८१८ मध्यें मराठेशाही नष्ट होईपर्यंत हा मराठ्याकडेच होता.

●

## रवळ्या–जवळ्या

सप्तशृंगीसमोरील मार्किंडा पर्वताच्या पूर्वेस चादोर डोंगर रांगेमध्यें रवळ्या–जवळ्या हे जोड किल्ले आहेत. या दोन्ही किल्ल्यांच्या मध्यें गंगा–जमुना या नावाचीं पाण्याचीं उत्तम टाकीं आहेत.

जवळ्याच्या प्रमुख दरवाज्याजवळ दो बाजूंना दोन

भक्कम बुरूज आहेत, आणि द्वारासमोर गणपतीची एक मूर्ति आहे. किल्ल्यावर कित्येक इमारतींचे ध्वस्तावशेष आहेत. दरवाजा आणि बुरूज सध्यां पडून गेले आहेत.

खळ्या आणि जवळ्या दोन्ही किल्ल्यावरील मैदान तसे फार मोठें नाहीं. या किल्ल्यावर चढायच्या वाटा दोन. पैकीं एक खानदेशातून आणि दुसरी गगथडी-मधून. ज्या टेकडीवर हे दोन्ही किल्ले बांधले आहेत, तिचा आकार बराच मोठा आहे. या दोन्ही किल्ल्यामध्यें एक लहानशी वस्ती आहे.

खळ्याचें द्वार सध्या शिल्लक नाहीं. या दोन्ही किल्ल्यावर कांही धान्याचीं कोठारें आणि पाण्याचीं टाकीं आहेत.

पेशवाईमध्यें इंग्रज-मराठा संघर्ष सुरू असतां या किल्ल्याचा उल्लेख वारंवार केलेला आढळतो.

●

## मार्कंडा

राधामाधवविलासचंपू नावाचें शहाजी राजाची प्रशंसा करणारें काव्य लिहिणारा जयराम पिंड्ये हा कवि मार्कंडा किल्ल्याचा किल्लेदार जो गंभीरराव त्याचा पुत्र. चतु:श्रृंगीपासून जवळच अदमासें ४। हजार फूट समुद्रसपाटीपासूनची उंची असलेला हा एक उत्तुंग किल्ला आहे.

किल्ल्याचा चढायचा मार्ग अतिशय कठिण आहे. अगदीं माथ्यावर किल्ल्याचें द्वार आणि भोंवतालीं तटबंदी आहे. पण हीं दोन्ही सध्या पडून गेलेलीं आहेत. वरतीं पाण्याचा मुबलक सांठा आहे. गडाच्या माथ्यावर एका उंबराच्या झाडा-खालीं कोटितीर्थ नावाचें एक टाकें आहे. याला रामकुंड असेंही म्हणतात. सोमवती अमावास्येला इथें मोठी यात्रा भरते. जवळच कमंडलु नावाचें आणिक एक तीर्थ आहे कमंडलुशेजारीं धान्य साठवायचीं दोन तळघरें आहेत. या तळ-घराच्या जवळ मोतीटाके नावाचें पाण्याचें एक उत्तम ठिकाण आहे

या किल्ल्याचें पूर्वीचें नाव मयूरखंडी. राष्ट्रकूट राजापैकीं तिसरा गोविंद यानें या किल्ल्यावरून कित्येक दानें दिलीं होतीं. पेशवाईमध्यें या किल्ल्यावर दारूगोळा साठवलेला होता.

●

## पट्टा

सिन्नर तालुक्याच्या दक्षिण–पश्चिम सरहद्दीवर, देवळालीपासून अदमासें १० मैल दक्षिणेस पट्टा किल्ला आहे. तळात एक लहानसें खेडें आहे. तिथून किल्ल्यावर जात असता दोन्ही बाजूस कांहीं योद्धयाची स्मारकें आहेत. किल्ल्याची उंची कांहीं फार नाही वर चढायचा मार्गही सोपा आहे. अदमासें पाऊण चढ चढून गेल्यावर कांहीं लेणीं लागतात, त्यापैकीं एका लेण्यात देवाची एक सुंदर मूर्ति आहे. लेण्याजवळ पाण्याचीं टाकीं आहेत.

महाद्वारातून आपण वर शिरलों, कीं एक देऊळ लागतें. त्याची दुरुस्ती अगदीं अलिकडे झाली आहे. तिथून पुढें कांहीं अंतर गेल्यावर आपण एका प्रचंड दगडी इमारतीसमोर उभे राहातों. दोन दारें असलेली ही प्रचंड इमारत पूर्वी अंबरखाना म्हणून वापरली जात असावी. सध्या आत भोंवतालचीं गुरें वस्तीला असतात.

या इमारतीजवळच पाण्याचीं कांहीं टाकीं आहेत. तिथून अदमासें १०० फूट उंचीवर गडाचा माथा आहे.

भोंवतालीं काही बुरूज आणि उध्वस्त तट आहेत. चहूबाजूंनीं कडा तुटला असल्यामुळें या किल्ल्यास तशी तटाची फारशी गरज नाही. त्याचेगळे कांहीं इमारतींचे चौथरे इथें तिथें आढळतात.

इ. स. १६७१ मध्यें मोगलाकडून मोरोपंत पिंगळ्यानीं हा किल्ला जिंकून घेतला. शिवाजीराजानी याचे नामकरण विश्रामदुर्ग असें केलें होतें

माथ्यावरून पाहिलें असता भोंवतालीं तसे फारसे डोंगर नसल्यामुळें या किल्ल्याचें एकुटपण ध्यानीं येते.

## हरिश्चंद्रगड

पुणें, ठाणें, आणि नगर हे तीन जिल्हे जिथें एकत्र मिळतात, त्या ठिकाणीं महाराष्ट्रातले सर्वांत उच्च डोंगर एकत्र झालेले आहेत. नगर जिल्ह्यात कळसूबाई हें महाराष्ट्राचें सुमारें ५। हजार फूट उचीचें सर्वोच्च शिखर आहे. याच परिसरात एका उच्च डोंगराच्या माथ्यावर हरिश्चद्रगड उभा आहे.

दक्षिणेकडे ओतुरजवळचें खिरेश्वर नावाचें लहानसें गाव आहे. तिथून खिंड चढून हरिश्चद्रगडावर पोहोंचतां येतें. दुसरा मार्ग राजूरच्या दक्षिणेस, ऐन हरिश्चद्रगडाच्या पायथ्याशीं असलेल्या पाचनई या आदिवासींच्या खेड्यातून वर चढतो या मार्गाची चढण अधिक सोपी आहे. तिसराही एक मार्ग कोतूळकडून टोलारखिंडींत येतो, आणि ऐन माथ्याजवळ तो चक्रेश्वरहून येणाऱ्या मार्गास मिळतो. टोलार खिंडीच्या उजव्या हातास हरिश्चंद्रगड उभा आहे.

शिवकालामध्यें या किल्ल्याचा फारसा उल्लेख नसला, तरी या किल्ल्याचा विस्तार फार मोठा आहे आणि अदमासें दोन हजार वर्षांपूर्वीच या किल्ल्याची निर्मिति झालेली आहे.

वर दाट झाडी आहे. टोलार खिंडींतून वर चढल्यावर तर केवळ झाडीपलिकडे कांहींच दिसत नाहीं, आणि नवखा माणूस गोंधळून जातो. या बाजूनें सुमारें दोन अडीच मैल चालल्यावर मग वस्तीच्या खुणा दिसू लागतात. याच मार्गानें वस्तीकडे जात असता डाव्या हातास तारामती आणि रोहिदास हीं दोन शिखरें आहेत. या शिखरावर दाट झाडीपलिकडे कांहींही नाहीं. मात्र हे गच्च झाडीतले दोन अडीच मैल चालून आपण पलिकडे गेलों, कीं एका अद्वितीय, अद्भुत मदिरापाशीं आपण येऊन पोहोंचतों मदिरात प्रवेश करण्यापूर्वी डाव्या हातास एक उत्तम पुष्करणी आहे. तिच्या दक्षिण दिशेस १४ कोनाडे आणि या प्रत्येक कोनाड्यात एकेक विष्णुमूर्ति आहे. प्रत्येक मूर्तीच्या हातांतलीं आयुधें मात्र निरनिराळीं आहेत.

याच पुष्करणीच्या पलिकडे डाव्या हातास देवळापासून अदमासें १५० कदमांवर काहीं गुहा खणलेल्या आहेत. पैकीं सर्वात मोठ्या गुहेमध्यें खडकातच कोरलेली ९–१० फूट उचीची गणपतीची मूर्ति आहे.

मुख्य देवळाभोंवतीं तटबंदी आहे. त्या तटबंदीच्या माथ्यावर सुमारें ७०० वर्षांपूर्वी कोरलेले काहीं स्पष्ट आणि अस्पष्ट शिलालेख आहेत. पैकीं स्पष्ट शिलालेखाचा मजकूर असा—

—चक्रपाणि वटेश्वरः नंदतु तस्य सुनु वीकट देऊ.

द्वारांतून आत शिरतांक्षणीं समोर अदमासें ५० फूट उंचीचें कळाशीदार, सुघड मंदिर दिसतें. याच्या शिखराची बांधणी काहींशी बुद्धगयेच्या मंदिरासारखी आहे. मंदिराच्या चहूं बाजूस कडकांत खणलेल्या ओवऱ्या आहेत. यापैकीं काहीं ओवऱ्यांमध्यें देवतांच्या मूर्ती बसविलेल्या आहेत.

मुख्य मंदिर हरिश्चंद्रेश्वराचें अर्थात महादेवाचें. समोर नंदी आहे. मंदिराच्या गाभाऱ्याच्या बाहेरील बाजूस गणेशपट्टीवर आणखी काहीं शिलालेख आहेत. मंदिरामागें पाण्याचीं टाकीं. पैकीं एका टाक्याजवळ नारसिंहाची अतिशय गोमटी मूर्ति सुटीच ठेवली आहे.

मंदिरांतून बाहेर पडलें म्हणजे तटाबाहेर त्याला लागून एक ओढा वाहातो. या ओढ्याच्या प्रवाहाबरोबर अदमासें ५० हात खालीं उतरलें, कीं आपण एका १२० फूट रुंद आणि सुमारें ५० फूट लांब असलेल्या प्रचंड गुहेपाशीं येऊन पोहोंचतों. या गुहेच्या बाहेरील दिशेस असलेल्या खांबावर अति प्राचीन शैलीच्या देवनागरीमध्यें कोरलेले दोन शिलालेख आहेत. गुहा छातीइतक्या पाण्यानें भरलेली आहे. तिच्या मध्यभागीं एक चौरस ओटा आणि त्यावर एक प्रचंड शिवलिंग आहे.

हरिश्चंद्रेश्वराचें देऊळ आणि त्याचा परिसर एका अद्भुत गूढ वातावरणानें भारलेला आहे. ७०० वर्षांपूर्वी वटेश्वर चांगदेव हे योगीराज इथें तपश्चर्या करीत राहिले आणि त्यांनीं तत्त्वसार नामक तत्त्वज्ञानविषयक ग्रंथ इथें पुरा केला. त्याहीनंतर अनेक योग्यांनीं तिथें तपश्चर्या केली. हरिश्चंद्रगड हें एक सिद्धपीठ म्हणून बहुता काळापासून प्रसिद्ध होतें.

हा परिसर मागें टाकून पश्चिमेकडील टेकाड ओलांडून त्याच दिशेस अदमासें मैल सव्वा मैल चालत गेलें, कीं आपण एका अद्वितीय कड्यापाशीं येऊन पोहोंचतों. सुमारें १॥ मैल लांबीचा हा कडा अंतर्गोल आहे. ऐन मध्यावर याची उंची सुमारें २ हजार फूट आहे.

हरिश्चंद्रगड हें महाराष्ट्रांतलें एक अद्वितीय पण दुर्गम यात्रास्थळ आहे. ●

# औरंगाबाद जिल्हा :

## देवगिरि–दौलताबाद

सह्याद्रीचे काहीं फाटे पूर्वेकडे पसरले आहेत. पैकीं अजंठा ही रांग नाशिक जिल्ह्यातून आग्नेय दिशेकडे कललेली आहे या रांगेंत अकाई, टंकाई, असे काहीं किल्ले त्यांच्या वैशिष्टयपूर्ण रचनेसाठीं प्रसिद्ध आहेत. तोडलेले उभे कडे आणि विवरातून जाणारी प्रवेशद्वारें हे या किल्ल्याचे विशेष यापैकीं या रांगेच्या माथ्यावर असलेला शेवटचा अजोड किल्ला म्हणजे दौलताबाद-देवगिरि. हा यादवाची राजधानी म्हणून इतिहासात प्रसिद्ध आहे. नाणेघाटाच्या माथ्यावर असलेल्या जीवधन, चावंड, हडसर इत्यादि गिरिदुर्गांप्रमाणें हाही सातवाहनांनीं निर्माण केला असला पाहिजे. महाराष्ट्राच्या इतिहासात देवगिरीच्या रचनेसाठीं आवश्यक असलेला सुदीर्घ काळ सातवाहन कुळाला लाभला होता कदाचित् वेरूळचें जगप्रसिद्ध कैलास लेणें रचणाऱ्या राष्ट्रकूटानींही याची रचना केली असेल. कांहीं इतिहासकार मात्र देवगिरीच्या रचनेचें श्रेय भिल्लम यादव या नृपाळाकडे देतात. तें कसेंही असो, दौलताबाद या नावानें ओळखल्या जाणाऱ्या या देवगिरीची रचना भारतीय नृपाळांनीं केली हें निर्विवाद.

यादव कुळ देवगिरीवर नांदूं लागलें. मुख्य दुर्गाभवतालीं प्रचंड आणि मजबूत असा भुईकोट बांधला. त्याचें नांव देवगिरिनगर ठेवलें. या कुळात भिल्लम, सिंघण, कृष्ण, महादेवराय यासारखे प्रबळ आणि नीतिमंत राजे नांदून गेले. त्यांच्या काळात यादव सत्तेची खूप भरभराट झाली. खोलेश्वर, बिच्छणदेव, शंकर असे

पराक्रमी सेनापती यादवाच्या राजवटींत गाजले. गोविंदप्रभु हा चक्रधराचा गुरु यादवाच्या राज्यांत होऊन गेला प्रसिद्ध भास्कराचार्य आणि रुक्मिणीस्वयंवर या ग्रंथाचा कर्ता नरेंद्र हेही याच राज्यात झाले महाराष्ट्र कुळींचा तन्मणि ज्ञानेश्वर, या महायोग्यानें आपला ज्ञानेश्वरी हा जगविख्यात ग्रंथ यान्त्र यादवकुळाच्या छत्रछायेंतील नेवाश्यास लिहिला.

रामदेवराय यादव देवगिरीवर राज्य करीत असतां इ. स. १२९४ मध्यें अल्लाउद्दीन खिलजीनें मोठ्या धाडसाने देवगिरीवर हल्ला केला. त्या हल्ल्याच्या गडबडींत किल्ल्यामध्यें धान्याऐवजी मिठाचीं पोतीं भरलीं. निरुपाय होऊन रामदेवरायनें शरणागति पत्करली रामदेवपुत्र शंकरदेवानें शर्थीची झुज देऊनही शेवटीं त्यास शरणागति पत्करावी लागली. शेवटीं सहाशें मण सोनें, सात मण मोती, दोन मण हिरें माणकें, आणि लक्षावधि रुपयाच्या बरोबर रामदेवरायाची कन्या बरोबर घेऊन अल्लाउद्दीन परतला. यादवकुळाच्या वैभवास ग्रहण लागलें. पुढे शंकरदेवानें अल्लाउद्दीनाची सत्ता झुगारायचा प्रयत्न केला. पण मलिक-काफर या दिल्लीपतीच्या सेनापतीच्या हातें शंकरदेवही मारला गेला. मुहमद तुघलकानें एकदा पातशाहतीची राजधानी दिल्लीहून देवगिरीस आणायचा निष्फळ प्रयत्न केला. निजामशाहीची राजधानी कित्येक वर्षे या किल्ल्यावर होती. दि. २५ जुलै १६२९ या दिवशीं निजामशाही दरबारात मुजऱ्यास आलेल्या लखुजी जाधवरावाचा तीन पुत्रासह इथेच खून झाला. निजामशाही बुडल्यावर हा दुर्ग निजामाच्या राज्यात मोडत असे.

मनमाडहून काचीगुडाकडे जाणाऱ्या रेल्वेमार्गावर दौलताबाद हें स्टेशन आहे. औरंगाबादहूनही तेथें जाता येतें. सध्या दौलताबाद हें एक लहान गाव आहे. गावातून किल्ल्याकडे बाहेर पडलें, कीं अगोदर खालचा भुईकोट दिसतो. अनेक कबरींनीं तो गच्च झाला आहे. किल्ल्याच्या प्रवेशद्वारातून आत शिरण्यापूर्वी अदमासें १५ मीटर रुंदीचा खंदक ओलांडावा लागतो. पूर्वी यावर काढता घालता लाकडी पूल असे. पलिकडे गेल्यावर अंधारी नांवाचें अदमासें ४५ मीटर लांब अंधारभरलें विवर लागते वळणें, आघळे फाटे, धोक्याच्या जागा यांनीं तें विवर गच्च भरलें आहे. विवरातून बाहेर पडल्यावर ३ मीटर आकाराचा तवा ओलांडावा लागे. तो टाकून पुढें निघालें, कीं ५०—६० मीटर ताशीव कडा

आणि वरतीं असलेला दुर्ग सामोरा ठाकतो. उजव्या हातास चांदमीनार नांवाचा उच्च मनोरा आहे.

प्रत्यक्ष किल्ल्यावर जागा अगदीं कमी आहे दरबार जिथें भरत असे ती जागा, जनार्दन स्वामींची समाधि, मेंढा तोफ इत्यादि दर्शनीय वस्तू आणि वास्तू पाहात असता या दुर्गानें काय काय निरखलें आहे, तें ध्यानीं येऊन मोठा विस्मय वाटतो. मनात नाना विचाराची दाटी होते.

किल्ला पाहायला एक दुपार पुरते. किल्ल्यासमोर फराळाचें सामान मिळूं शकतें. बाहेर शासकीय प्रमाणपत्रें जवळ असलेले दर्शक असतात. त्यास बरोबर घेऊन किल्ला पाहाणें सोयीचें होतें.

●

# आज्ञापत्रांतील दुर्गप्रकरण

## गडकोटांचें महत्त्व

संपूर्ण राज्याचें सार तें दुर्ग. दुर्ग नसता मोकळा देश परचक्र येतांच निराश्रय, प्रजाभग्न होऊन देश उद्वस होतो. देश उद्वस झाल्यावरी राज्य असें कोणास म्हणावें ? याकरिता पूर्वी जे जे राजे झाले त्यानीं आधीं देशामध्यें दुर्ग बांधून तो तो देश शाश्वत करून घेतला, आणि आलें परचक्रसंकट दुर्गाश्रयीं परिहार केलें. हें राज्य तर तीर्थरूप थोरले कैलासवासी स्वामींनीं गडावरूनच निर्माण केलें. जो जो देश स्वशासनवश न होय त्या त्या देशीं स्थलविशेष पाहून गड बांधिले, तसेंच जलदुर्ग बांधिले, त्यावरून आक्रमण करीत करीत सालेरी अहिवतापासून कावेरीतीर-पर्यंत निष्कंटक राज्य संपादिलें औरंगजेबासारखा महाशत्रू चालून येऊन विजापूर भागानगरासारखीं महास्थानें आक्रमिलीं, संपूर्ण तीस-बत्तीस वर्षेंपर्यंत या राज्याशीं अति श्रम केला, त्याचे यत्नास असाध्य काय होतें ? परंतु राज्यांत किल्ले होते म्हणून अवशिष्ट तरी राज्य राहिलें पुढें पूर्ववत् करावयास अवकाश जाहला. या उपरही ज्यापेक्षा राज्य संरक्षण करणें आहे, त्यापेक्षा अधिकोत्तर साधनीं स्वतां गड किल्ल्यांची उपेक्षा न करिता, परम सावधपणें असतील त्या गडकिल्ल्यांची यथोक्त मजबुदी करावी नूतन देश साधणें. त्या देशांत जीं स्थळें असतील तीं महत्प्रयत्नें हस्तवश करावीं ज्या देशांत गडकोट नसतील त्या देशांत आपले राज्याचे सर-हद्दीपासून पुढें जबरदस्तीनें नूतन स्थळें बांधीत बांधीत तो देश आक्रमावा. त्या स्थळाचे आश्रयीं सेना ठेवून पुढील देश स्वशासनें वश करावा असें करीत करीत राज्य वाढवावें. गडकोटाचा आश्रय नसता फौजेच्यानें परमुलखीं टिकाव धरून राहवत नाहीं. फौजेविरहित परमुलखीं प्रवेश होणेंच नाहीं इतक्याचें कारण, गडकोटविरहित जें राज्य त्या राज्याची स्थिति म्हणजे अभ्रपटलन्याय आहे. याकरिता ज्यास राज्य पाहिजे त्याणीं गडकोट हेंच राज्य, गडकोट म्हणजे राज्याचें मूळ, गडकोट म्हणजे खजिना, गडकोट म्हणजे सैन्याचें बल, गडकोट म्हणजे राज-लक्ष्मी, गडकोट म्हणजे आपलीं वसतिस्थळें, गडकोट म्हणजे सुखनिद्रागार, किंबहुना गडकोट म्हणजे आपलें प्राणसंरक्षण, असें पूर्ण चित्तांत आणून कोणाचे भरवशावर न राहतां आहे त्यांचें संरक्षण करणें, व नूतन बांधण्याचा हव्यास स्वतःच करावा, कोणाचा विश्वास मानूं नये.

# गडाची रचना व बांधणी

राज्यरक्षणाचें मुख्य कारण किल्ले, देशोदेशीं स्थळें पाहून बांधावें. किल्ल्या-समीप दुसरा पर्वत किल्ल्यासमुदयीं असू नये. कदाचित् असला तरी सुरुंग लावून पाडून गडाचे आहारीं आणावा. सुरुंगास असाध्य असा असला तरी तोहि जागा मोकळी न सोडिता बांधून मजबूत करावा. गडाची इमारत गरजेची करू नये. तट, बुरूज, चिलखतें, पाहारे, पडकोट जेथें जेथें असावे ते बरे मजबूत बांधावे, नाजूक जागे जे असतील ते सुरुंगादि प्रयत्नेंकरून, अवघड करून, पक्की इमारत बांधोन गडाचा आयब काढावा. दरवाजे बांधावे, ते खालील मारा चुकवून, पुढें बुरूज देऊन, येतिजाती मार्ग बुरुजाचे आहारी पडोन दरवाजे बांधावे. किल्ल्यास एक दरवाजा थोर अयब आहे, याकरितां गड पाहून, एक दोन तीन दरवाजे, तशाच चोरदिंड्या करून ठेवाव्या. त्यामध्यें हमेशा राबत्यास पाहिजे तितक्या ठेवून वरकड दरवाजे व दिंड्या चिणून टाकाव्या. इमारतीवरील मामलेदार वगैरे आदिकरून ठेवणे ते बरे शहाणे, कृतकर्मे निरालस्य पाहून ठेवावे. गडाची इमारत मुस्तेद करावी. कित्येक किल्ले प्रत्येक पर्वताचे आहेत. कित्येक पर्वत थोर थोर, त्याचा एखादा कोन, कोपऱ्याची जागा पाहोन बांधावा लागतो त्यास दरवाजापुढें अथवा तटाखालीं मैदानभूमि लागते, म्हणजे तो गड भुईकोटात दाखल जाहला. आला गनीम त्यानीं दरवाजास अथवा तटास लागावें असें होतें ही गोष्ट बरी नव्हे. याकरिता या जातीचा किल्ला असेल त्यास आधीं सर्व प्रयत्नें दरवाज्यापुढें तटाखालीं जितकें मैदान असेल तितका खंदक खोल आणि रुंद खणून तटाचे पायीं दुसरा पडकोट मजबूत बांधोन त्यावर झाडीं, जुबेरे ठेवून, खंदकाचे कडेस एका-एकीं परकी फौज येऊन न पावे असें करावें गडास यावयाचे मार्ग असतील ते सुगम नसावे. सुगम असले तर ते मार्ग मोडून, त्यावर झाडी वाढवून आणखीकडे परके फौजेस येतां कठिण असे मार्ग घालावे याविरहित बलकबुलीस चोरवाटा ठेवाव्या. त्या सर्वकाळ चालू देऊ नयेत. समयास तेच दिंडी अथवा दरवाज्याचा राबता करून साजवादा चढवीत जावा.

# गडाची राखण

गडाची राखण म्हणजे कल्यारम्याची झाडी, ते झाडी प्रयत्नें वाढवावी. त्यामध्यें एक काठीही तोडों न द्यावी बलकबुलीस त्या झाडीमध्यें हशम बंदुके घालावया

कारणाजोगें असों द्यावें. गडासभोंवतीं नेहमीं मेटे असावीं. घेरियाची घस्ती करीत जावी घस्तीचा आन्न मेटकरी यांणीं देत जावा. गडाखालतें इमारतीचें घर किंवा घराभोंवतें दगडाचें कुसू सर्वथा असों न द्यावें. तसेंच गडावर आधीं उदक पाहून किल्ला बाधावा. पाणी नाहीं आणि तें स्थळ तो आवश्यक बाधणें प्राप्त झालें तरी आधीं खडक फोडून तळीं, टाकीं पर्जन्यकाळपर्यंत सपूर्ण गडास पाणी पुरेल अशीं मजबूत बाधावीं. गडावरी झराही आहे, जसे तसें पाणीही पुरतें, म्हणून तितकियावरीच निश्चिती न मानावी. उद्योग करावा, किनिमित्य की, झुजामध्यें भाडियाचे आवाजाखालीं झरे स्वल्प होतात आणि पाणियाचा खर्च विशेष लागतो, तेव्हां संकट पडतें. याकरिता तसे जागीं जखिरियांचें पाणी म्हणून दोन चार टाकीं तळीं बाधावीं. त्यातील पाणी खर्च होऊ न द्यावे, गडाचें पाणी बहुत जतन राखावें. गडावरी राजमदिराविरहित थोर इमारतीचें घर बाधों नये. राजमदिरासही भिंती इटाच्या बाधोन त्यास चुना दाट गच्च घालावा. घरात कोठें उंदीर, विंचू, किडा, मुगी राहील अशी दरद न ठेवावी. घरास कुसू पाहिजे तें निरगुडी आदिकरून झाडाचें पातळ घालावें. गडकरी यांणीं राजमदिर म्हणून खालीं न ठेवावें. सर्वकाळ वस्ती करून धुरें करून घर शाबूत राही, जीव जंतु न राही तें करावें. धनी गडावरी येतात असे कळताच अगोदर दोन चार दिवस मामलेदारानें येऊन, खासा उभा राहून, सपूर्ण घर सारवून, रागोळी आदिकरून घालून धनी गडावरी येईतोंपर्यंत त्याच जागा सदर करून बसत जावे. गडावरील मार्गामार्गांवरी बाजारात तटोतट केर कसपट किमपि पडों न द्यावें. ताकीद करून झाला केर गडाखालीं न टाकता जागजागीं जाळून ती राखही परसांत टाकून घरोबर होईल ते भाजीपाले करवावे.

## गडावरील साहित्य व युद्धाची सामुग्री

गडावरील धान्यगृहें, इस्तादेचीं घरें, हीं सकळही ( आहेत त्यास ) अग्नी, उदीर, किडा, मुगी वाळवी याचा उपद्रव न बाधे अशी भुईस दगडाची छावणी करून गच्ची बाधावी. ज्या किल्ल्यास काळा खडक दरजेविरहित असेल तसे ठिकाणी ते कड्यास टाकी करावी. स्वल्पमात्र दरज असेल तरी गच्च लावून पाझर न फुटे असें करावें. गच्चास अरेना अशी भुई असेल तेथें गच्चीघरें करून थोर थोर काचेचे मर्तबान, झोलमाठ, मडकीं आणून त्यास मजबूत बसका करून

त्यात तेल तूप साटवावें. दारुखाना घराजवळ घराचे परिघाखालीं नसावा. सदरे-पासून सुमारात जागा बांधून भावतें निरगुडी आदिकरून झाडाचे दाट कुसू घालून बांधावें. त्यास तळघर करावें. तळघरात गच्च करावा. त्यांत माच घालून त्यावर दारूचे बस्ते, मडकीं ठेवावीं बाण, होके, आदिकरून मध्यघरात ठेवावे. सर्दी धावों न द्यावी. आठ पधरा दिवसात हवालदारानें येऊन दारू, बाण, होके आदिकरून बाहेर काढून ऊण देऊन मागुती मुद्रा करून ठेवीत जावें. दारू-खान्यास नेहमीं राखणेस लोक ठेवावे त्याणीं रात्रदिवस पाहान्याप्रमाणें जागत जावें परवानगीविरहित आसपास मनुष्य येऊ न द्यावें. किल्लासरक्षणाचें कारण ते भाडीं व बंदुका, याकरिता किल्ल्यात इशम ठेवावेत ( ते ) बदुकीचे ठेवावेत तट सरनोबत, बारगीर, सदर–सरनोबत, हवालदार यासी बदुकीचा व भाडीं डागा-याचा अभ्यास असावा. ( संपूर्ण इशमानीं तलवार, टाकणी हेही हत्यारें बाळगीत जावीं. ) गड पाहून, गडाचे नाजूक जागे पाहून, त्या त्या जागीं व गडाचे उपराचे जागा त्या त्या सारिखीं भाडीं, जंबुरे, चरक्या आदिकरून यंत्रे बुरुजाबुरुजात तटोतट टप्पेगुजरें बाधून ठेवावीं. भाडियाचे गाडे, चरक, भाडीं पाहून मजबूत लोखंडी कट देऊन त्यावर ठेवावीं दारूच्या खलित्या, गज, भाडें निववावयाच्या कुच्या, गोळे, कीट आदिकरून रेजगिरी सुपारीप्रमाणें लहानथोर नदींतले खडे, बाणाच्या पलाखा, जामग्या, तरफा, काने, दुरुस्त करावयाचे सामते, आदिकरून हा जिन्नस भाडियाचा भाड्यांजवळ हमेशा तयार असावा. अहिनी दगडी जिन्नस दारूचे अतरीं ठेवावे होके, बाण हेही पहारे पहान्यास तयार असों द्यावे दरम्यान, मुलखात गनीम कोठें आहे, येईल ते समयीं कोठींतून आणून तयारी करीन म्हणेल तो मामलेदार नामाकूळ, आळशी. तशास मामला सागों नये. एक वेळ केली आज्ञा त्याप्रमाणे अघपरपरेनें निरालस्यपणें उगेच वर्तावे, तरीच समयीं दगा होत नाहीं, लावून दिला कायदा अव्याहत चालतो पर्जन्यकाळीं भाडियास व दरवाज्यास तेल मेण देऊन भाडियाचे कोने मेणानें भरून भाडियावर भाडिया-पुरती आवाडी घालून जाया होऊ न द्यावीं वरकडही जिन्नस सर्दी न लागे असे आबादान ठेवावे. इमारतीचें काम आधीं तयार झालेंच असतें. तथापि तट, पाहारे, बुरूज, कोट, काहीं जाया होतच आहे ते वरचेवरी मजबूत करावे लागतात. तटास झाड वाढतें तें वरचेवरी कापून काढावे. तटाचें व तटाखालील गवत जाळून गड नाहाणावा लागतो.

## गडाचा कारखाना

या कामास गडोगडास गड पाहून इमारतींचा कारखाना नेहमी ठेवून मुद्राधारी याचे स्वाधीन करावा. तसेंच गोलदाज विश्वासूक कबिलेदार, नेमिला जागा दुरुस्त मारणार, असे मर्दान, गड व गडाचीं भाडीं पाहून जितके लागत असतील तितके ठेवावे. गडावरी झाडे जी असतील तीं राखावीं. याविरहित जीं जीं झाडें आहेत तीं फणस, चिंचा, वड, पिंपळ, आदिकरून थोर वृक्ष, निंबे, नारिंगे, आदिकरून लहान वृक्ष, तसेंच पुष्पवृक्ष वल्ली किंबहुना प्रयोजक अप्रयोजक जें झाड होत असेल तें गडावर लावावें, जतन करावें. समयीं तितकेही लांकडाचे तरी प्रयोजनास येतील गडोगडीं ब्राह्मण, ज्योतिषी, वैदिक, व्युत्पन्न तसेंच रसायण वैद्य व झाडपाल्याचे वैद्य व शस्त्रवैद्य, पंचाक्षरी, जखमा बांधणारे, व लोहार, सुतार, पाथरवट, चांभार यांच्याही गड पाहून एक एक दोन दोन असाम्या करून ठेवावे लहानसहान गडावर या लोकाचें नित्य काम पडतें असे नाहीं, याकरिता त्यांचे कामाची हत्यारें त्याजवळी तयार असों द्यावीं. जे समयीं काम पडेल ते समयीं काम करितील, नाहीं ते समयीं आदिकरून तहशील तलब चाकरी घ्यावी रिकामे न ठेवावे. गडोगडीं तनखा, दारुसाद, इस्तान आदिकरून गडाच्या प्रयोजनाची वस्तुजात गडास संग्रह करून ठेवावेंच लागतें. याविरहित गड म्हणजे आपले कार्याचे नव्हेत, असें बरें समजून आधीं लिहिलेप्रमाणे उस्तवारी गडाची करावी.

( आज्ञापत्रावरून )

ग्रंथ संग्रहालय, ठाणे

# किल्ल्यांची सूची

## पुणें जिल्हा

१) चावड
२) हडसर
३) जीवधन
४) शिवनेरी
५) नारायणगड
६) चाकणकिल्ला
७) राजमाची
८) कुवारि
९) विसापूर
१०) लोहगड
११) सिंहगड
१२) मल्हारगड
१३) पुरंदर
१४) राजगड
१५) प्रचंडगड
१६) विचित्रगड
१७) तुंग
१८) तिकोना

## कुलाबा जिल्हा

१) कुलाबा
२) खांदेरी
३) उदेरी
४) सागरगड
५) कोरलई
६) रतनगड
७) सांकशी
८) सोनगिरी
९) मलगगड
१०) चंदेरी
११) पेब
१२) प्रबळगड
१३) विशाळगड
१४) माणिकगड
१५) कर्नाळा
१६) तुगी
१७) कोथळीगड
१८) भिवगड
१९) धक
२०) अवचितगड
२१) बिरवाडी
२२) घोसाळगड
२३) सुरगड
२४) तळेगड
२५) विश्रामगड
२६) मानगड
२७) रायगड
२८) मंगळगड-कांगोरी
२९) कौलाकिल्ला
३०) लिंगाणा
३१) चंद्रगड

## सातारा जिल्हा

१ ) कमालगड
२ ) पाडवगड
३ ) वैराटगड
४ ) वदन
५ ) केंजळगड
६ ) अजिंक्यतारा
७ ) सज्जनगड
८ ) कल्याणगड
९ ) चदन
१० ) वर्धनगड
११ ) भूषणगड
१२ ) महिमानगड
१३ ) वारूगड
१४ ) संतोषगड
१५ ) भोपाळगड
१६ ) मच्छिंद्रगड
१७ ) प्रचितगड
१८ ) वसंतगड
१९ ) सदाशिवगड
२० ) गणबतगड
२१ ) सुंदरगड
२२ ) जंगली जयगड
२३ ) बहिरवगड
२४ ) महिमडणगड
२५ ) प्रतापगड
२६ ) मकरदगड
२७ ) वासोटा

## कोल्हापूर जिल्हा

१ ) बावडा
२ ) भूधरगड
३ ) पन्हाळा
४ ) पावनगड
५ ) रांगणा
६ ) सामानगड
७ ) विशाळगड

## ठाणें जिल्हा

१ ) डहाणू
२ ) दिंडू
३ ) सजान
४ ) उम्बरगाव
५ ) बल्लाळगड
६ ) दातिवरें
७ ) अर्नाळा
८ ) वसई
९ ) बेलापूर
१० ) धारावी

70

११ ) गंभीरगड
१२ ) इंद्रगड
१३ ) सेगवाह
१४ ) अशीरगड
१५ ) असावगड
१६ ) शिरगावचा किल्ला
१७ ) काळदुर्ग
१८ ) टकमक
१९ ) तांदुळवाडी किल्ला
२० ) अलिबाग
२१ ) भवनगड
२२ ) तारापूर
२३ ) दातिवरें
२४ ) मानोर
२५ ) केळवें-माहीम
२६ ) पारसिक
२७ ) ठाणें किल्ला
२८ ) वरसोवा
२९ ) जीवधन
३० ) कामनदुर्ग
३१ ) कोंजकिल्ला
३२ ) गुमतारा
३३ ) भोपटगड
३४ ) माहुली
३५ ) मळवतगड
३६ ) भैरवगड
३७ ) गोरखगड
३८ ) नळदुर्ग
३९ ) सिदगड
४० ) कल्याणचा किल्ला

## रत्नागिरी जिल्हा

१ ) बाणकोट
२ ) हर्णई
३ ) सुवर्णदुर्ग
४ ) कनकदुर्ग
५ ) फत्तेगड
६ ) गोवा
७ ) मडणगड
८ ) सुमारगड
९ ) महिपतगड
१० ) पालगड
११ ) रसाळगड
१२ ) अंजनवेल
१३ ) विजयगड
१४ ) आंबोळगड
१५ ) यशवंतगड
१६ ) राजापूर किल्ला
१७ ) विजयदुर्ग–घेरिया
१८ ) साटवली
१९ ) भैरवगड
२० ) देवगड
२१ ) खारेपाटण
२२ ) कोट–कामतें
२३ ) भरतगड
२४ ) भगवतगड

२५ ) बहिरवगड
२६ ) गोवळकोट
२७ ) भवनगड
२८ ) माहिमतगड
२९ ) प्रचितगड
३० ) जयगड
३१ ) पूर्णगड
३२ ) दुर्ग रत्नागिरि
३३ ) वेताळगड
३४ ) सिदगड
३५ ) सिंधुदुर्ग
३६ ) सर्जेकोट
३७ ) नांदोशी
३८ ) निवती
३९ ) रायगड
४० ) यशवतगड

## सावंतवाडी तालुका

१ ) आवर किल्ला
२ ) बांदे किल्ला
३ ) कुडाळ किल्ला
४ ) महादेवगड
५ ) मनोहरगड
६ ) मनसंतोषगड
७ ) सावतवाडी किल्ला

## नाशिक जिल्हा

१ ) मुल्हेर
२ ) गाळणा
३ ) कक्काळा
४ ) हातगड
५ ) धाईर
६ ) रामसज
७ ) वाघेरा
८ ) बहुळा
९ ) घारगड
१० ) अंजनेरी
११ ) त्र्यबक–ब्रह्मगिरि
१२ ) हरीशगड
१३ ) अलगकुलंग
१४ ) वितानगड
१५ ) पट्टा
१६ ) अकाईटंकाई
१७ ) चांदोर
१८ ) इद्राई
१९ ) राजधेर
२० ) कोळधेर
२१ ) कंचना
२२ ) धोडप
२३ ) कन्हेरा
२४ ) खळ्याजवळ्या

२५ ) भास्करगड

२६ ) च्यगलवाडी

२७ ) कावनई

२८ ) मार्किंडा

२९ ) अहिवत

३० ) अचलगड

## सांगली जिल्हा

१ ) दोदवाड

२ ) मंगळवेढें

३ ) सागली

४ ) शिरहट्टी

५ ) श्रीमतगड

६ ) तेरदाळ

७ ) येलवट्टी

## औरंगाबाद जिल्हा

१ ) देवगिरि–दौलताबाद

• •

# गो. नी. दाण्डेकर यांची आम्ही प्रकाशित केलेली पुस्तके

**चरित्र-इतिहास-धार्मिक**

श्रीगणेशपुराण
श्रीरामायण
श्रीकृष्णायन
श्रीकर्णायन
श्रीमहाभारत
महाराष्ट्र-दर्शन
भावार्थ ज्ञानेश्वरी
(ज्ञानेश्वरीचा गद्य अनुवाद)
भक्तिमार्गदीप
कहाण्या
श्रीगुरुचरित्र (मूळ ओवीबद्ध ग्रंथ)
सुबोध श्रीगुरुचरित्र (संपूर्ण गद्य अनुवाद)
स्मरणगाथा
श्रीगाडगेमहाराज
रक्षाबंधन (कथा)

**ललित-प्रवास**

दुर्गदर्शन
गगनात घुमविली जयगाथा
किल्ले
छंद माझे वेगळे

**किशोर वाङ्मय**

**चरित्रे**

संत ज्ञानेश्वर
संत एकनाथ
संत तुकाराम
संत रामदास
संत नामदेव

## कादंबऱ्या

आम्ही भगीरथाचे पुत्र
पूर्णामायची लेकरं
मृण्मयी
पद्मा
उडोनि हंस चालला
अजून नाही जागे गोकुळ
बया दार उघड
हर हर महादेव
दर्याभवानी
झुंजार माची
हे तो श्रींची इच्छा
माचीवरला बुधा
तुटलेलं घरकुल
मोगरा फुलला
रुमाली रहस्य
रानभुली
दास डोंगरी राहातो
वाघरू
आनन्दवनभुवन
भिल्लवीर कालिंग

## नाटके

वनराज सावध होतात
काका माणसात येतो
शितू

REFBK-0022857